CMYK



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, ४ मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १७५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
हीं आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### आजचे सामने

**कोलकाता नाईट रायडर्स वि. राजस्थान रॉयल्स**
वेळ : दु. ३.३० वाजता
ठिकाण : ईडन गार्डन, कोलकाता

**पंजाब किंग्ज वि. लखनौ सुपरजायंटस्**
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : हिमाचल असोसिएशन स्टेडियम, धर्मशाला

## विचारपुष्प



भारतात राहणारा आणि त्याच्याबद्दल प्रेम वाटणारा मानवसमूह एकच आहे. त्यांची जीवनपद्धती, कला, साहित्य, तत्त्वज्ञान ही सर्व भारतीय संस्कृती आहे. म्हणून ही संस्कृती भारतीय राष्ट्रवादाचा पाया आहे. या संस्कृतीवर निष्ठा असेल तरच भारत एकात्म राहील.

**पं. दीनदयाल उपाध्याय,**
पूर्व अध्यक्ष भारतीय जनसंघ

# भारताकडून पाकिस्तानची व्यापार कोंडी

## ● आयात-निर्यातीवर घातली बंदी ● अर्थव्यवस्थेवर घातला घाव

**पहलगाम हल्ला प्रकरण**




◆ **नवी दिल्ली, ३ मे**

पाकिस्तानातून भारतात आयात होणाऱ्या आणि भारतातून पाकिस्तानात निर्यात केल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंवर बंदी घालण्यात आली. पाकिस्तानची व्यापार कोंडी करण्याचा भाग म्हणून एखादी वस्तू आयात होणारी असो किंवा अप्रत्यक्षपणे दुसऱ्या कोणत्याही देशातून पाकिस्तानी वस्तू भारतात आयात होणार असली तरी त्यावर बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयाने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसणार आहे.

भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने शनिवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारताने पाकिस्तानमधून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वस्तूंच्या आयात आणि निर्यातीवर बंदी घातली आहे. पाकिस्तानमधून भारतात होणाऱ्या सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक, मग ती मुक्तपणे आयात करता येण्याजोगी असो किंवा नसो, पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित असेल. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक धोरणाच्या हितासाठी हे निर्बंध लादण्यात आले आहे.

या निर्बंधातील कोणत्याही अपवादासाठी भारत सरकारची पूर्व परवानगी आवश्यक असेल. दरम्यान पाकिस्तानमधून थेट आयात कमी झाली असली तरी, काही वस्तू अप्रत्यक्ष मार्गांनी किंवा तिसऱ्या देशांमधून भारतात येत होत्या. त्यामुळे वाणिज्य मंत्रालयाने कठोर निर्णय घेतला. *(वृत्तसंस्था)*




### पहलगाम हल्ल्यानंतर घेतलेले निर्णय

- सिंधू पाणी करार स्थगित
- पाकिस्तानी नागरिकांचे सर्व व्हिसा रद्द
- अटारी-वाघा सीमेचे दरवाजे बंद
- पाकिस्तानी विमानांसाठी भारतातील हवाई क्षेत्र बंद
- व्यापारी संबंध संपुष्टात, आयात-निर्यातीवर बंदी
- पाकिस्तानी माध्यमे, समाज माध्यम चॅनेल्सवर बंदी
- फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सच्या ग्रे लिस्टमध्ये टाकण्याची मागणी

### टपाल सेवा स्थगित

केंद्र सरकारने पाकिस्तानमधून हवाई आणि भूपृष्ठ मार्गाने येणाऱ्या सर्व प्रकारच्या टपाल आणि पार्सलची देवाणघेवाण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पाकमधून भारतात पत्र किंवा पार्सलदेखील येणार नाही. पाकिस्तानचा ध्वज असलेल्या जहाजांना कोणत्याही भारतीय बंदरात जाण्याची परवानगी दिली जाणार नाही. भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना देखील पाकिस्तानच्या कोणत्याही बंदरात जाण्याची परवानगी नसेल.

### आंतरराष्ट्रीय निधी थांबवणार

भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात् आयएमएफ, जागतिक बँक आणि आशियाई विकास बँकेकडे पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय आर्थिक मदतीचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी केली आहे. पाकिस्तानला देण्यात येणारी आर्थिक मदत दहशतवादाला चालना देण्यासाठी वापरली जात असल्याचा आरोप करण्यात आला.

## पाकिस्तानी सैन्याकडून गोळीबार सुरूच

◆ **श्रीनगर, ३ मे**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यापासून पाकिस्तानी सैन्याकडून दररोज प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात आहे. शुक्रवार आणि शनिवारी रात्री नवव्या दिवशी पाकिस्तानी सैन्याने कुपवाडा, उरी आणि अखनूर सेक्टरमध्ये हलक्या शस्त्रांनी गोळीबार केला. या कारवाईला भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले.

शनिवारी रात्री पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवर कोणत्याही चिथावणीशिवाय लहान शस्त्रांनी गोळीबार केला. याशिवाय, ३० एप्रिल रोजीही पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवर नौशेरा, सुंदरबनी आणि अखनूर सेक्टर तसेच काश्मीर विभागातील बारामुल्ला आणि कुपवाडा जिल्हा तसेच आंतरराष्ट्रीय सीमेपलीकडे जम्मू आणि सांबा जिल्ह्यांतील परगल आणि रामगड सेक्टरमध्ये लहान शस्त्रांनी गोळीबार केला. भारतीय सैन्यानेही लगेच प्रत्युत्तर दिले. दोन्ही सैन्यांमध्ये छोट्या शस्त्रांचा वापर करून झालेल्या चकमकीत कोणीही जखमी किंवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. *(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे

### साई मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी

**अहल्यानगर :** शिर्डीतील साई मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. यासंबंधीचा एक ईमेल साई संस्थानला मिळाला आहे. या ईमेलमुळे पोलिस प्रशासन तर्क झाले आहे. साई संस्थानला धमकीचा एक ईमेल मिळाला आहे. त्यात साईसमाधी मंदिर पाइपबॉम्बने उडवण्याचा इशारा देण्यात आला आहे. या मेलमध्ये आणखी काय आहे, हे स्पष्ट झाले नाही. पोलिसांनी यावर भाष्य करणे टाळले आहे. पण यामुळे सुरक्षा यंत्रणांत एकच खळबळ माजली आहे. या धमकीनंतर पोलिसांनी मंदिर परिसराची तपासणी करून तेथील सुरक्षा व्यवस्था चोख केली आहे. हा खरेच धमकीचा ईमेल की, खोडसाळपणा याचा तपास सुरु आहे.

## लवकरच वाजणार स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा बिगुल?

**नागपूर, ३ मे**

सर्वोच्च न्यायालयात ६ मे रोजी ओबीसी आरक्षणावर सुनावणी होणार आहे. त्याच दिवशी निवडणुकांच्या तयारीसाठी हजर राहण्याचे आदेश शासन स्तरावरून देण्यात आले आहेत. त्यामुळे निकाल लागल्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सर्वांचे लक्ष लागून असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तयारी संदर्भाने सर्व अधिकाऱ्यांनी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

जे अधिकारी हजर राहणार नाहीत त्यांच्याविरोधात कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. शासकीय पातळीवरील हालचाली पाहता मुंबई मनपापाठोपाठ राज्यात गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा बार उडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शासनाने शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना केंद्रस्तरीय अधिकारी पदावर रूजू होण्याचे आदेश जारी केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याचे संकेत मिळाले आहेत. निवडणुका रखडल्याने राज्यातील तब्बल २३ महानगरपालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. गेल्या चार वर्षांपासून निवडणुका न झाल्याने विकासकामे रखडली असून नागरिकांना जणू नगरसेवकांचा विसर पडला आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात प्रलंबित असल्याने निवडणुका लांबल्या आहेत.

**मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था**
- ✔ पंचायत समित्या : २८९
- ✔ नगरपंचायती : २९
- ✔ नगरपरिषदा : २२८
- ✔ जिल्हा परिषदा: २६
- ✔ महानगरपालिका: २९

## दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांना अद्दल घडवू : पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली, ३ मे**

दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्यांना कडक इशारा देताना पंतप्रधान म्हणाले, आम्ही दहशतवाद्यांवर आणि त्यांच्या समर्थकांवर कठोर व निर्णायक कारवाई करण्यास वचनबद्ध आहे. सीमापार दहशतवादाविरोधातील आमच्या लढाईत अंगोलाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल आम्ही त्यांचे आभार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

हैदराबाद हाऊस येथे शनिवारी मोदी यांनी अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ मॅन्युएल गोन्साल्विस लॉरेन्को यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय बैठक घेत अनेक विषयांवर चर्चा केली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### सरकारी कामात अडथळा; निवृत्त अधिकाऱ्याची मुक्तता

**सोलापूर, दि. ३ मे-**

सोलापूर महानगरपालिकेचे निवृत्त अतिक्रमण अधिकारी यांची सरकारी कामात अडथळा निर्माण केल्या प्रकरणातून निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी दिले. यातील फिर्यादी राहुल बनसोडे हे सोलापूर महानगरपालिका विभागातील दक्षता पथकामध्ये कामास होते. ४ जानेवारी २०१४ रोजी फिर्यादी हे त्यांच्यासोबतच्या ड्रायव्हर सोबत गाडीमधील इंधन संपल्याने डिझेल मागणी पत्र घेण्यासाठी सोमपा कार्यालयातील स्थानिक कर संस्था कार्यालयामध्ये मध्ये गेले होते. त्यावेळी फिर्यादी हे प्रशासकीय इमारतीसमोर थांबले असताना निवृत्त अतिक्रमण अधिकारी जगन्नाथ बनसोडे हे त्या ठिकाणी आले. त्यांनी तू स्थानिक संस्था विभागात कसे काम करतो, तू माझ्यासमोर शेंबडा आहेस, असे म्हणून शिवीगाळ करत तुला बघून घेतो, अशी दमदाटी केली. त्यावेळी त्या ठिकाणी पडलेल्या कुदळीच्या दांड्याने फिर्यादीच्या पाठीवर व उजव्या हातात मारले. त्यानंतर आरोपी हा तेथून निघून गेले. आरोपीने फिर्यादीस शासकीय कर्तव्यावर असताना शिवीगाळ करून दमदाटी व मारहाण केल्याबाबतची फिर्याद सदर बझार पोलीस ठाण्यात दाखल केलेली होती. याप्रकरणाचा तपास करून पोलिसांनी निवृत्त अतिक्रमण अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र पाठविले होते. याप्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदारांच्या जबाबात व पोलिसांसमोर दिलेल्या जबाबात तफावत व विसंगती असल्याचे तसेच तपासी अंमलदाराने बनवलेल्या कागदपत्रात अत्यंत गंभीर चुका व तफावत असल्याचे आरोपीच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून निवृत्त अतिक्रमण अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांची न्यायाधीश राणे यांनी निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश दिले. सदर प्रकरणात निवृत्त अतिक्रमण अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांच्या वतीने ॲड. निलेश जोशी, ॲड. शिल्पा कुलकर्णी, ॲड राणी गोडरबलू, ॲड. ओंकार परदेशी, ॲड. मधुश्री देशपांडे यांनी काम पाहिले.

### 'महाबीज'चा वर्धापन उत्साहात

**सोलापूर दि. ३ मे-**

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ अर्थात महाबीजचा ४९ वा वर्धापन दिन व सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण दि. २८ एप्रिल रोजी महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर यांचे अध्यक्षतेखाली महाबीज मुख्यालयात संपन्न झाला. यावेळी अकोला जिल्हा पोलीस अधिक्षक बच्चन सिंह, संशोधन संचालक डॉ. विलास खर्चे, डॉ. पी.डी.के.व्ही, महाबीजचे संचालक वल्लभराव देशमुख व डॉ. रणजीत सपकाळ, संचालक अंकूशराव माने उपस्थित होते. महाबीज मुख्यालय येथे वृक्षारोपण करण्यात आले. उल्लेखनीय कामगिरी केलेले बीजोत्पादक, शेतकरी, विक्रेते, अधिकारी कर्मचारी यांचा महाबीज गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक महाव्यवस्थापक डॉ. प्रफुल्ल लहाने यांनी केले. व्यवस्थापकीय संचालक कुंभेजकर यांनी आजपर्यंत महाबीजला लाभलेले अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांच्या विशेष घडामोडींचा उजाळा करुन दिला. केवळ चार जिल्ह्यातीले महाबीजचे कार्य १९८० ते १९८४ या काळात तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक विश्वासराव धूमाळ यांनी केंद्र व राज्य शासनाकडे पाठपूरावा करुन महाबीजचा विस्तार राज्यभर केल्याचे विषद केले. सुत्रसंचालन किशोर बळी यांनी तर आभार प्रदर्शन जितेंद्र सरोदे यांनी मानले.

# तर मागासवर्गीय विकास विभाग बंद करा : मंत्री शिरसाट

## लाडक्या बहीण योजनेसाठी निधी वळविल्याने शिवसेनेच्या मंत्र्यांचा संताप

**जमीर काझी । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३ मे :**

महायुतीला विधानसभेत प्रचंड बहुमत मिळवून देण्यास कारणीभूत ठरलेली लाडकी बहीण योजना आता त्यांच्यासाठी डोकेदुखी बनत चालली आहे. राज्य सरकारची तिजोरी मोकळी असल्याने त्यासाठीचा निधी अन्य विभागातून वळविण्यात येत आहे. शुक्रवारी मागासवर्गीय सामाजिक विकास विभागाचा ७४६ कोटी निधी लाडकी बहिण योजनेसाठी वर्ग करण्यात आल्याचे अध्यादेश निघाल्याने सामाजिक विकास खात्याचे मंत्री व शिवसेना संजय गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट प्रचंड संतापले आहेत. फायनान्स डिपार्टमेंटला जर आपल्या मनमानीप्रमाणे कारभार करायचा असल्यास मागासवर्गीय व सामाजिक विकास विभाग बंद केला तरी चालेल ,अशा शब्दात त्यांनी आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच याबाबत आपण मुख्यमंत्र्यांकडे चर्चा करणार असल्याचेही सांगितले.

राज्य सरकारने सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याचा निधी वळवण्यात आला आहे. दोन्ही विभागांचे अनुक्रमे ४१० कोटी ३० लाख आणि ३३५ कोटी ७० लाख रुपये महिला आणि बालविकास विभागाकडे वळविण्यात आले. याबाबत विचारणा केली असता ते म्हणाले,' आपल्या माध्यमातून कळले जवळपास सव्वाचारशे कोटी वर्ग करण्यात आले आहेत, याची मला कल्पना आणि माहिती नाही.

सामाजिक खात्याची आवश्यकता नसेल तर खातं बंद केले तरी चालेल, याबाबत मी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करेल, फायनान्स डिपार्टमेंट आपली मनमानी चालवत आहे, आपण म्हणू तेच खरं म्हणत आहेत. या खात्याचा कायदेशीर निधी वर्ग करता येत नाही कट करता येत नाही, फायनान्स डिपार्टमेंटवाले आपले डोके जास्त चालवत असतील तर हे बरोबर नाही, हे स्पष्टपणे सांगतो. आदिवासी समाज कल्याण खाते कशासाठी निर्माण झालं आहे? इतर खात्यातून पैसे वर्ग करता येत नाहीत का? हे मला पटलेले नाही, मागचे वर्षीचे दायित्व १५०० कोटी रुपयांचे आहे. इतर खात्याचे वर्ग झाले की काय माहिती नाही. मात्र, सामाजिक खात्याचे पैसे वर्ग झाले हे सत्य आहे, असे सांगून ते म्हणाले, माझ्या खात्याचा निधी तुम्हाला इतर ठिकाणी वर्ग करता येत नाही, हा नियम आहे. कायदा आहे. फायनान्स काही जण बसले आहेत, त्यांना जर आपण हुशार आहोत असं वाटत असेल तर त्यांनी मला हे दाखवलं पाहिजे, आणि नियम द्या मला निधी वर्ग करता येतो म्हणून जर करता येत असेल तर मी त्यांची माफी मागेन, लाडकी बहिण लाडकी आहे, फायनान्समध्ये बसलेले शकुनी आहेत, त्यांनी केलेले हे काम आहे, असा संताप व्यक्त केला.


### अंबादास दानवेंची टिका

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी निधी वळवल्याच्या निर्णयावर सोशल मिडियावरती पोस्ट करू टीका केली आहे. त्यात म्हटले आहे की लाडक्या बहिणीचा हफ्ता भरायला सरकारने आदिवासींच्या वाट्याचे पैसे पळवले! सरकारी तिजोरी कोरडी होत चालली आहे! सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागासाठी मंजूर ३,९६० कोटींपैकी ४१० कोटी ३० लाख तसेच आदिवासी विकास खात्याला दिलेल्या ३,४२० कोटींच्या सहाय्यक अनुदानातून तब्बल ३३५ कोटी ७० लाख रुपये लाडकी बहिण योजनेसाठी खेचले! आदिवासी विभागाच्या वाट्याचे एकूण ७४६ कोटी रुपये पैसे सरकारने खेचून नेले! नियम: नियोजन आयोगाच्या नियमानुसार, आदिवासी आणि सामाजिक न्याय या दोन खात्यांना दिला जाणारा निधी त्या समाजाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ठरतो. हा निधी त्या संवर्गावरच खर्च करणे बंधनकारक असते तो इतर खात्यांमध्ये वळवता येत नाही, असे पोस्ट मध्ये म्हटले आहे.

# अणदूरचे रामचंद्र आलूरे यांना आदर्श संस्था चालक पुरस्कार जाहीर

**अणदूर, दि. ३ मे-**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील आदर्श सरपंच तथा शिक्षण प्रसारक मंडळ अणदूर चे सचिव रामचंद्र आलूरे यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श संस्था चालक पुरस्कार जाहीर झाला असून, याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. नामदार योगेश कदम गृहराज्यमंत्री यांच्या हस्ते, राज्याचे शालेय शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि. ७ मे रोजी सकाळी १० वाजता सोलापूर येथील हुतात्मा स्मृती मंदिर येथे राज्यस्तरीय संस्था चालक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे संस्थापक प्रा. डॉ. बापूसाहेब अडसूळ प्रदेशाध्यक्ष एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेने पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. या संस्थेअंतर्गत १० माध्यमिक शाळा, २ कनिष्ठ महाविद्यालय, १ वरिष्ठ महाविद्यालय, १ शाळा, ४ पूर्व प्राथमिक शाळा, ३ आर्थिक दुर्बल घटक वस्तीग्रह, २ मागासवर्गीय मुलींचे वस्तीग्रह, १ माध्यमिक रात्र शाळा कार्यरत असून २०२१ पासून आजतागायत सरपंच म्हणून कार्यरत, गतवर्षी राज्य शासनाचा आदर्श ग्रामपंचायत दहा लाखांचे बक्षीस, बालाघाट संस्थेचे संचालक, तुळजापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, लता मंगेशकर यांच्या स्मरणार्थ कला उपासक मंडळ, आदर्श संस्थाचालक जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित अशा विविध पदावर कार्यरत आहेत. शैक्षणिक, आरोग्य शिक्षण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, नैसर्गिक आपत्ती ग्रस्तांना सहाय महात्मा गांधी विचारांचा प्रचार आणि प्रसार, साने गुरुजी कथामाला व कुस्ती स्पर्धा या क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान असून त्यांचा कार्यकर्तृत्वाचा सन्मान होत असल्याने त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



# विदर्भ कोकण ग्रामीण बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे एकत्रीकरण

**सोलापूर, दि. २ मे-**

केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या एक राज्य एक ग्रामीण बँक या धोरणानुसार विदर्भ कोकण ग्रामीण बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँक या दोन्ही बँकेचे एक मे रोजी एकत्रिकरण करण्यात आले. बँकिंग क्षेत्राची कार्यक्षमता वाढवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे केंद्र सरकारने नमूद केले असून भारत सरकारने आपल्या राजपत्रामध्ये ग्रामीण बँकांच्या एकत्रीकरणाबाबत अधिसूचना जाहीर केल्याची माहिती बँकेचे व्यवस्थापक रमेश खाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या निर्णयानुसार देशातील २६ ग्रामीण बँकांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. देशातील १० राज्य व एक केंद्रशासित प्रदेशातील २६ प्रादेशिक ग्रामीण बँकांचे राज्य पातळीवर एकत्रीकरण करून ११ नवीन ग्रामीण बँका तयार झाल्या आहेत. केंद्राच्या या निर्णयामुळे देशातील ग्रामीण बँकांची संख्या ४३ वरून २८ झाली आहे. या निर्णयामुळे राज्यातील विदर्भ कोकण ग्रामीण बँक व महाराष्ट्र ग्रामीण बँक यांचे एकत्रिकरण करून महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र ग्रामीण बँक या नावाने एकच प्रादेशिक ग्रामीण बँक राहील. एकत्रीकरणापूर्वी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या १७ जिल्ह्यात ४२५ शाखा तर विदर्भ कोकण ग्रामीण बँकेच्या १७ जिल्ह्यात ३२३ शाखा कार्यरत होत्या. आता एक मे पासून नवीन 'महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ३४ जिल्ह्यात ७४८ शाखा झाल्या आहेत. बँक ऑफ महाराष्ट्र ही एकत्रित महाराष्ट्र ग्रामीण बँकेची पुरस्कृत बँक राहणार आहे. नवीन एकत्रित महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर, वाळूज महानगर, सिडको येथे राहणार आहे. तसेच सोलापूर, पुणे, लातूरसह १३ ठिकाणी क्षेत्रीय कार्यालये राहणार आहेत. सोलापूर क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत सोलापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांचा समावेश आहे. सोलापूर क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत ४४ शाखा कार्यरत आहेत यापैकी सोलापूर शहर व जिल्ह्यात ३५ शाखा कार्यरत आहेत. पूर्वाश्रमीची विदर्भ कोकण ग्रामीण बँक व पूर्वाश्रमीची महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा मिश्र व्यवसाय एकत्र होऊन नवीन एकत्रित महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा मिश्र व्यवसाय ४३ हजार कोटींचा झाला आहे. तसेच कर्मचारी संख्या ३००० इतकी झाली आहे. या पत्रकार परिषदेस दीपक डोलस उपस्थित होते.



# २०० कर्मचाऱ्यांनी उचलला १० टन कचरा

### संभाजी महाराज तलाव परिसरात स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

महापालिका घनकचरा विभागातील स्वच्छता कर्मचाऱ्यांनी छत्रपती संभाजी महाराज तलाव परिसरासह विजापूर रस्त्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अतिरिक्त आयुक्त रवी पवार हे स्वतः या मोहिमे दरम्यान उपस्थित होते. या स्वच्छता मोहिमेतून तब्बल १० टन कचरा उचलण्यात आल्याची माहिती महापालिका मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी दिली.

सोलापूर शहरात यापूर्वी महापालिकेच्या वतीने स्वच्छता मोहीम अभियानात तीन टप्प्यात व्हीआयपी रोडसह सर्वच मुख्य रस्ते, नंतर शहरातील शंभराहून अधिक अंतर्गत रस्ते आणि पुढील टप्प्यात विविध भाग घेऊन त्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. यानंतर आता पुन्हा शहरातील पर्यटन क्षेत्र आणि महत्त्वाचे भाग स्वच्छतेसाठी विशेष मोहिमेद्वारे हाती घेण्यात आले आहेत. यानुसार बुधवारी छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर तलाव) परिसर आणि विजापूर रोड येथे स्वच्छता मोहीम घेण्यात आली. या मोहिमेत तब्बल १९५ सफाई कामगार- कर्मचारी सहभागी झाले. या ठिकाणी उचललेला सुमारे १० टन कचरा हा महापालिकेच्या सहा आरसी गाड्यांमधून तुळजापूर रस्त्यावरील कचरा डेपो येथे नेण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहिमेत महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या नेतृत्वाखालील मुख्य आरोग्य निरीक्षक नागेश मेंडगुळे, नागटिळक, आरोग्य निरीक्षक आणि सफाई कर्मचारी सहभागी झाले होते.

### हा परिसर केला चकाचक

विजापूर रस्त्यावरील संपूर्ण कंबर तलाव काठ, तलाव परिसर, विजापूर रस्त्यावरील दर्गापासून ते राणी लक्ष्मीबाई उद्यान व परिसर, हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयाकडे जाणारा रस्ता व परिसर, वनविहाराकडे जाणारा रस्ता, उद्यानालगत खाद्यपदार्थ विक्री गाड्यांचा परिसर व विजापूर रोड हा संपूर्ण भाग स्वच्छ करण्यात आला. कंबर तलाव काठावर असलेले प्लास्टिक पिशव्या आणि त्यामधील कचरा, निर्माल्य, नारळाचे कवठे, गवत दगड व सर्वच प्रकारचा कचरा उचलून हा संपूर्ण परिसर चकाचक करण्यात आला.

# डिजिटल पत्रकारिता : वर्गणी, गुणवत्ता आणि विशिष्ट वाचकवर्गावर केंद्रीत

### डिजिटल माध्यमातील परिसंवादातील सूर

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. ३ मे-**

डिजिटल पत्रकारितेचा भविष्यातील मार्ग हा वर्गणी, गुणवत्ता आणि विशिष्ट वाचकवर्गावर केंद्रित असणार आहे. जाहिरातीतून टिकाव धरण्याचा पारंपरिक मार्ग आता पुरेसा राहिलेला नाही. विश्वासार्हता, पारदर्शकता आणि आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी माध्यम संस्थांना आता नव्या रणनीतीची गरज आहे, असे मत वरिष्ठ पत्रकार आणि संपादकांनी परिसंवादात व्यक्त केले.

जिओ वर्ल्ड सेंटर येथील जागतिक दृकश्राव्य आणि मनोरंजन शिखर परिषद, २०२५ मध्ये 'इव्होल्यूशन ऑफ डिजिटल न्यूज : स्टेइंग रिलीव्हेंट इन द एज ऑफ इन्फॉर्मेशन ओवरलोड' या विषयावर परिसंवाद झाला. यावेळी बिझनेस टुडेचे संपादक सिद्धार्थ झराबी यांच्या सूत्रसंचालन केले. चर्चेत मनीकंट्रोलचे कार्यकारी संपादक नलिन मेहता, द इंडियन एक्सप्रेस डिजिटलचे सीईओ संजय सिंधवानी, आरटी इंडियाचे कार्यकारी संपादक अशोक बजरिया सहभाग घेतला.

झराबी म्हणाले की, डिजिटल युगात वितरणाची साखळी आता केवळ काही मोजक्या तंत्रज्ञान कंपन्यांच्या हातात आहे, त्यामुळे कधी कधी त्या विशिष्ट ग्राहकांपर्यंत पोहोचतात, त्यांचे डेटा आणि अल्गोरिदम त्यांच्या ताब्यात आहेत. त्यामुळे पारंपरिक माध्यम संस्थांची भूमिका आणि त्यांचे अस्तित्व याबाबत बदलणाऱ्या संदर्भात विचार करण्याची गरज भासू शकते. डिजिटल माध्यमांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात क्रांती केली असली, तरी या बदलासोबत अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. सिंधवानी यांनी सांगितले की, डिजिटल युगात बातमी पोहोचवणाऱ्या पारंपरिक यंत्रणा मागे पडल्या आहेत. पूर्वी माध्यम संस्थांकडे कंटेंटपासून वितरणापर्यंत सर्व नियंत्रण होते. पण आता सर्च इंजिन्स, सोशल मीडिया आणि 'एआय' या तंत्रज्ञान कंपन्यांकडे ग्राहकांचे लक्ष आहे, त्यांच्याकडे डेटा आहे, आणि त्यांचे अल्गोरिदम्स निर्णायक ठरत आहेत.

मेहता म्हणाले की, आजचे युग हे 'न्यूज'ची व्याख्या पुन्हा लिहित आहे. पूर्वी संपादक ठरवत असत की जनतेने काय वाचावे. पण आजचा डिजिटल वापरकर्ता आपल्या गरजांनुसार कंटेंट शोधतो. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने बनवलेली बातमी आता अप्रासंगिक ठरू शकते. आता पत्रकारांना ग्राहक शोधावा लागतो. 'जर्नालिझम बाय डिफॉल्ट' चं युग संपलंय, असे त्यांनी स्पष्ट केले.

वापरकर्त्यांकडे आज इतकी माहिती आहे की कोणती बातमी खरी, अचूक आणि विश्वासार्ह याबाबत आव्हानात्मक परिस्थिती येवू शकते. सर्वच गोष्टी 'फॉरवर्ड' स्वरूपात फिरत आहेत. माहितीचा अतिप्रवाह आहे. डिजिटल माध्यमांवर प्रचंड माहिती उपलब्ध आहे. 'एआय'मुळे बातमी संकलनाचे स्वरूप बदलत चालले आहे. अनेक पूर्वनियोजित, डेटा-आधारित गोष्टी 'एआय' करू शकतो. पण दृष्टीकोन, मुलाखती, विश्लेषण हे मानवी मन आणि बुद्धीचेच काम आहे. त्यामुळे पत्रकारांनी आता अधिक कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे, असे सूर चर्चेत उमटला.

# कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून प्रत्येक घटकाला व्यासपीठ देण्याचे काम



### केंद्रीय राज्यमंत्री एल. मुरुगन

**जमीर काझी । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.३ मे-**

समाजाच्या कानाकोपऱ्यात पोहोचण्यासाठी कम्युनिटी रेडिओ हे अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला व्यासपीठ देण्याचे काम देशातील कम्युनिटी रेडिओ यांनी करावे, असे आवाहन केंद्रीय माहिती व प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी केले.

मुंबईत सुरू असलेल्या 'वेव्हज २०२५' या जागतिक परिषदेच्या निमित्ताने आठव्या राष्ट्रीय कम्युनिटी रेडिओ संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू, सहसचिव पृथुल कुमार, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशनच्या कुलगुरु डॉ. अनुपमा भटनागर आदी उपस्थित होते. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कम्युनिटी रेडिओ यांना इनोव्हेटिव्ह कम्युनिकेशन, प्रमोटिंग लोकल कल्चर, सस्टेनेबिलिटी मॉडेल अवॉर्ड्स यासारखे विविध पुरस्कार देऊन यावेळी सन्मानित करण्यात आले. राज्यमंत्री मुरुगन म्हणाले, कम्युनिटी रेडिओच्या कार्यक्रमांमध्ये स्थानिक समाजाच्या भावना, तेथील संस्कृती, कला, साहित्य, खानपान यांचे प्रतिबिंब पाहायला मिळते. वेव्हजच्या पार्श्वभूमीवर हे संमेलन होत असल्याने त्याला एक वेगळा आयाम प्राप्त झाला आहे. कम्युनिटी रेडिओच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, संस्कृतीवर्धन, ग्रामीण विकासासाठी काम होत आहे.

# शहर स्वच्छ, प्रगत बनवण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करू या

### आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे

### महाराष्ट्र दिनानिमित्त महापालिकेत ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

महापालिकेच्या स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते व ड्रेनेज दुरुस्ती, आरोग्य सेवा यांसारख्या प्रत्येक क्षेत्रात कामगारांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे असे सांगतानाच आपले सोलापूर शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि प्रगत बनवण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचा संकल्प करूया, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि सोलापूर महापालिका स्थापना दिनानिमित्त इंद्रभुवन येथे महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त रवी पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त किरणकुमार मोरे, मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर,मुख्य लेखापरीक्षक रूपाली कोळी, नगर रचना उपसंचालक मनिष भीष्णूरकर,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित,सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, नगर अभियंता सारिका अकुलवार,अग्निशमन दलाचे प्रमुख राकेश साळूंखे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अग्निशमन दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन नगर सचिव प्रवीण दतंकाळे यांनी केले. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे पुढे म्हणाले, स्मार्ट सिटी योजनेंतर्गत १७० एमएलडी क्षमतेचा उजनी-सोलापूर समांतर जलवाहीनी प्रकल्प अंतिम टप्प्यात आहे. हे काम मे २०२५ पूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न राहणार आहे , असे त्यांनी स्पष्ट केले. अमृत-१ ड्रेनेज प्रकल्प अंतर्गत शहरात २४६ कि.मी ड्रेनेज लाईनचे जाळे निर्माण झाले आहे व देसाईनगर येथे २० एमएलडी क्षमतेचा एसटीपी अंतिम टप्प्यात आहे.महाराष्ट्र सुवर्ण जयंती नागरोत्थान अभियान योजनेतर्गत २०७.५४ कि.मी. ड्रेनेज लाइन व देगाव येथे ४९ एमएलडी मलशुद्धीकरण केंद्रासाठी ४२९.३८ कोटींचा प्रकल्प मंजूर झाला असून, डिसेंबर २०२६ अखेर प्रकल्प पूर्ण होईल. अमृत २.० मध्ये ८९२.४२ कोटींचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.राष्ट्रीय स्वच्छ वायू उपक्रमांतर्गत ४६ कोटी निधी मंजूर असून, २५ किमी रस्ते पुनर्निर्माण, चौक सौंदर्यीकरण व हरित पट्टे यांचे काम प्रगतिपथावर आहे. पीएम ई-बस सेवा अंतर्गत १०० ई-बस मंजूर झाल्या असून, बुधवारी पेठ येथे डिपो व चार्जिंग सुविधा उभारली जात आहे. टप्प्याटप्प्याने आवश्यकतेनुसार बस उपलब्ध करून लवकरच ई-बस सेवा सुरु होईल.

- सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना २२ कोटींच्या अर्जित रजेच्या रकमांचे वितरण.
- १५५ कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली.
- ३०२ पदांची भरती प्रक्रिया पूर्ण केली आहे.
- ३१५ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना व ८४ अनुकंपाधारकांना नियुक्ती पत्र देण्यात आली आहेत. एनपीएस अंतर्गत २५ कोटी रुपयांचे प्रलंबित रक्कम खात्यावर जमा केली.
- ७०६ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना २२ कोटींच्या अर्जित रजेच्या रकमांचे वितरण केले आहे.

### या वर्षासाठी २०० कोटीं मिळकत कर वसुलीचे उद्दिष्ट

वार्षिक मालमत्ता कर वसुली मोहिमेत २०२५-२६ या वर्षासाठी जवळपास दोनशे कोटींचे रुपयांची वसुलीचे उद्दिष्ट असून नागरिकांनी वेळेत कर भरणा करून मनपास सहकार्य करावे.जनसेवा हीच ईश सेवा हे ब्रीद घेऊन सोलापूर महानगरपालिका नागरिकांना उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न करत आहे. उत्पन्न व खर्चामध्ये संतुलन राखत, शहर विकासासाठी सर्वांगीण योजना आखण्यात आल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अभिनेते अनिल कपूर यांना मातृशोक

**मुंबई** : अनिल कपूर, संजय कपूर आणि बोनी कपूर यांच्या आई निर्मल कपूर यांनी शुक्रवारी, २ मे रोजी मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.



निर्मल ९० वर्षांच्या होत्या. वृद्धकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्यावर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. निर्मल कपूर यांना अंतिम निरोप देण्यासाठी कपूर कुटुंबासह चित्रपट जगतातील अनेक प्रसिद्ध व्यक्ती आल्या होत्या. मागील काही महिन्यांपासून त्या आजारी होत्या. आरोग्याच्या समस्यांमुळे त्यांना अनेक वेळा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# पंढरपूर कॉरिडॉर सर्व्हेचे काम तीन आठवड्यात पूर्ण करणार

- जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली माहिती
- काशीच्या पथकाकडूनही पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ मे -**

विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील संभाव्य कॉरिडॉरमध्ये बाधित होणाऱ्या मालमत्ताधारकांचा बुधवार (ता. ७) पासून सर्वे करण्यात येणार आहे. हे काम तीन आठवड्यात पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आर्शिवाद यांनी शनिवारी येथे दिली.

येथील कॉरिडॉर संदर्भात स्थानिक रहिवासी, दुकानदार आणि महाराज मंडळींशी चर्चा केल्या नंतर जिल्हाधिकारी कुमार आर्शिवाद यांनी शनिवारी येथील पत्रकारांशी संवाद साधला. माहिती देताना



जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, भाविकांच्या सोयीसाठी व वारकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून विठ्ठल मंदिर परिसरात कॉरिडॉर तयार करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर तीन दिवसांपासून चर्चा आणि बैठका सुरू आहेत. या दरम्यान लोकांशी चर्चा करून आणि प्रत्येकाला विश्वासात घेऊन हे काम पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. कॉरिडॉरच्या कामाला गती मिळावी यासाठी आमचेही प्रयत्न सुरू आहेत. याचाच एक भाग म्हणून येत्या बुधवार पासून मंदिर परिसरातील रहिवासी आणि दुकानदार यांचा एक सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. सर्व्हे पूर्ण झाल्यानंतर संभाव्य आराखडा आणि पॅकेज तयार केले जाईल. त्या पॅकेजमधील सर्व माहिती बाधित लोकांना दाखवली जाईल. त्यानंतरच संपूर्ण आराखडा आणि पॅकेज सरकारकडे मान्यतेसाठी पाठवला जाईल.

आता पर्यंत सुमारे सातशे ते आठशे लोकांशी संवाद साधला आहे. यामध्ये सुमारे ऐंशी टक्के लोकांनी कॉरिडॉरला सकारात्मकता दर्शवली असल्याचे ही कुमार आशिर्वाद यांनी सांगितले. यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे,मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, व्यवस्थापक मनोज श्रोत्री आदी उपस्थित होते.

**✔ सर्व्हेमध्ये असणार चाळीस प्रश्नांचा समावेश**

प्रत्येक संभाव्य बाधित होणाऱ्या नागरिकांचा सर्व्हे केला जाणार आहे. यासाठी किमान चाळीस प्रश्न तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार सर्व्हे करण्यात येणार आहे. सर्व्हेचे हे काम तीन आठवड्यात पूर्ण होईल या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

**✔ काशीच्या पथकाने केली पाहणी**

विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील संभाव्य कॉरिडॉर कसा असावा यासाठी काशी येथील एक पथक शनिवारी पंढरपुरात आले होते. या पथकाने दिवसभर मंदिर परिसरातील ऐतिहासिक मठ,मंदिरे आणि समाधीची पाहणी केली. पुढील आठवड्यात हे पथक पुन्हा पंढरपुरात पाहणीसाठी येणार आहेत. त्यांचा अहवाल आल्यानंतर तोही नागरिकांपुढे सादर केला जाणार आहे.

**✔ प्रांताधिकारी इथापेंच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना**

मंदिर परिसरात १९८२ साली झालेल्या विस्थापित लोकांचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली जाणार आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर तो ही शासनाकडे पाठवला जाणार असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आर्शिवाद यांनी सांगितले.

# बलूच आर्मीचा धुडगूस

**अंतर्गत संघर्षाने सरकारची तारांबळ ● बलुचिस्तानमध्ये सरकारी इमारती जाळल्या**

### महामार्ग बंडखोरांच्या ताब्यात

◆ **क्वेट्टा, ३ मे**

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील सिंधमध्ये पाणीवाटपावरून स्थानिक नागरिकांचे महामार्गावर आंदोलन सुरू असताना बलुचिस्तानमधील कलात जिल्ह्यात बलुच लिबरेशन आर्मीने शनिवारी मोठ्या प्रमाणात शासकीय इमारतींची जाळपोळ केली. बलुच आर्मीच्या बंदुकधारी बंडखोरांनी बलुचिस्तानला स्वतंत्र करण्याची मागणी करीत क्वेट्टा-कराची महामार्ग रोखला, तसेच अनेक प्रवासी आणि मालवाहू वाहनांची तोडफोड केली.

कलात जिल्ह्यातील एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तवाहिनीला माहिती देताना सांगितले की, शनिवारी पहाटेच्या सुमारात बलुच आर्मीने शासकीय इमारतींना लक्ष्य करीत जाळपोळ केली. यात नॅशनल बँक ऑफ पाकिस्तानचे कार्यालय, स्थानिक न्यायालय आणि अनेक विभागांच्या कार्यालयांचा समावेश आहे. या आगीत इमारतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यानंतर बंदुकधारी बंडखोरांनी मोंगोचर भागातील अनेक रहिवासी इमारतींना आग लावली आणि क्वेट्टा- कराची महामार्ग रोखला. प्रवासी आणि मालवाहू वाहनांचीदेखील तोडफोड करण्यात आली. राष्ट्रीय महामार्गावरील





वाहनांची तपासणी केली आणि अनेक बस आणि कारमधून लोकांना बाहेर काढून चौकशी करण्यात आली. या भागात सध्या पोलिस आणि सैन्याची अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली, असून अजूनही बंदुकधारी बंडखोरांनी महामार्ग रोखला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### टोल नाक्यावर हल्ला, एकाचा मृत्यू

शुक्रवारी रात्री एका घटनेत दुचाकीवरून आलेल्या सशस्त्र लोकांनी एका चेकपोस्टवर हल्ला केला. यात टोल नाक्यावरील हक नवाज लांगोव्ह या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या एका घटनेत रस्त्यावर बांधलेला एक पूलही स्फोटात उडविण्यात आला. पूल कोसळण्याच्या घटनेत कोणीही जखमी झाले नाही.

### अनेक इमारतींवर मिळविला ताबा

पंजाबी वंशाच्या लोकांना लक्ष्य करण्यासाठी बलुच बंडखोरांनी महामार्गावर वाहनांची तपासणी केली. सशस्त्र गटाने अनेक इमारती आपल्या ताब्यात घेतल्या, यामध्ये शासकीय इमारतींचादेखील समावेश होता. सुरक्षा दलाचे पथक पोहोचताच त्यांनी पळ काढला. पाकिस्तानी सुरक्षा दलांना कोणालाही पकडता आले नाही.

# पाकिस्तानने ओतले आगीत तेल



- अब्दाली बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी
- ४५० किलोमीटर मारा करण्याची क्षमता

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही देशांतील तणाव शिगेला पोहचला असतानाच पाकिस्तानने अब्दाली नावाच्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी घेतली आहे. आधीच तणाव असताना पाकिस्तानचे हे कृत्य चिथावणी देणारे आणि तणावात भर घालणारे असल्याची टीका भारताने केली आहे.

पर्यटकांवरील हल्ल्यानंतर भारताने गुन्हेगारांना धडा शिकविण्यासाठी अत्यंत कठोर उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. या घटनेचा जगभरातून निषेध व्यक्त होत आहे. सीमेवर तणाव असताना पाकिस्तानने जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या अब्दाली या बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची अज्ञात स्थळावरून चाचणी घेतली आहे. ४५० किलोमीटरपर्यंत मारा करण्याची अब्दालीची क्षमता आहे. अत्यंत गंभीर आणि स्फोटक परिस्थितीत क्षेपणास्त्र चाचणी म्हणजे चिथावणी देणारे कृत्य होय, अशी प्रतिक्रीया भारताने व्यक्त केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# महात्मा फुले आरोग्यदायी योजनेमध्ये बदल!

**नातेवाईकांना आरोग्य विभागाकडे करता येईल ऑनलाईन तक्रार**

**कोल्हापूर, ३ मे**

शासकीय यंत्रणेने योग्य नियंत्रण ठेवल्यास आपोआप हॉस्पिटल्सना चांगले काम करावे लागेल. यासाठी मोबाईल ॲपची निर्मिती करत आहोत. यामुळे पेशंट किंवा नातेवाईकांकडून ऑनलाईन आलेली तक्रार थेट आरोग्य विभागाला येईल. हॉस्पिटलची तक्रार देखील ऑनलाइन पद्धतीने नातेवाईकाला देता येणार आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी कोल्हापूरमध्ये दिली. गेल्या पाच वर्षात १ हजार ७ तक्रारी महात्मा फुले जनआरोग्य योजनेसंदर्भात आणि हॉस्पिटल संदर्भात आल्या होत्या, असे आबिटकर म्हणाले. हॉस्पिटलमधील बेडची उपलब्धता मोबाईल ॲपद्वारे लोकांना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

महात्मा फुले आरोग्यदायी योजनेत काही महत्त्वाचे बदल आम्ही केले आहेत. त्याची अंमलबजावणी आता सुरू झाली आहे. पुढील एक महिन्यांमध्ये या योजनेतील आर्थिक मदतीमध्ये वाढ केली जाणार असल्याचे ते म्हणाले. या योजनेत एकही रुपया पेशंटकडून घ्यायचा नसताना दुर्दैवाने काही हॉस्पिटल पेशंटकडून पैसे घेत असल्याचे समोर आले आहे. त्या संदर्भात काही तक्रारी आल्या होत्या. अशा तक्रारींवर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कोल्हापूरमध्ये चार हॉस्पिटलवर अशी कारवाई झाली असून राज्यात देखील ही कारवाई सुरू होईल, असे आबिटकर यांनी सांगितले.

**सर्वच निवडणुका एकत्र लढविणे अपेक्षित**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसंदर्भात बोलताना ते म्हणाले की, राज्यात महायुतीचे सरकार आहे. त्यामुळे जिल्ह्यात देखील सर्वच निवडणुका एकत्रित लढवणं अपेक्षित आहे. सहकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील आम्ही एकमेकांच्या समन्वयाने लढलो तर राज्याचे चित्र दिसलं ते जिल्ह्यात देखील दिसेल, असे ते म्हणाले.

### व्याप्त काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेच्या भागात पर्यटन बंदी

**इस्लामाबाद, ३ मे**

पीओकेचे पंतप्रधान चौधरी अन्वरुल हक यांनी सर्वपक्षीय बैठकीनंतर जारी केलेल्या आदेशानुसार, नियंत्रण रेषेजवळ राहणाऱ्या रहिवाशांना अन्न आणि आवश्यक वस्तूंचा साठा करण्यास सांगितले आहे. नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेच्या इतर लगतच्या भागात पर्यटकांचा प्रवेश बंदी करण्यात आली आहे. तसेच जाहीर केलेल्या अनेक उपाययोजनांमध्ये पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरमधील धार्मिक मदरसे बंद करणे, तसेच लष्करी संघर्ष झाल्यास करावयाच्या मदत उपाययोजनांना पाठिंबा देण्यासाठी १ अब्ज रुपयांचा आपत्कालीन प्रतिसाद निधी स्थापन करणे यांचा समावेश होता. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानने सीमेवर सलग आठ वेळा गोळीबार केला आहे. भारताने आपल्या लष्कराला पूर्ण ऑपरेशनल स्वातंत्र्य दिल्यानंतर, पाकिस्तानातून आता दावे करण्यात येत आहेत की, भारत त्यांच्यावर हल्ला करणार असल्याची गुप्तचर माहिती त्यांच्याकडे आहे.

# लैराई देवीच्या यात्रेत चेंगराचेंगरी, ७ ठार, ७५ भाविक जखमी

**मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांचा चौकशीचा आदेश, अफवा उडाल्याने झाला घात**

◆ **पणजी, ३ मे**

उत्तर गोव्यातील शिरगावमध्ये लैराई देवीच्या यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत दोन महिलांसह सात भाविकांचा मृत्यू झाला, तर ७५ जण जखमी झाले. जखमी नागरिकांवर गोवा येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि म्हापसा येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे. पणजीपासून ४० किमीवर अंतरावर ही घटना झाली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले आणि घटनेच्या चौकशीचे आदेश दिले.

राज्याचे पोलिस महासंचालक आलोक कुमार यांनी सांगितले की, शुक्रवारपासून सुरू झालेल्या लैराई देवीच्या यात्रेसाठी राज्यांसह महाराष्ट्र, कर्नाटकमधून ४० हजार भाविक आले होते. शनिवारी



सकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली असता, उतारावरून काही भाविक खाली पडले, यावेळी विजेचा धक्का लागल्याची अफवा उडाली आणि चेंगराचेंगरीची घटना झाली. दरम्यान गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी घटनेचा आढावा घेतला असून चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या भाविकांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली.

**चेंगराचेंगरीची घटना दुःखदः राष्ट्रपती मुर्मू**

राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, लैराई देवी मंदिरात वार्षिक यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत काही भाविकांचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. सर्व शोकाकुल कुटुंबांना मी माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करते. ◂(वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदींनी व्यक्त केल्या संवेदना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, शिरगाव येथील चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर जीवितहानीबद्दल दुःख झाले. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले त्यांच्याबद्दल संवेदना. या घटनेत जखमी झालेले भाविक लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना करतो. मुख्यमंत्री आणि प्रशासनाशी माझे बोलणे झाले असून अपघातग्रस्तांना सर्वोतोपरी मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

### पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी श्रीलंकेला पळाल्याचा संशय

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याशी संबंधित संशयित दहशतवादी विमानात असल्याची माहिती शनिवारी भारताच्या गुप्तचर यंत्रणेकडून मिळाली. यानंतर श्रीलंकन पोलिसांनी चेन्नईवरून कोलंबोकडे जाणाऱ्या विमानाची बंदरनायके आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानानची व्यापक सुरक्षा तपासणी करण्यात आली.

कोलंबोला जाणाऱ्या श्रीलंकेच्या विमानात लष्कर-ए-तोयबाचे दहशतवादी असल्याचा दावा करणारा ईमेल अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर चेन्नई विमानतळावर सुरक्षा वाढवण्यात आली. विमान कोलंबोला रवाना झाल्यानंतर हा ईमेल आला. विमानाची कसून तपासणी करण्यात आली. मात्र त्यात कोणताही संशयास्पद व्यक्त आढळला नाही.

श्रीलंकेच्या एअरलाईन्सने निवेदनात भारताला पाहिजे असलेला तो संशयित दहशतवादी हा चेन्नई-कोलंबोच्या विमानात नसल्याचे सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# अँथनी अल्बानीज दुसऱ्यांदा पंतप्रधान

**ऑस्ट्रेलियात सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल जाहीर**

◆ **मेलबर्न, ३ मे**

ऑस्ट्रेलियामध्ये शनिवारी पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी मजूर पक्षाचा विजय झाला. यामुळे पक्षाचे नेते आणि विद्यमान पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांचा दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाचा मार्ग मोकळा झाला. या निवडणुकीत कंझर्व्हेटिव्ह पक्षाचा पराभव झाला आहे. पंतप्रधान म्हणून सलग दुसऱ्यांदा तीन वर्षांचा कार्यकाळ जिंकणारे अल्बानीज हे पहिले ऑस्ट्रेलियन ठरले.



ऑस्ट्रेलियन संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या प्रतिनिधीगृहाच्या १५० जागांसाठी शनिवारी निवडणूक पार पडली. त्यानंतर झालेल्या मतमोजणीत मजूर पक्षाचे सर्वाधिक उमेदवार निवडून आहे. कनिष्ठ सभागृहासाठी आवश्यक असलेले बहुमत अँथनी अल्बानीज यांच्या पक्षाला मिळाल्याने त्यांचीच दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवड होणे निश्चित आहे. या निवडणुकीत महागाई आणि घरांची कमतरता हे मुख्य मुद्दे होते. मतदारांनी अल्बानीज यांच्यावर विश्वास दाखवत त्यांच्या पक्षाच्या बहुतांश उमेदवारांना निवडून दिले. यावेळी वरिष्ठ सभागृहाच्या ७६ पैकी ४० जागांसाठी मतदान झाले, तेथेदेखील मजूर पक्षाचे सर्वाधिक उमेदवार निवडून आले.

**मोदींनी दिल्या शुभेच्छा**

अँथनी अल्बानीज यांची ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान म्हणून पुन्हा निवड झाल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी पुढे म्हटले की, ऑस्ट्रेलियासोबतची भागीदारी आणखी दृढ करण्यास भारत उत्सुक आहे. ◂(वृत्तसंस्था)

# मोदी-शाह मला बॉम्ब द्या, मी आत्मघाती बॉम्बर होण्यास तयार

**कर्नाटकचे गृहनिर्माण, अल्पसंख्याक कल्याण मंत्र्यांचे प्रतिपादन**

**बेंगळुरू, ३ मे**

पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पृष्ठभूमीवर, मंत्री जमीर अहमद खान यांनी म्हटले आहे की जर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी परवानगी दिली तर ते स्वतः आत्मघाती बॉम्बर म्हणून शेजारी देशाविरुद्ध युद्ध करण्यास तयार आहे, असे कर्नाटकचे गृहनिर्माण आणि अल्पसंख्याक कल्याण मंत्री बी.झेड. झमीर अहमद खान यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी मला संधी दिली तर मी सीमेवर जाऊन लढायला तयार आहे. आपण सर्व भारतीय आहोत. आपण हिंदुस्थानी आहोत. आमचा पाकिस्तानशी काहीही संबंध नाही. पाकिस्तान नेहमीच आपला शत्रू देश राहिला आहे. मी पाकिस्तानात जाऊन लढायला तयार आहे. मोदी, शहा मला एक आत्मघातकी बॉम्ब द्या, मी तो बांधून पाकिस्तानात जाऊन हल्ला करेन, असे व्हायरल व्हिडीओमध्ये कर्नाटक सरकारचे मंत्री जमीर खान म्हणत आहेत.

# चारधाम यात्रेसाठी धावणार भारत गौरव ट्रेन

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

चार धामला भेट देऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी भारतीय रेल्वेने एक मोठी घोषणा केली आहे. प्रत्यक्षात, रेल्वे चारधाम यात्रेसाठी भारत गौरव ट्रेन चालवणार आहे. ही ट्रेन २७ मे रोजी दिल्लीच्या सफदरजंग स्टेशनवरून निघेल आणि १७ दिवसांत प्रवास पूर्ण करेल. भारत गौरव डिलक्स टूरिस्ट ट्रेन भारतीय रेल्वे चालवणार आहे.

याद्वारे बद्रीनाथ, जगन्नाथपुरी, रामेश्वरम आणि द्वारका येथे प्रवास करता येईल. या कालावधीत नरसिंह मंदिर, जोशीमठ, ऋषिकेश, माना गाव, पुरी आणि चंद्रभागा



समुद्रकिनारे, कोणार्क सूर्य मंदिर, रामेश्वरममधील रामनाथ स्वामी मंदिर, धनुषकोटी, द्वारका येथील नागेश्वर ज्योतिर्लिंग आदी तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे बनारसमधील काशी विश्वनाथ मंदिर, पुण्यातील भीमाशंकर आणि नाशिकमधील त्र्यंबकेश्वर मंदिरही दाखविण्यात येणार आहे.

अशा गाड्या यापूर्वी दोनदा चालवण्यात आल्या आहेत. धार्मिक स्थळांना जोडण्यासाठी अशा गाड्या चालवल्या जातात. अशा गाड्या पर्यटन आणि धार्मिक स्थळांना एकाच धाग्यात जोडण्यासाठी चालवल्या जातात, रेल्वेचे कार्यकारी संचालक दिलीप कुमार म्हणाले. ट्रेनमध्ये १५० जागा उपलब्ध आहेत. या जागा प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर बुक केल्या जातील.

सविस्तर माहिती आयआरसीटीसीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. यावेळी एकूण प्रवास १७ दिवसांत ८४२५ किलोमीटरचा होईल. यामध्ये एसी क्लासमध्ये प्रवास, तीन स्टार हॉटेलमध्ये राहणे आणि शाकाहारी जेवण यांचा समावेश आहे. सर्व प्रवाशांचा विमा उतरवला जाईल. पर्यटक ट्रेनमध्ये अनेक आधुनिक आरामदायी सुविधा देण्यात आल्या आहेत. ट्रेनचे संचालन आणि तिकिटांची विक्री आयआरसीटीसी वेबसाइटद्वारे केली जाईल. ◂(वृत्तसंस्था)



रोखठोक

दिनेश गुणे

# सेवा पंधरवड्याच्या मागे आणि पुढे

पंतप्रधानपदाची सूत्रे होती घेतल्यानंरच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशवासीयांना उद्देशून केलेल्या पहिल्या भाषणात सरकारी यंत्रणांना एक इशारावजा संदेश दिला होता. यापुढे कामकाजात 'चलता है'; संस्कृती खपवून घेतली जाणार नाही, 'मला काय त्याचे' ही त्रयस्थ भावनाही चालणार नाही आणि कार्यक्षमता दाखविता येत नसेल तर अशा कर्मचाऱ्यांनी सरळ बाजूला व्हावे, असा तो खरमरीत इशारा जेव्हा मोदी यांनी दिला, तेव्हा देशातील तमाम नोकरशाहीला आपल्या कर्तव्यांची, जबाबदारीची, संस्कारांची आणि कार्यसंस्कृतीची बहुधा प्रथमच आठवण झाली होती. पुढे काही दिवस सरकारी कार्यालयांच्या कामकाजात कमालीची शिस्त आली. वेळेवर कार्यालयात दाखल होणे, ठरलेल्या वेळेत कामाचा निपटारा करणे, जनतेच्या कोणत्याही कामासाठी खेटे घालण्याची वेळ येणार नाही याची काळजी घेणे आणि सरकारी कर्मचारी हा जनतेचा सेवक आहे या भावनेने काम करणे हे आपले कर्तव्य, जबाबदारी आणि असे सारे काही आहे, या जाणिवा जाग्या झाल्या होत्या. असे काही काळ चालले, पण आता त्याला जवळपास दहा वर्षे उलटून गेली आहेत. गेल्या दहा वर्षांत कार्यसंस्कृतीच्या पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्याने कार्यसंस्कृती नावाच्या शिस्तीचा निचरा होऊन गेल्याचा जुना अनुभव जनमानसात नव्याने जिवंत झाला आहे आणि 'सरकारी काम म्हणजे वाट बघत थांब' ही म्हण पुन्हा एकदा जनतेच्या अंगवळणी पडू लागली आहे. कोणत्याही सरकारी कार्यालयांच्या आवारात कार्यालयाचे कामकाज सुरू होण्याआधीच गोळा होणारी गर्दी, सराईतांची धावपळ, केविलवाण्या चेहऱ्याने आपला नंबर येण्याची प्रतीक्षा करणारे हतबल सामान्य नागरिक आणि कामकाज सुरू करण्याची वेळ उलटून गेल्यानंतरही कार्यालयांतील दालनात अधिकाऱ्याच्या प्रतीक्षेत असलेल्या रिकाम्या खुर्च्या हे जुने दृश्य आता सर्रास दिसू लागले आहे. सरकारी कामकाजाचा खाक्या माहीत असलेला एक सराईत वर्ग जनसामान्यांतदेखील असतो. त्याला हे दृश्य सवयीचे असते, पण सहसा अशा कार्यालयांची पायरी न चढणारी व्यक्ती पंतप्रधानांच्या त्या इशाऱ्यावर विश्वास ठेवून काही अपेक्षेने कार्यालयांत जाते, तेव्हा बऱ्याच ठिकाणी हेच दृश्य पाहण्याचा प्रसंग त्याच्यावर ओढवत असेल, तर त्याची सरकारी कामकाजाविषयीची भावना कशी होत असेल याची कल्पना करणे फारसे अवघड नाही.

कदाचित म्हणूनच, महाराष्ट्राच्या सरकारी कार्यसंस्कृतीला शिस्त लावण्यासाठी दहा वर्षांपूर्वी, २८ एप्रिल २०१५ या तारखेपासून महाराष्ट्रात एक नवा कायदा अस्तित्वात आला. राज्यातील नागरिकांना राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत पुरविल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व कालबद्ध पद्धतीने प्राप्त व्हाव्यात यासाठी तत्कालीन व आजचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व पाठपुराव्यातून या कायद्याचा जन्म झाला आणि या कायद्याने सामान्य नागरिकांना सरकारी सेवा मिळविण्याचा हक्क बहाल केला. गेल्या २८ तारखेला, जेमतेम आठवडाभरापूर्वी या कायद्याचा दशकपूर्ती सोहळाही राजधानी मुंबईत पार पडला आणि पुन्हा एकदा सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये सेवाभावाची जाणीव जागी करण्यासाठी सेवा पंधरवडाही जाहीर करण्यात आला. खरे म्हणजे, सरकारी कर्मचारी त्याच्या कर्तव्याच्या काळात सदैव सेवातत्परच असला पाहिजे, असे कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीची आचारसंहिता सांगते. त्यामुळे एखादा विशिष्ट पंधरवडा जाहीर करून त्या कालावधीत नागरिकांना सुलभतेने सेवा देण्याची सरकारी मोहीम राबविण्याची वेळ येते, तेव्हा अन्य काळातील कार्यसंस्कृतीचे पितळ आपोआपच उघडे पडत असते.

सरकारी कर्मचारी हा कर्तव्यपूर्तीसाठी नागरिकांना उत्तरदायी असतो, नागरिकांची सेवा करणे ही त्याची कर्तव्ये आणि जबाबदारी असते, असे हा क्रांतिकारी कायदा स्पष्ट करतो. शासनाच्या सेवा सामान्य माणसास सहजपणे उपलब्ध होत नाहीत अशी सातत्याने होत असलेली तक्रार दूर करण्यासाठी अशा कायद्याची गरज असल्याचे सरकारचे मत होते. या परिस्थितीत बदल व्हावा आणि नागरिकांना कालमर्यादित सुलभ आणि तत्पर सेवा निरपेक्षपणे दिली जावी अशी या कायद्याची कर्मचाऱ्यांकडून अपेक्षा आहे. विशेष म्हणजे, त्याआधी सन २००५ मध्ये अशाच उद्देशाने एक कायदा तयार करण्यात आला होता. दप्तरदिरंगाई हा सरकारी कामकाजाचा पठडीबाज खाक्या असल्याने कामे खोळंबतात आणि ती पूर्ण करून घेण्यासाठी नागरिकांना कार्यालयांत वारंवार खेटे घालावे लागतात. या काळात त्यांना आणखीही जे काही करावे लागते, त्यामध्ये 'वजन' ठेवणे ही बाब सामान्यांनाही ठावूक असते. एवढे करूनही कामे वेळेवर होत नसल्याच्या अनुभवाने हताश दिसणारे अनेक चेहरे कार्यालयांच्या आवारात आधाराच्या शोधात वणवण करत असतात. ही परिस्थिती टाळावी यासाठी २००५ मध्ये तयार करण्यात आलेला दप्तरदिरंगाईविरोधी कायदा फारसा प्रभावी ठरला नाही, हे लक्षात आल्याने नागरिकांनाच सेवा मिळविण्याचा हक्क प्रदान करणारा कायदा करावा असे तेव्हा फडणवीस सरकारने ठरविले. आता पुन्हा फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात महायुतीचे सरकार सत्तेवर असल्याने, सेवा हक्क कायद्याचा आणि त्याच्या अंमलबजावणीचा मागोवा घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. या कायद्याच्या दशकपूर्ती निमित्ताने जाहीर करण्यात आलेला सेवा पंधरवडा सध्या राज्याच्या सर्व सरकारी कार्यालयांत सुरू आहे, याची जाणीव जनतेस व्हावी, सेवा मिळविण्याचा हक्क बजावण्यासाठी या पंधवड्यात तरी जनतेने जागरूकपणे पुढे यावे, हा या पंधरवड्यातील मोहिमेचा उद्देश असावा. म्हणूनच, एकूणच सरकारी कार्यालयांतील कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीचा आणि कार्यशैलीची चौकट आखण्याच्या प्रयत्नांचा मागोवा घेणे गरजेचे आहे.

सेवा हक्क कायद्याच्या अंमलबावणीसंबंधीची एक नियमावली २०१६ च्या अखेरीस प्रसिद्ध करण्यात आली आणि त्यापाठोपाठ सेवा हक्क आयुक्तांचीही नियुक्ती



करण्यात आली. असा काही कायदा अस्तित्वात आहे, त्याने सामान्य नागरिकांस काही हक्क प्रदान केले आहेत आणि त्याचा वापर करून सरकारी सेवा हक्काने प्राप्त करून घेण्याची हिंमत सामान्यांना बहाल केली आहे, याची कल्पना बहुधा फारच थोड्याजणांना असावी. नागरिकांची सेवा हे सरकारी कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे, हे सेवा हक्क आयोगाचे घोषवाक्य आहे, हेही फारच थोड्यांना ठावूक असावे. कदाचित, आयोगाच्या या घोषवाक्याचे पालन करणे ही आपली जबाबदारी आहे याची जाणीव सरकारी कर्मचाऱ्यांत रुजविणे हाच या घोषवाक्याचा उद्देश आहे, आणि त्यानुसार कर्मचाऱ्यांनी आपली कार्यशैली आखावी हीच या आयुक्तालयाची किंवा आयोगाची अपेक्षा आहे. कारण या कायद्यान्वये शासनाचे सर्व विभाग नागरिकांना विहित कालावधीत संपूर्ण सेवा देण्यासाठी बांधील आहेत. अशी सेवा न मिळाल्यास त्याविरुद्ध दाद मागण्याची मुभादेखील या कायद्याने नागरिकांस दिली आहे, हेही अनेकांस ठावूक नसावे. कदाचित त्यामुळेच, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात व्हावी यासाठी नव्या दमाने आखणी सुरू झाली आहे. सर्वकाळ सेवेसाठी तत्पर असणे कर्मचाऱ्यांच्या अंगवळणी पडावे यासाठीच कदाचित सेवा पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवासंस्कृतीसंबंधीच्या आचारसंहितेचा मागोवा घेणे उचित ठरेल. सुमारे ४६ वर्षांपूर्वी, सन १९७९ मध्ये राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम या नावाची एक पुस्तिका प्रसिद्ध केली होती. पुढे या नियमांतही वेळोवेळी नव्या सुधारणा व नव्या तरतुदीही समाविष्ट करण्यात आल्या. बहुधा अखेरची सुधारणा ३१ डिसेंबर २०१६ पर्यंतच्या काळात करण्यात आल्याने, ही नियमावली पुरेशी अद्ययावत मानता येईल. यामध्ये शासकीय कर्मचाऱ्याने पाळावयाची नीतितत्त्वे, माहितीचा अधिकार अधिनियमान्वये शासकीय माहिती पुरविणे, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळणुकीस प्रतिबंध आणि मुलांना नोकरीस ठेवण्यास प्रतिबंध या नव्या तरतुदींचा प्रामुख्याने समावेश आहे. अशी काही नियमावली असावी ही संकल्पना नवी नाही. १९३२ मध्येच अस्तित्वात आलेले नागरी सेवा वर्तणूक नियम आणि मध्य प्रदेश, हैदराबादमधून आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांस लागू असलेले सेवा नियम यांचे एकत्रीकरण करून ही नवी, सुधारित नियमावली तयार करण्यात आली. यातील ज्या काही नियमांची माहिती सर्वसामान्य जनतेस असणे आवश्यक आहे, त्यामध्ये, हुंडा घेण्यास प्रतिबंध, मादक द्रव्यांचे सेवन करण्यास प्रतिबंध आणि मागासवर्गातील कर्मचाऱ्यांस त्यांच्या खऱ्याखुऱ्या गाऱ्हाण्यांसाठी संबंधित मंत्र्याकडे दाद मागण्यास मुभा देणारा नियम महत्त्वाचा आहे. प्रत्येक शासकीय कर्मचारी आपल्या कर्तव्याप्रति नितांत सचोटी राखेल, कर्तव्यपरायणता दाखवेल आणि शासकीय कर्मचाऱ्यास अशोभनीय ठरेल अशी कोणतीही कृती करणार नाही, असाही या नियमावलीचा दंडक आहे. प्रत्येक कर्मचारी सार्वजनिक हिताचेच निर्णय घेण्यास बांधील असेल व सार्वजनिक साधनसंपत्तीचा कार्यक्षमतेने, परिणामकारक रीतीने व काटकसरीने वापर करण्यावर त्याचा कटाक्ष असेल, अशीही या नियमावलीची अपेक्षा आहे. नागरी सेवक या पदाचा कोणत्याही वैयक्तिक किंवा आर्थिक लाभासाठी वापर केला जाणार नाही किंवा कोणत्याही प्रकारे कुटुंबास, मित्रांना किंवा संबंधितांना आर्थिक वा भौतिक लाभ मिळवून देणार नाही, तर केवळ गुणवत्तेच्या निकषावरच सारे निर्णय घेणे त्याच्यावर बंधनकारक राहील, असे ही नियमावली सांगते. या नियमावलीचे काटेकोर पालन होते किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी पर्यवेक्षीय पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली आहे. तशी खात्री करताना, हा अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सचोटीची आणि कर्तव्यपरायणतेची खात्री करून घेण्यासाठी शक्य असलेल्या सर्व उपाययोजना करेल, असेही मार्गदर्शक तत्त्व या नियमावलीत समाविष्ट आहे. कोणताही शासकीय कर्मचारी या नियमावलीतील तरतुदीबाहेर जाऊन कोणतीही देणगी स्वतः स्वीकारणार नाही किंवा त्याच्या कोणत्याही कुटुंबीयास किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस देणगी स्वीकारण्यास परवानगी देणार नाही. त्याबरोबरच कोणत्याही व्यापारी, व्यावसायिक किंवा तत्सम संस्था संघटनांकडून मुक्तहस्ताने केलेला पाहुणचार किंवा वारंवार केला जाणारा पाहुणचार स्वीकारणेही टाळेल, असेही या नियमावलीने बंधनकारक ठरविले आहे.

गेल्या २८ तारखेपासून येत्या १२ मे पर्यंत राज्यात सेवा पंधरवडा राबविला जात आहे. तसा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या काळात जनतेशी संबंधित असणाऱ्या, विशेषतः महसूल, ग्रामविकास, नगरविकास, कृषी, आदिवासी विकास, सार्वजनिक आरोग्य, ऊर्जा, आदी विभागांसह सर्व शासकीय विभागांतील सेवा सर्वसामान्य जनतेस विनाविलंब आणि कर्तव्यभावनेने उपलब्ध करून द्याव्यात व नागरिकांच्या प्रलंबित अर्जविनंत्यांचा तत्परतेने निपटारा करावा असे आदेशही शासनाने जारी केले आहेत. शासकीय कामकाजाकरिता सरकारी कार्यालयांत भेट देणाऱ्या नागरिकांस साधारणतः जी कागदपत्रे सोबत बाळगावी लागतात आणि त्यापैकी कोणतेही दस्तावेज सोबत नसतील तर कामे होतच नाहीत, अशी कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचे विनंती अर्ज विनाविलंब मंजूर करून अशा कामांचा तत्काळ निपटारा करावा, जनतेस खेटे घालण्याची वेळ येणार नाही अशा रीतीने कामकाजाची आखणी करावी, असेही या आदेशाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे. हीच कामे विहित वेळेत पूर्ण करता यावीत यासाठी २०१५ मध्ये 'आपले सरकार' नावाचे एक वेब पोर्टलही तयार करण्यात आले होते. या पोर्टलमुळे जनतेस आपली कामे विनाविलंब आणि हेलपाटे न घालता करून घेता येतील अशी सरकारची अपेक्षा होती. मात्र, ही व्यवस्था फारशी उपयुक्त ठरलेली नाही, हे आता सरकारच्या ध्यानी आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सेवा हक्क कायदा दशकपूर्तीच्या निमित्ताने या पोर्टलवरील कामकाजाचाही आढावा घेतला, आणि या पोर्टलवरील तक्रारी, अर्जांचा विहित कालमर्यादेत सक्षम अधिकाऱ्यांकडूनच निपटारा होत नसल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली.

तत्पर सेवा ही आपली कार्यसंस्कृती आहे आणि आपण ती जपण्यासाठी कटिबद्ध आहोत, याची जाणीव करून देणारी पहिली नियमावली राज्यात जारी झाली, त्याला आणखी सात वर्षांनी शंभर वर्षे पूर्ण होतील. या नऊ दशकांहूनही अधिक काळात, सेवासंस्कृती आणि सेवा नियमावलीची सरकार दप्तरी काय स्थिती आहे, हेच या निमित्ताने स्पष्ट झाले आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या जबाबदारीचे पालन करताना आपण जनतेचे सेवक आहोत ही जाणीव ठेवून व जनतेची कामे करणे हे आपले कर्तव्य, जबाबदारीच आहे हे लक्षात घेऊन कामे केली पाहिजेत, ही अपेक्षा असते. मात्र, कर्मचाऱ्यांना सातत्याने कोणत्या ना कोणत्या निमित्ताने या जबाबदारीची जाणीव करून द्यावी लागते. खुद्द सरकारकडून ते काम केले जातेच, पण सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनादेखील अधूनमधून अशी जाणीव करून देणाऱ्या मोहिमा राबवत असतात. महाराष्ट्रातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या एका संघटनेमार्फत अशीच एक अभिनव मोहीम अधूनमधून राबविली जाते. 'पगारात भागवा' या अभिनव मोहिमेचा संदेश नेमका काय आहे, हे उकल करून सांगण्याची गरज नाही. वेगवेगळे वेतन आयोग, अधूनमधून सरकारकडून केली जाणारी भत्तेवाढ आदी कारणांमुळे सरकारी कर्मचाऱ्यास आपल्या उपजीविकेस पुरून उरेल एवढे वेतन मिळत असल्याने त्या वेतनातूनच आपल्या उपजीविकेचा खर्च भागवावा, असा संदेश या मोहिमद्वारे दिला जातो.

थोडक्यात, जनतेच्या सेवकाने जनतेची कामे करून देण्याकरिता जनतेच्या खिशात हात घालू नये, अशी या मोहिमेची अपेक्षा असते. या संघटनेने आखून दिलेली ही एक कार्यसंस्कृती हा अनेकदा चर्चेचा विषय झाला असून अशी गळ घालण्याची वेळ सरकारी कर्मचाऱ्यांच्या संघटनेवर का यावी याचे कोडे सर्वसामान्यांना अनेकदा उकललेले नाही. मात्र, असे काही उपक्रम सुरू झाले, की सरकारी कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये, सेवा संस्कृती, कार्यशैली आदी अनेक मुद्यांची समाजात चर्चा होत असते. आपली जनमानसातील प्रतिमा जपणे हे कोणत्याही यंत्रणेचे कर्तव्य असते. सरकारी कर्मचारी त्यास अपवाद नाहीत. या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठीच सरकारही प्रयत्नशील असते. सेवा हक्क कायद्याच्या दशकपूर्तीच्या निमित्ताने याचा मागोवा घेताना, सुमारे शंभर वर्षांपासून कार्यशैलीवर संस्कार घडविण्याच्या प्रयत्नांच्या पाऊलखुणा सापडून गेल्या. ही वाटचाल अशीच सुरू राहणार का, हे यापुढे संबंधित यंत्रणांनाच ठरवावे लागेल.

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

## रामदासजी, त्या शालीची ऊब अजून कायम आहे

अक्षयतृतीया, बुधवार, ३० एप्रिल २०२५. डॉ. रामदासजी आंबटकर अनंताच्या प्रवासाला शांतपणे निघून गेले.



त्यांच्या तब्येतीकडे बघता ही बातमी धक्कादायक नव्हती. तरी पण मनात कुठं तरी एक आशेचा किरण होता. रामदासजी पुन्हा पूर्ववत बरे होऊन येतील आणि भेट झाल्यावर ''काय सतीशजी...'' म्हणून पुन्हा पाठीवर हात मारतील. पण आता ते शक्य नाही हे कळत असूनही मन मानत नाही हे नक्की.

१ जुलै २०२४! स्थळ वडनेर. निमित्त डॉ. रामदासजींचा जन्मदिनाच्या निमित्ताने एका कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन. मी बसलो असताना अचानक माझं नाव बोलण्यासाठी पुकारलं गेलं. मी बोललो. भाषण आटोपून माझ्या जागेवर जाण्यासाठी निघालो. तेवढ्यात डॉ. रामदासजींचा आवाज. ते मला बोलवत होते. मी परत स्टेजवर गेलो तर चक्क माझ्या अंगावर शाल देऊन मला पुष्पगुच्छ देऊन माझा सन्मान केला. मी संकोचून गेलो होतो. म्हटले वाढदिवस तुमचा आहे. सत्कार तुमचा करायला पाहिजे. त्यावेळी ते म्हणाले, ते काळजात कोरून ठेवण्यासारखं आहे. ते म्हणाले अनेक पायव्याच्या दगडामुळे ही इमारत उभी राहिली आणि आजच्या तुमच्या भाषणासाठी खूप धन्यवाद. त्या नंतर एक दोनदा त्यांची ओझरती भेट झाली त्यावेळी त्यांनी त्या भाषणाचा कौतुकाने उल्लेख केला होता.

एका ध्येयनिष्ठ स्वयंसेवकाची इनिंग अर्धवट ठेवून ते अज्ञाताच्या प्रवासाला निघून गेले. आणि अचानक काहीतरी मोठे हरपले आहे हे जाणवले. त्यांचे संपूर्ण जीवन हे संघानुलक्षी होते. खाजगी, कौटुंबिक, सामाजिक आणि चरितार्थ या चतुर्विध आयामात... एक सुंदर व संपन्न आयुष्य होते. एक आदर्शवत व्यक्तिमत्त्व चर्मचक्षूच्या टप्प्याच्या बाहेर निघून जाण्याने एक पोकळी निर्माण करणारे असते. जीवघेण्या आजारावर मृत्यूला आव्हान देणारे तेजस्वी रूप अनुभवले. आपल्या अपूर्ण परंतु कृतार्थ जीवनाचे संपूर्ण समाधान घेऊन निर्विषय - निरामय व सन्यस्त मनाने ते परलोकवासी झाले. जगात वागावे कसे हे त्यांच्याकडे पाहून शिकावे. त्यांच्या महाराष्ट्रभर पसरलेल्या कार्यकर्त्यांवर पसरलेले हे मळभ दूर होण्यासाठी काळ हाच उत्तम उपाय आहे. 'इदं न मम: राष्ट्राय स्वाहा' या मंत्राची शिकवण देणाऱ्या एक राष्ट्र सर्वतोपरी मानणाऱ्या विचारधारेवर शेवटच्या श्वासापर्यंत विश्वास ठेवणाऱ्या त्यांच्या आत्म्यास त्यांनी मिळविलेल्या अधिकारानुरूप सद्गती व शांती मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

**सतीश शं. वखरे**/हिंगणघाट

## संवेदनशील संघटक

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ज्ञान, चारित्र्य, एकता हे ब्रीदवाक्य आचरणारे आणि ''कार्यकर्ता जसा आहे तसा स्वीकारणे अन् संघटनेच्या कार्यासाठी त्याला व्यवस्थित घडविणे...'' हे सूत्र कायम समाजजीवनात आचरणात आणणारे संवेदनशील, लोकाभिमुख भाजप नेता डॉ. रामदास आंबटकर यांचे निधन हजारोंना चटका लावणारे आहे. ढोबळमानाने अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ता ते विद्यापीठ सिनेट सदस्य ते भाजपाचे अविरोध निर्वाचित विधानपरिषद सदस्य असा त्यांच्या कार्याचा चढता आलेख आहे.

अभाविपचे संस्थापक व कुशल संघटक प्रा. दत्ताजी डिडोळकर यांच्या सहवासात, मुशीत घडलेले आणि दत्ताजींचा जणू डोक्यावर आशीर्वादाचा अदृश्य हात असलेले रामदासजी आंबटकर हे सामाजिक व संघटनकार्यासाठीच जन्मले होते. १९९१ च्या सुमारास अभाविपचे कार्यकर्ता सुनील राजे यांच्या प्रेरक, पाठिंब्याने मी विद्यार्थी परिषदेच्या यवतमाळ नगर कार्यकारिणीत जोडला गेलो. त्यानंतरच्या काळात रामदास आंबटकर, सुनील आंबेकर, सुनील देशपांडे, सैदाजी रेड्डी यांच्या व इतर अनेकांच्या संपर्कात आलो. दोन प्रसंग आठवतात - पहिला , यवतमाळच्या संघ कार्यालयात विद्यार्थी परिषदेच्या जिल्हास्तरीय बैठकीतील अवकाश वेळेत एका कार्यकर्त्याच्या असंस्कृत वर्तनाने मी नाराजी व्यक्त केली होती. त्या दिवशी डॉ. रामदासजी कार्यक्रमानिमित्त यवतमाळमध्ये होते. त्यांना हे कळल्यावर.. .''सरांच्या नाराजीचे कारण दूर करा. कार्यकर्ता तुटू देऊ नका!'' असे संबंधितांना बजावले होते. दुसरी आठवण प्रा. डॉ. चांदेकर सरांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून निवड होऊन ते पदाचा कार्यभार स्वीकारणार होते त्यादिवशीची. त्या सकाळी मी रामदासजींना फोन करून काही माहिती विचारली तेव्हा व्यस्ततेही त्यांनी माहिती दिली व माझे समाधान केले. बुलढाणा येथे कार्यरत शिक्षक, अभाविपचे मधुरभाषी कार्यकर्ता मयूरेश कुळकर्णी म्हणाले त्याप्रमाणे रामदासजींना कार्यकर्त्यांची विचारपूस करणे, त्यांच्यासह अधिकाधिक वेळ घालवणे व त्यांच्या अडचणी सोडवणे भावत असे. संत तुकारामांच्या वचनानुसार (अक्षय्यतृतीयेच्या दिवशी) इहलोकीचा निरोप घेऊन आपला शेवटचा दिवस गोड केलेले संघटनकुशल रामदासजी आंबटकर यांना श्रद्धांजली.

**प्रा. विवेक रा. विश्वरुपे**/८८०५१५७४७५

## जातनिहाय जनगणनेच्या उद्देशात फरक

अखेर केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याची तयारी दाखवल्याची बातमी वाचली आणि त्यावरील संधी, क्षमता आणि सिद्धतेची कसोटी हा अग्रलेखही वाचला. (तरुण भारत, ३ मे). यापूर्वी भारतात १९३१ साली ब्रिटिश राजवटीत अखंड भारतामध्ये जातनिहाय जनगणना झाली होती. यानंतर पारतंत्र्यात असतानाच पुन्हा १९४१ मध्ये आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर २०११ मध्ये यूपीए सरकारने जातनिहाय जनगणना केली होती. पण या दोन्ही जनगणनेची माहिती तत्कालीन सरकारांनी कधीच जाहीर केली नाही. तत्पूर्वी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५१ मध्ये तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल यांनी जातनिहाय जनगणनेमुळे होणाऱ्या नुकसानीची जंत्री दिली आणि त्यावेळी जातनिहाय जनगणना करण्यास साफ नकार दिला होता. पण आता गेल्या काही दशकांत पुलाखालून बरेचसे पाणी वाहून गेले आहे आणि त्यामुळे जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीने जोर धरला आहे. गेल्या काही वर्षांपासून काँग्रेसचे नेते राहुल गांधींनी तर जातनिहाय जनगणना करण्याची मागणी रेटून धरली होती. आता नरेंद्र मोदींनी त्याला मान्यता दिली असल्याने काँग्रेसचे नेते स्वतःची पाठ थोपटून घेणार यात शंकाच नाही. परंतु अशी जनगणना करण्यामागे भाजप आणि काँग्रेसच्या उद्देशांमध्ये मूलभूत फरक असल्याचे दिसते.

खंडप्राय असलेल्या अखंड हिंदुस्थानवर सलगपणे दीडशे वर्षे आपली निरंकुश सत्ता चालवण्यासाठी ब्रिटिशांनी फोडा आणि झोडा या तत्त्वाचा अनिर्बंध वापर केला होता. देशातील जनतेला धर्म, जातपात, पंथ, भाषा आणि प्रांत अशा मुद्यांवर सातत्याने एकमेकांत लढवत ठेवून तमाम हिंदुस्थानी नागरिकांना ब्रिटिशांनी या मुद्यांवर कधीच एकत्र येऊ दिले नव्हते. काँग्रेसच्या नेत्यांचे ब्रिटिशांशी असलेले सौहार्दाचे संबंध लक्षात घेऊन, ब्रिटिशांनी स्वातंत्र्य बहाल करताना, काँग्रेसच्या सहकार्याने, धर्माच्या आधारावर अखंड हिंदुस्थानचे तीन तुकडे करून खंडित स्वातंत्र्य बहाल केले. फाळणीच्या वेळी लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागले, महिलांना आपली अब्रू लुटल्याचा अपमान भोगावा लागला, अनेक जण अनाथ झाले, लाखोंचे संसार उद्ध्वस्त झाले. स्वातंत्र्य देताना ब्रिटिशांनी आपल्या प्रिय काँग्रेसला फोडा आणि झोडा हे ब्रह्मास्त्र भेट म्हणून दिले. याबाबत ब्रिटिशांचाही बाप असलेल्या काँग्रेसच्या नेत्यांनी या ब्रह्मास्त्रात लुटा या शस्त्राचा समावेश केला आणि सात दशके फोडा, झोडा आणि लुटा या त्रिसूत्रीचा वापर करून, सत्ता भोगण्याबरोबरच, देशाची मनसोक्त, अविरत आणि अनिर्बंध लुटमार केली. ब्रिटिशांप्रमाणेच काँग्रेसनेही सात दशकांत भारतीयांना कधीच एकत्र येऊ दिले नाही. आताही जातनिहाय जनगणनेच्या मागणीमधून काँग्रेसच्या नेत्यांचे हेच मनसबे असल्याचे दिसते आहे. सत्तेसाठी देशातील मतदारांमध्ये या सगळ्या मुद्यांवरून फूट पाडायची आणि सत्तेवर अंकुश ठेवायचा यासाठीच काँग्रेसला जातनिहाय जनगणना हवी आहे. हिंदू धर्मातील लोकांना जातींमध्ये विभागून त्यांचे खच्चीकरण करण्याचा काँग्रेसचा उद्देश आहे.

याउलट भाजपा, एनडीए आणि नरेंद्र मोदींचा जातनिहाय जनगणना करण्याचा उद्देश सकारात्मक आहे. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन धर्मांमधील मागासलेल्या, अप्रगत, वंचित, पीडित आणि सतत दुर्लक्षित राहिलेल्या जनतेलाही विकासाची द्वारे उघडून देऊन त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेणे, हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एकमेव उद्देश आहे.

तेव्हा जातनिहाय जनगणनेच्या मागणीमागे काँग्रेस आणि भाजपाच्या उद्देशांमध्ये असलेला हा मूलभूत फरक नीटपणे समजून घेणे आवश्यक आहे. काँग्रेसच्या लबाड धोरणांना पाठिंबा न देता नरेंद्र मोदींच्या सबका साथ, सबका विकास या धोरणांना पाठिंबा देणे हे सर्वधर्मीय देशवासीयांचे प्रथम कर्तव्य आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## चुकांतून शिकण्याची संधी

एकदा शिशिरने वडिलांच्या खिशातून पैसे चोरले आणि शाळेच्या मुलांबरोबर परस्पर सिनेमाला गेला. घरी आल्यावरही साळसूदपणे वागू लागला. इतका सालस मुलगा, पण कुसंगतीमुळे त्यालाही असे काही करावेसे वाटले. कधीही कमी गुण न मिळणाऱ्या मुलाला या वेळी सहामाहीतही कमी गुण मिळाले होते. घरात तिघेच राहत असल्यामुळे आईबाबांनी आपसात चर्चा केल्यावर आणि इतक्यातल्या त्याच्या वागणुकीमुळे हे कृत्य कोणाचे असू शकते हे चटकन लक्षात आले. त्या रात्री आईने प्रेमाने शिशिरला याबद्दल विचारले. आधीच भांबावलेला असल्यामुळे आईच्या प्रेमळ शब्दांनी त्याला रडूच फुटले आणि त्याने आपली चूक कबूल केली. त्याची आई समजूतदार होती. पुन्हा असे वागणार नाही अशी शपथ तर त्याच्याकडून घेतलीच पण बाबांना जाऊन मी चुकलो, मला क्षमा करा असे म्हणून माफी मागण्याची जबाबदारी तुझी असे बजावले. वडिलांच्या कानावर ही गोष्ट गेली आहे हे त्याला कळलेच होते. पण कोणत्या तोंडाने माफी मागणार म्हणून तो चूपच होता. पुढले काही दिवस तणावात गेले. आईने पुन्हा ही गोष्ट त्याला सांगितली नाही कारण मी चुकलो ही कबुली त्याच्याकडून ओठावर यायला हवी होती. त्याला असह्य झालं आणि शेवटी मनाचा हिय्या करून तो बाबांजवळ जाऊन भरल्या डोळ्यांनी सॉरी परत असे कृत्य माझ्या हातून घडणार नाही असे म्हणाला. त्याला वाटले आता बाबा फार संतापणार आणि कदाचित मार पण देणार पण बाबाही रडत होते. हे दृश्य त्याला नवीन होते. त्याच्या माफी मागण्याने तेही विरघळून गेले होते. केवढी किमया केली होती एका शब्दाने... आणि घरातला आनंदाचा, मोकळेपणाचा प्रवाह परत वाहायला लागला.

चूक आणि बरोबर असं शंभर टक्के काही नसतंच. त्यामुळे प्रत्येक वेळेला एकच निर्णय योग्य असतो असं नाही. एक किस्सा आठवतोय. एका ऑफिसमधील कर्मचारी अद्ध्यातखोरपणाने मासिक हजेरी रजिस्टरवर सही करत नसे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्याच्या कनिष्ठ अधिकाऱ्याने त्यांच्याकडे रिजिस्टर घेऊन यावे मगच ते सही करतील. वरिष्ठ अधिकाऱ्यांना ही बाब समजली तेव्हा ते स्वतः शिपायाच्या आवेशात त्या कर्मचाऱ्याकडे गेले आणि सही मागितली. कर्मचारी वरमला, लज्जित झाला आणि त्याने क्षमा मागितली. स्वतःची चूक त्याच्या लक्षात आली होती. माणूस चुकतो, खरं तर चुकतो तोच माणूस. पण त्याला आपली चूक कळणं आणि त्याने ती उघडपणे मान्य करणं हे खरं शहाणपण असतं. चुकलो असं जर कोणी मनापासून म्हणत असेल तर त्याच्या खांद्यावर हात ठेवून ठीक आहे, होतं असं... तुला कळली ना चूक झाली तर मग... पण हीच चूक परत होणार नाही याची काळजी घे म्हणजे झालं... असं उदारपणे सांगून त्याच्या विश्वासाला बळ देणं हे जवळच्या माणसाचं काम आणि त्याचं अपराधीपण कसं घालवता येईल हे देखील जवळच्या व्यक्तीचं काम. आपण नाही का गणपतीला आळवतो अपराध माझे कोट्यानुकोटी मोरेश्वरा बा तू घाल पोटी. ज्याचे पोट आपल्या अपराधांना पोटात घालून मोठे झाले आहे तो लम्बोदर उदारपणे आपल्याला क्षमा करतो तसे आपण सहजासहजी दसऱ्याची चक पोटात घालत नाही.

म्हणूनच म्हटले आहे ना सुबह का भुला शाम को जब घर लौटता तो उसे भुला नहीं कहते!

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## श्री आनंदराव अनंतात विलीन

श्री आनंदराव कुलकर्णी, महाराष्ट्र विद्युत मंडळाचे



टेक्निकल डायरेक्टर ८० वर्षांचे असताना त्यांना कर्करोगाने ग्रासले. अनेक महिने त्यांच्यावर पुणे येथील हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. तेथील उपचार संपल्यानंतर ते सोलापूरला घरी आले. जांघेमध्ये जखम होती. त्या जखमेचे ड्रेसिंग रोज केले जात होते. उपचाराला शरीर साथ देत आहे. असे जाणवत होते. परंतु त्यांची प्रकृती खालावत गेली आणि अखेर २१ एप्रिल रोजी त्यांची प्राणजोत मालवली.

अतिशय सरळ स्वभावाचे निगर्वी परोपकारी वृत्तीचे व्यक्ति होते. लातूर जवळील खेडे गावांमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. आंबेजोगाईच्या महाविद्यालयातून ते १२ वीमध्ये पहिले आले. व संभाजीनगर (औरंगाबाद) च्या इंजिनिअरिंग कॉलेजमधून प्रथम वर्गात बी.ई. इलेक्ट्रिकल झाले. व लगेच महाराष्ट्र वीज मंडळात इंजिनिअर पदावर रुजू झाले. व स्व-कर्तृत्वाने मुख्य अभियंता व टेक्निकल डायरेक्टर पदावरून सेवानिवृत्त झाले. हाताखालच्या कर्मचाऱ्यांना ते मानाने राबवत असत. असा अधिकारी मिळणे दुर्मिळ. निवृत्ती नंतर त्यांच्या चिरंजीव (श्री भगवंतराव) यांच्या मदतीने ट्रान्सफार्मर बनाविण्याची फॅक्टरी सुरु केली व नावारुपास आणली. त्यांच्या निधनाने व्यवसायाचे व कुटुंबियांचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या आत्म्यास चिर शांती लाभो व त्यांच्या कुटुबियांस दुःख सहन करण्याची शक्ती लाभो. अशी त्या जगनियंत्याच्या चरणी प्रार्थना

- **सु.स. देशमुख**/ ९८२२०४३९४९

## नागपूर विद्यापीठाचा संविधान शिक्षणाचा ऐतिहासिक निर्णय



भारताच्या लोकशाहीचा आत्मा असलेल्या भारतीय संविधानाचा अभ्यास आता नागपूर विद्यापीठातील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी अनिवार्य होणार अशी माहिती समाज माध्यमावरून झळकली. भारतीय लोकशाहीचा आत्मा असलेले भारतीय संविधान हे प्रत्येक भारतीयाने जाणून घेणे अत्यावश्यक आहे. अनेक वर्षांपासून नागरिकांकडून व अभ्यासकांकडून ही मागणी होत होती की संविधानाचा अभ्यास सर्वच विद्यापीठांत अनिवार्य व्हावा व ती काळाची गरज सुद्धा आहे. अखेर ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने. नागपूर विद्यापीठाने देशात एक आदर्श निर्माण करत सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक अभ्यासक्रमात 'भारतीय संविधान' हा विषय अनिवार्य केला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत दोन क्रेडिट्सचा अभ्यासक्रम तयार करून, हे विद्यापीठ सर्व विद्यार्थ्यांना संविधान शिकवणारे देशातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. भारताच्या संविधान स्वीकृतीला ७५ वर्षे पूर्ण होत असताना हा निर्णय विद्यापीठातर्फे घेण्यात आला. हा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये समाविट करण्यात आला असून, यामुळे विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानवशास्त्र व आंतरविद्याशाखीय अभ्यास या चार प्रमुख शाखांमधील ३५० हून अधिक अभ्यासक्रमांमध्ये आता संविधान विषयाचा समावेश करण्यात आला. बी. ए.. बी. कॉम., बीएससी यासारख्या पदवी अभ्यासक्रमांच्या दुसऱ्या सेमिस्टरमध्ये उन्हाळी २०२५ पासून हा विषय बंधनकारक केलेला असून या निर्णयामुळे सुमारे ३ लाख विद्यार्थ्यांना भारतीय संविधान अभ्यासक्रमात शिकण्याची संधी मिळणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविशंकर मोर यांनी आपल्या या स्व-संकल्पनेला कृतीत उतरवून पूर्णत्वास आणले. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे संविधानप्रेमी, जबाबदार व जागरूक नागरिक घडवण्याची प्रक्रिया विद्यापीठाच्या मार्फत सुरू झाली. या निर्णयामुळे नागपूर विद्यापीठ प्रत्येक पदवीच्या अभ्यासक्रमात संविधान शिकविणारे प्रथम विद्यापीठ ठरले आहे. कार्यक्षेत्र असलेल्या नागपूर, भंडारा, वर्धा व गोंदिया जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांमध्ये या ऐतिहासिक निर्णयाच्या माध्यमातून संविधानाबद्दल आस्था निर्माण होणार असून एक महत्त्वाचे राष्ट्रनिर्माणाचे पाऊल ठरणार आहे. संविधानातील महत्त्वाचे मुद्दे समाविट असलेले पुस्तक तीन भाषांमध्ये संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी निःशुल्क उपलब्ध होणार असून, सर्वोच्च असलेले संविधान विद्यार्थ्यांना पुन्हा जवळून अनुभवता येईल. हा विद्यापीठाचा निर्णय म्हणजे शिक्षण आणि लोकशाहीचे एक सुंदर संमेलन आहे. या निर्णयामुळे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ संविधान शिक्षणाचा आदर्श ठरवणारे देशातील पहिले विद्यापीठ बनले.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

## हवनाचे धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व

हिंदू धर्मात हवन करण्यास विशेष महत्त्व आहे. प्राचीन काळापासून ही परंपरा चालू आहे. रामायण, महाभारत काळातच नव्हे तर त्या पूर्वीपासूनही हवन केले जात होते, याची अनेक उदाहरणे आहेत. अग्नीमध्ये विविध औषधी वनस्पती, तूप आणि अन्नधान्य यांची आहुती दिली जाते. हवनामुळे वातावरणातील दूषित घटक नष्ट होऊन वातावरण शुद्ध होते. हवन करताना होणाऱ्या मंत्रोच्चारांमुळे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. उच्चारित होणारे मंत्र व त्यातून निर्माण होणाऱ्या कंपनांमुळे मन शांत होते.

हवनासंदर्भात काही शास्त्रज्ञांनी संशोधन केले आहे. फ्रान्समधील 'ट्रेले' नावाच्या शास्त्रज्ञाने आपल्या संशोधनात निष्कर्ष काढला की, हवन मुख्यतः आंब्याच्या समिधांनी केले जाते आणि आंब्याचे लाकूड जळल्यावर 'फॉर्मिक अल्डिहाइड' नावाचा वायू उत्पन्न होतो. हा वायू हानिकारक विषाणू आणि जीवाणूंना नष्ट करून वातावरण शुद्ध करतो. 'टौटिक' नावाच्या शास्त्रज्ञाच्या हवनविषयक संशोधनात असे आढळले की, अर्धा तास हवन केल्यास किंवा हवनाच्या धुराचा शरीराशी संपर्क झाल्यास 'टायफॉईड'सारखे हानिकारक रोग पसरवणारे जीवाणू नष्ट होतात आणि शरीर शुद्ध होते. राष्ट्रीय वनस्पती अनुसंधान संस्थान, लखनौ येथील शास्त्रज्ञांना असे आढळले की, हवनामुळे वातावरणातील हानिकारक विषाणू आणि जीवाणूंचा नाश होतो आणि एकदा केलेल्या हवनाचा परिणाम एक महिना टिकतो. 'एथ्नोफार्माकोलॉजी' या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेत (२००७) प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, यज्ञामुळे केवळ माणसालाच नव्हे तर वनस्पती आणि पिकांची हानी करणाऱ्या जीवाणूंचाही नाश होतो. वरील सगळे संशोधन हे आजच्या काळातील शास्त्रज्ञांनी केलेले आहे. मात्र, हिंदू धर्मशास्त्रात अग्निहोत्र, विविध यज्ञ आणि त्यासमवेत वापरण्यात येणाऱ्या सामग्री या संदर्भातील माहिती विविध ग्रंथात आढळते. अगदी दररोज अग्निहोत्र केल्यास अणुबाम्ब पडल्यावर निर्माण होणाऱ्या लहरींपासूनही संरक्षण होऊ शकते, असेही पूर्वी सिद्ध झाले आहे.

आजही अनेक संत याविषयी मार्गदर्शन करतात. परंतु त्याचे महत्त्व आपल्याला तेव्हाच पटते, जेव्हा त्याबाबत शास्त्रीय पद्धतीने संशोधन झालेले आपल्यासमोर येते. ऋषिमुनींनी वेद आणि उपनिषदांमध्ये सांगितलेले ज्ञान केवळ धार्मिक नव्हे, तर पूर्णतः वैज्ञानिक आहे. म्हणूनच ऋषिमुनींच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांनी दिलेले ज्ञान आचरणात आणायला हवे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### मंद्रूप केंद्रस्तर गुणवत्तापूर्ण वर्ग पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. ३ मे-**

गुणवत्तेत सातत्याने अग्रेसर असलेल्या मंद्रूप केंद्रात केंद्रप्रमुख कलप्पा हेळवी यांच्यस अभिनव आणि नाविन्यपूर्ण संकल्पनेतून यावर्षी प्रथमच गुणवत्ता हा निकष प्राधान्याने घेउन केंद्रातील इयत्ता पहिली ते आठवी मधील केंद्रस्तरीय गुणवत्तापूर्ण वर्ग व शाळा निवडण्यात आले. त्या शिक्षकांना सन्मानचिन्ह आणि शाल देउन गौरविणयात आले. कार्यक्रमाच्या अधयक्षस्थानी केंद्रप्रमुख कलप्पा हेळवी होते. प्रमुख पाहुणे म्हणून विस्ताराधिकारी अयुब कलबुर्गी व गुरुबाळा सनके उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार्त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करणयात आले. यावेळी सिद्धेश्वर आगाशे, नाझिया काझी, अंजली ढोले, संजय राजमाने, बदरूनिसा सगरी, विजयालक्ष्मी पाटील, संजय मंगरूळे, अजरापरवीन मुजावर या वर्गशिक्षकांचा सत्कार करणयात आला. तर गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून तोडकरी वस्ती शाळेचा सन्मान काणयात आला. यावेळी मुखयाधयापक दादा गायकवाड व सखूबाइ गंड यांचा सेवापूर्तीनिमित्त सन्मान करणयात आले. यावेळी केंद्रप्रमुख कलप्पा हेळवी यांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करणयात आले. यावेळी प्रकाश कुंभार, यशवंत कांबळे, रमेश घंटेनवरू, वैशाली म्हेत्रे, कमल अणची, रूपाली येवले, आबा खडतरे, विठठल जतकर, सुहासिनी शेंडे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन कविता दिवाणजी यांनी केले तर प्रकाश कुंभार यांनी आभार मानले.



### तम्मा दर्गोपाटील यांचे सामाजिक क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय : मल्लिनाथ विभुते

**सोलापूर, दि. ३ मे-**

येथील श्रीमद वीरशैव महा-जन सभा ट्रस्टचे माजी अध्यक्ष समाजभूषण कै.तम्मा आण्णा दर्गोपाटील यांच्या ९ स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेची पूजा करुन संस्थाध्यक्ष मल्लिनाथ विभूते यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी सचिव बाबासाहेब कुलकर्णी कोषाध्यक्ष विजयकुमार थळंगे अधिक्षक सोमेश्वर लवंगे ट्रस्टी डॉ भीम ाशंकर बिराजदार तसेच इतर मान्यवर विद्यार्थ्यांसह कर्मचारी उपस्थित होते.सचिव कुलकर्णी कै. दर्गोपाटील आप्पा यांनी सामाजिक शैक्षणिक कृषी क्षेत्रात केलेल्या कार्याची माहिती देऊन म्हणाले कै. दर्गोपाटील आप्पा या संस्थेचे वीस वर्षे अध्यक्षपद भूषवून उल्लेखनीय कार्य केले.लिंगायत मुलीसाठी सातरस्ता परिसरात कुंभारीचे सधन शेतकरी कै. बसवंतराव बिराजदार यांनी संस्थेला दिलेल्या जागेवर मुलींसाठी वसतिगृह उभे केले.लिंगायत विद्यार्थ्यांसाठी कस्तुरबा मार्केट समोर सुरु असलेल्या ब. ना. बिराजदार वसतीगृहात सोयीसुधारणा केले.सिध्देश्वर सह.बॅंकेचे ते चेअरमन होते.मनपा शिक्षण मंडळाचे सदस्य होते.डॉ भीमाशंकर बिराजदार आपल्या भाषणात म्हणाले की, कै.दर्गोपाटील आप्पा शिस्तप्रिय प्रेमळ स्वभावचे होते. त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे मी आज शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहे. मी याच वसतीगृहात राहून शिक्षण पूर्ण केले.संस्थाध्यक्ष मल्लिनाथ विभूते यांनी कै दर्गोपाटील आप्पांच्या विविध क्षेत्रातील कार्याची माहिती देऊन म्हणाले की,कै. दर्गोपाटील आप्पासारखे समाजाबद्दल आस्था असणारे या जगात दुर्मिळच आहेत.ते जरी आज देहरुपात नसले तरी या भव्य वास्तू, वसतीगृह मंगल कार्यालय रुपात आमच्या मनात कायम राहणार आहेत.अधिक्षक सोमेश्वर लवंगे यांनी कै.दर्गोपाटील आप्पाचे जीवन चरित्र स्पष्ट करून आभार मानले. कार्यक्रमास वासतिगृहातील विद्यार्थी उपस्थित होते.

# सप्तसुत्री कार्यक्रमामुळे प्रशासकीय कारभाराला गती

## धोरण असेच चालू ठेवा; पालकमंत्र्यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

राज्यातील महायुती सरकारच्या १०० दिवसांच्या कामांचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. अजित पवार गटाच्या मंत्री आदिती तटकरे यांचा महिला आणि बालविकास विभाग ८० टक्के गुणांसह सर्वोत्तम ठरला आहे. तर सार्वजनिक बांधकाम विभाग दुसऱ्या तर कृषी विभाग तिसऱ्या स्थानी आहे. तर ४८ विभागातील तीन विभाग नापास झाले आहेत. दरम्यान, सोलापूरला मात्र या १०० दिवसांच्या सप्तसुत्रीचा मोठा फायदा झाला असून, यामुळे जिल्ह्यातील विविध विभागाची कार्यालये ठकाठक होवून सर्वसामान्यांना सेवाही चांगली मिळू लागली आहे. ही जनसेवा अशीच चालू ठेवावी, अशा सूचना पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असलेला सामान्य प्रशासन विभाग, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडील नगरविकास विभाग आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे असणारा अन्न-नागरी पुरवठा विभागाची ढिसाळ कामगिरी झाली आहे. तिन्ही विभागांना ३५ टक्क्यांहून कमी गुण मिळाले आहे. सामान्य प्रशासन विभागाला फक्त २४ टक्के, नगरविकास विभागाला ३४ टक्के मार्क, तर अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला ३३ टक्केच गुण मिळाले आहे. सरकारच्या १०० दिवसांच्या कामांत बारा विभागांना शंभर टक्के गुण मिळाले आहेत. १२ विभागांनी ठरवलेल्या मुद्यांवर शंभर टक्के काम केले. जलसंपदा, गृह, ग्राम विकास, पशुसंवर्धन, बंदरे विभागास १०० टक्के गुण मिळाले. उच्च व तंत्रशिक्षण, कामगार, वस्त्रोद्योग विभागालाही पैकीच्या पैकी मार्क मिळाले आहेत. सांस्कृतिक, खणीकर्म, दुग्धव्यवसाय,रोहयो विभाग अव्वल ठरले आहेत.

१०० दिवसांमध्ये नागरिकांच्या काही महत्वाच्या विषयांवर मोहिम घेऊन कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यामध्येच पोटखराब क्षेत्र लागवडीखाली



आणले असल्यास त्याप्रमाणे ७/१२ सदरी पोटखराब क्षेत्र कमी करुन लागवडीलायक क्षेत्रात वाढ करणेच्या सविस्तर सूचना दि. १३ मार्च २०२५ रोजी परिपत्रक काढून देण्यात आल्या आहेत. या परिपत्रकानुसार जास्तीत जास्त क्षेत्र लागवडीखाली आणणे हा उद्देश आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडील परिपत्रक दि. १३ मार्च २०२५ अन्वये पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणणेकामी महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना कार्यपध्दतीबाबत कालबध्द कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. पोटखराब वर्ग (अ) मधील क्षेत्र लागवडीखाली आणल्यास अतिरिक्त आकारणी करणेचे अधिकार तहसिलदार यांना प्रदान करणेत आले असून, तहसिलदार यांचेस्तरावर तालुकास्तरीय समिती स्थापन करुन विशेष मोहिम राबविणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार संबंधित तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे विशेष मोहिम राबवून लागवडीखालील पोटखराब गटाची संख्या ५०८२ (क्षेत्र २४८०.४८ हे.आर) शोध घेवून त्यापैकी २८८८ गट (क्षेत्र १३४०.७७ हे. आर) लागवडीखली आणलेबाबत आदेश पारित केलेले आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये सदर विषयाबाबत अत्यंत चांगले काम झालेले आहे. सोलापूर जिल्हयात ४२ ब, ४२ क व ४२ ड च्या १०० दिवसाच्या विशेष मोहिमेमध्ये एकूण ३ हजार २४७ सनद वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्यातील विविध शाळांत सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, शासकीय कार्यालयांना रंगरंगोटी देणे, कार्यालयात दप्तर स्वच्छता, कार्यालय परिसर चकाचक ठेवणे, कामासाठी आलेल्या नागरिकांचे नम्रतापूर्वक स्वागत करून त्यांचे काम करणे, काम होत नसतील तर त्यातील त्रुटींची पूर्तता करून घेणे, अभिलेखांची झालेली स्वच्छता आदी विविध कामे १०० दिवसांच्या कार्यकालात पार पाडण्यात आलेली आहेत.

या १०० दिवसांमध्ये १) संकेतस्थळ २) सुकर जीवनमान ३) स्वच्छता ४) जनतेच्या तक्रारींचे निवारण ५) कार्यालयातील सोयी व सुविधा ६) गुंतवणूक प्रसार ७) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी या मुद्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश विविध बैठकांतून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले होते. या पार्श्वभूमीवर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी जीव तोडून काम केले मात्र आपण राज्यातील फाईव्ह टॉपमध्ये येवू शकलो नाही, ही खंत वाटते. तरीही भविष्यात या सप्तसुत्रीचा चांगला फायदा होणार आहे.

## अभिनेता शिखर पहारियाकडून वाचनालयासाठी एक हजार पुस्तके

### ‘बुके नव्हे, पुस्तके पाठवा’ या बिरदेवच्या आवाहनाला दिला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

एका सशक्त पावित्र्यात, शिखर पहारिया यांनी नव्याने नियुक्त झालेल्या आयपीएस अधिकारी बिरदेव धोणे यांच्या प्रेरणादायी उपक्रमासाठी १,००० पुस्तके दान केली आहेत. हा उपक्रम त्यांच्या मूळ गावात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाचनालय उभारण्याचा आहे. बिरदेव हे कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातून यूपीएससी उत्तीर्ण होणारे पहिले व्यक्ती आहेत.

अलीकडेच, बिरदेव यांनी ‘‘बुके नव्हे, पुस्तके पाठवा’’ असे आवाहन करत समाजमाध्यमांवर एक भावनिक पोस्ट शेअर केली



होती, जी देशभरात गाजली. या संदेशाने भारावून जाऊन, शिखर पहारिया यांनी शैक्षणिक आणि स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त अशा अनेक पुस्तकांची मोठी खेप गावाकडे पाठवली.

अतिशय साध्या पार्श्वभूमीतून आलेले बिरदेव यांनी २०२० ते २०२१ या काळात पोस्टमन म्हणून काम केले आणि त्याचवेळी यूपीएससीचा स्वप्न उराशी बाळगले. त्यानंतर ते दिल्लीला गेले, आर्थिक अडचणींशी झुंज दिली, पण हार न मानता मेहनत घेतली आणि वयाच्या २७ व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात आयपीएस झाले.शिखर यांचे हे योगदान केवळ भेटवस्तू नाही, तर एक संदेश आहे संधी, समता आणि शिक्षणाच्या माध्यमातून आयुष्य बदलण्याच्या शक्तीवरचा विश्वास. जसा विश्वास बिरदेव यांनी त्यांच्या प्रवासातून दाखवून दिला आहे. या भेटवस्तूंच्या हस्तांतरणाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत.

## ‘लोकमंगल महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. या सादरीकरणासाठी पर्यवेक्षक म्हणून डॉ. सुमन देवरूमठ (प्राचार्य, विद्याप्रतिष्ठान कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय बारामती) व डॉ. रोहिणी कोळेकर ( प्रकल्प समन्वयक, विद्याप्रतिष्ठान कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय बारामती) हे लाभले होते.

डॉ. सुमन देवरूमठ यांचे स्वागत लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन यांच्या हस्ते व डॉ. रोहिणी कोळेकर यांचे स्वागत प्रा. सायली बडेकर यांच्या हस्ते पुष्गुच्छ देऊन करण्यात आले. या प्रकल्प सादरीकरणात विद्यार्थ्यांनी



कृषीजैवतंत्रज्ञान व एन्टरप्रिन्युरशीप डेव्हलपमेंट इन बायोटेक्नॉलॉजी अंतर्गत विविध विषयांवर त्यांचे प्रकल्प सादर केले. प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने विविध पिकांचे टिश्यू कल्चर, सूक्ष्मजीवशास्त्र तंत्रज्ञानाचा वापर करून जनुकीय विविधता व पिकांचे संकर ओळखणे आदींचा समावेश होता. या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने अंजीर, केळी, बांबू, डाळिंब, संत्रा, द्राक्षे, सिंगोनियम, जरबेरा, साग, गहू, कांदा, ज्वारी, तूर, भात, मूग, मकाआदी पिकांचा समावेश होता. विद्यार्थांना कृषी जैवतंत्रज्ञान क्षेत्रात ऊती संवर्धन व सूक्ष्मजीवशास्त्राचा वापर करुन पिकांची जैविविधता कशाप्रकारे तपासली जाते, त्याचा वापर कशाप्रकारे पिकांच्या विविध जाती विकसित करण्यासाठी केला जातो, पिकांमध्ये संशोधन कशाप्रकारे केले जाते याविषयी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून प्रात्यक्षिकांद्वारे अनुभवता आले. कार्यक्रमाचे सम न्वयन प्रा. सायली बडेकर यांनी व सूत्रसंचालन सोहम बोधले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यायाचे प्राचार्य सागर महाजन, प्रा. सायली बडेकर, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. अंकिता पवार उपस्थित होते.

## तरुणाने घेतला तरुणीच्या हाताला चावा

### सिव्हीलमधील ओपीडीसमोर घडली घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

घरगुती भांडणाच्या कारणातून तरुणाने तरुणीच्या हाताला चावा घेतल्याचा प्रकार घडला. सिव्हील हॉस्पीटलमधील ओपीडीसमोर शुक्रवारी रात्री ९.४५ वाजता ही घटना घडली. प्रिया शुभजित कांबळे (वय २७, रा. न्यु बुधवार पेठ) असे चावा घेतलेल्या तरुणीचे नाव आहे. प्रिया आणि सौरभ कांबळे यांच्या घरगुती कारणातून वाद झाला होता. त्यानंतर प्रिया ही सिव्हील हॉस्पीटल येथे आली होती. ती ओपीडीसमोरील पार्किंग जागेत थांबली असताना, सौरभ याने तिच्या उजव्या हाताला चावा घेतला. यात तिच्या हाताला जखम झाल्याने रात्री ९.५० वाजता स्वत: उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## चंद्र म्हणजे वस्त्रांची देवता : विनय नारकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

साहित्य आणि संस्कृती यांचा अनोखा संगम साधणाऱ्या प्रिसिजन वाचन अभियान अंतर्गत ‘वस्त्रगाथा’ या पुस्तकावर आधारित एक समृद्ध अनुभव देणारा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात ‘वस्त्रगाथा’ या पुस्तकाचे लेखक विनय नारकर यांची सीमंतिनी चाफळकर यांनी सखोल आणि रसपूर्ण मुलाखत घेतली.

लेखक विनय नारकर आणि मुलखातकार सीमंतिनी चाफळकर यांचे स्वागत आणि सत्कार प्रिसिजन फाउंडेशन च्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत सुरेल पद्धतीने झाली. अपर्णा गव्हाणे आणि रसिका तुळजापूरकर यांनी ‘वस्त्रगाथा’मधील निवडक उतारे, पारंपरिक ओव्या आणि शांता शेळके यांच्या काही कवितांचे अत्यंत प्रभावीपणे अभिवाचन केले. त्यांच्या आवाजात साकारलेली महाराष्ट्राच्या वस्त्र परंपरेची समृद्धता उपस्थित रसिकांवर खोल प्रभाव टाकून गेली. मुलाखतीत विनय नारकर यांनी त्यांच्या संशोधन आणि सृजनशीलतेच्या प्रवासाविषयी उलगडा केला. या प्रवासाची सुरुवात सोलापूरच्या काही विणकरांना भेटून झाली. त्यांनी त्यांच्या कडून काही




प्रिसिजन वाचन अभियान या मुख्य कार्यक्रमापूर्वी ५. २५ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभा गृहासमोरील हिरवळीवरच वाचन अभियानापूर्वी वाचक कट्टा उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. यामध्ये ठराविक वाचकांनी एकत्र येऊन पुस्तक, वाचन व अनौपचारिक गप्पांमधून आपले अनुभव एकमेकांना सांगितले. वाचक कट्टा संपल्यानंतर वाचन अभियानास सुरूवात झाली.

कलात्मक साड्या बनवून घेतल्या ही कलात्मकता त्यांनी प्रदर्शनाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर पोहोचवली. याच सृजनशीलतेतून ‘वस्त्रगाथा’ हे पुस्तक जन्माला आलं.

महाराष्ट्राचे हे वस्त्रवैभव जसे जसे त्यांना समजू लागले, तसं तसे महाराष्ट्रातील वेगवेगळ्या वस्त्रपरंपरा उलगडत गेले. या पुस्तकात नारकर यांनी महाराष्ट्रातील पारंपरिक वस्त्रपरंपरा, विविध भागांतील साड्यांचे प्रकार, त्यामागील सांस्कृतिक संदर्भ आणि ‘चंद्रकळा’सारख्या खास साड्यांच्या वैशिष्ट्यांचा सखोल अभ्यास अतिशय आकर्षक शैलीत मांडला आहे. ही फक्त वैशिष्ट्यपूर्ण साड्यांची कहाणी नाही, तर ती महाराष्ट्राच्या संस्कृतीची स्त्री आणि पुरुषांच्या वेगवेगळ्या वस्त्र प्रकारामधून विणलेली गाथा आहे.

कार्यक्रमाला साहित्य, कलेविषयी आस्था असलेले अनेक रसिक आणि अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संवाद, अभिवाचन आणि सादरीकरण यांच्या त्रिवेणी संगम ातून हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. प्रिसिजन वाचन अभियान अशा उपक्रमांद्वारे वाचक आणि सर्जक यांच्यातील नातं अधिक दृढ करत असून, साहित्याच्या माध्यमातून सांस्कृतिक समृद्धीची उजळणी घडवत आहे. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी केले.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **SHWETA RAJENDRA HATTI** has been changed to new name **MANISHA ANAND BHOGADE** Affidavit No. 346, dated. 02/05/2025. Kindly Note the same.

## जैन कासार समाजाला विकासाच्या प्रवाहात सामावून घेणार

### ललित गांधी

### जैन कासार संस्था पदाधिकारी यांच्याशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे -**

जैन धर्मातील सर्वच पंथांनी एकत्र येऊन संपर्कात राहून अल्पसंख्याक आयोगाच्या विविध योजनांचा लाभ समाज बांधवांपर्यंत पोहोचविण्याचे तसेच जैन कासार समाजाला विकासाच्या प्रवाहात सामावून घेणार असल्याचे प्रतिपादन राज्यमंत्री दर्जाप्राप्त जैन अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष ललितभाई गांधी यांनी केले.

कोल्हापूर येथे दिगंबर जैन कासार समाज संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पोपटलाल डोर्ले यांच्या नेतृत्वाखाली राज्य पदाधिकारी मंडळाने गांधी यांची भेट घेतली असता त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी संस्थेचे संघटक प्रा. सुभाष दगडे ( पुणे) यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर ( सोलापूर) यांनी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जैन कासार असून त्यांनी ग्रामीण



**जैनांची संख्या दोन कोटीपेक्षा जास्त**

आपल्याला संकुचित विचार न करता व्यापक दृष्टिकोन ठेवून सर्वसमावेशक जिल्हा कमिटी स्थापन करणार असून यात जैन कासार समाजाला प्रतिनिधित्व असेल, तसेच जनगणनेत धर्म जैन व जातीम ध्ये कासार जैन असा उल्लेख करा. असे त्यांनी सांगितले. परवा झालेल्या सामूहिक णमोकार महामंत्रामध्ये एक कोटी ऐंशी लाख बांधवांनी सहभाग घेतला असून जैन समाजाची संख्या दोन कोटीच्या पुढे असल्याचे गांधी यांनी सांगितले.

भागात जैनत्व टिकवण्यासाठी प्रयत्न केले असून विविध जैन मठांचा वृत्तांत सांगितला.

जैन कासार संस्थेच्या पदाधिकारी यांच्याशी संवाद साधतांना गांधी म्हणाले, सर्वच पंथांनी एकमेकांशी संपर्कात राहून संवाद साधला पाहिजे. सर्वांना सामावून घेण्याची भूमिका असून सर्व पंथांना आयोगाच्या जिल्हा व राज्य कमिटीमध्ये प्रतिनिधित्व दिले जाईल. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील राहू, असेही गांधी म्हणाले. यावेळी जैन कासार समाज संस्थेच्या वतीने मागण्यांचे निवेदन व क्रियाशील कार्यकर्त्यांची यादी दिली.

सोलापूर, पुणे, सांगली, इचलकरंजी, रत्नागिरी, कोल्हापूर, गारगोटी, लातूर या ठिकाणाहून पदाधिकारी आले होते. या शिष्टमंडळामध्ये जैन कासार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पोपटलाल डोर्ले, संघटक प्रा. सुभाष दगडे, संस्थेचे कार्याध्यक्ष महावीर दुरुगकर, कोषाध्यक्ष महावीर मांगले, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष सुकुमार पोते, उपाध्यक्ष विज्ञान वनकुद्रे, महिला प्रतिनिधी सौ. विद्या पोते, ग्रामीण उपाध्यक्ष आर. आर.पाटील आदी उपस्थित होते.

Classifieds

**नोकरीविषयक**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीणमध्ये**
**संपर्क : ९८५०७०२१७०**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व आजुबाजूच्या भागातील सर्व रहिवाशांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा उपजिल्हा सोलापूर, ता. दक्षिण सोलापूर, मौजे वांगी येथील शेतजमीन **अ) गट नं. १०६/अ/२/ब ही मेघा संदीप बारवकर आणि संदीप हणमंत बारवकर यांची सामाईक हिस्स्याची शेतजमीन यासी एकूण क्षेत्र ०१ हे. ०० आर.** तसेच मौजे-वांगी येथील शेतजमीन **ब) गट नं. १०६/४/ब ही मोनिका युवराज कोष्टी यांची स्वतंत्र मालकी हिस्स्याची शेतजमीन यासी एकूण क्षेत्र ०१ हे. ०१ आर.**

सदरची वर नमूद शेतजमीनीचे मालक **मेघा संदीप बारवकर आणि संदीप हणमंत बारवकर तसेच मोनिका युवराज कोष्टी यांनी** आमचे अशिल यांना खुशखरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून इसारा रक्कम स्वीकारलेली आहे. सदरची शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याचा व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्स्फर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतवलेली नाही, अशी हमी त्यांनी आमच्या अशीलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, लिज, लीन, इज्मेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेच बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरुपात नोंदवाव्यात जर वरील मुदतीत कोणाची हरकत न आल्यास आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील तद्नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली ता.०३/०५/२०२५

**सही/-**
**प्रकाश पांडुरंग पवार (ॲडव्होकेट)**
**ऑफिस पत्ता, ए/७६ सिंधू विहार, जुळे सोलापूर, विजापूर रोड, सोलापूर**
**मो.नं. ९७६५९५७८८०/७९७२११६०१२**
**अशीलातर्फे ॲडव्होकेट**



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग – ११

### रनर्स स्ट्राईड लेंथ

रनर्स स्ट्राईड लेंथ म्हणजे दोन एकसारख्या पायऱ्यांमधील अंतर, उदाहरणार्थ उजवा पाय नेल्यानंतर पुन्हा उजवा पाय जमिनीवर आल्यापर्यंतचे अंतर. हे तुमच्या वेग, उंची, ताकद आणि तंत्रावर अवलंबून बदलते. जेव्हा तुम्ही एकूण किमी अंतर स्ट्राईड लेंथ (मीटर मध्ये) ने विभागता, तेव्हा तुम्हाला एकूण ची संख्या मिळते

**सूत्र:** एकूण स्ट्राइड्स = (एकूण किमी ×१००० ÷ स्ट्राईड लेंथ (मी)
उदाहरण: तुम्ही १० किमी चालायचं ठरवलं आणि तुमची स्ट्राईड लेंथ = १.२ मी. एकूण स्ट्राइड्स = (१० १०००) १.२ ८३३३ स्ट्राइड्स. जर तुम्ही ''पावले''
मोजायची असतील (दोन्ही पायांचे एकूण फूटफॉल), तर स्ट्राइड्सची संख्या ×२ करा.

**स्ट्राईड लेंथ मोजण्याची पद्धत**

**१. ट्रॅकवर मोजा**
१०० मीटरची रेष मार्क करा. पूर्ण धावा आणि किती पावले घेतली, हा टोटल पाऊल मोजा. =१०० मी / (पावले / २)(कारण प्रत्येक स्ट्राइडमध्ये दोन पावले येतात).

**२. जीपीएल वॉच किंवा पोडीमीटर**
काही स्मार्टवॉचमध्ये सरळच स्ट्राईड लेंथ दर्शवते. हे दौडताना आपोआप मोजते.

**३. व्हिडिओ ॲनालिसिस**
बाजूने धावताना कॅमेरा ठेवा. फ्रेम बाय फ्रेम पाऊल धरून अंतर मोजा.

**सरासरी स्ट्राईड लेंथ (संदर्भासाठी)**
तुमची उंची, पाया शक्ती, आणि प्रशिक्षितपणा यांवरही खूप फरक पडतो.

**स्ट्राईड लेंथ का महत्त्वाचे?**
Speed = Cadence × Stride Length
**कार्यक्षमता :** योग्य स्ट्राईड लेंथ तुमचा ऊर्जावापर अधिक योग्य करतो.
**इंज्युरी टाळणे:** अतिपार पाऊल टाकणे ह्या वेळेस पुढे पाय लँड होताना वजन टाच आणि घुटणीत जास्त ताण येतो, ज्यामुळे घोट्याचे दुखणे, शिंकल स्प्लिंट्स इ. होऊ शकतात.

**स्ट्राईड लेंथ सुधारण्यासाठी उपाय**
१. ड्रिल्स चा सराव करणे
२. प्लायोमेट्रिक्स (Explosive Strength )
उदा.बॉक्स जंप्स, लॅटरल बाउंड्स, हिल स्प्रिंट.
३. कोअर स्ट्रेंथनिंग
उदा.प्लँक, साइड-प्लँक, रशियन ट्विस्ट्स.
४. फ्लेक्सिबिलिटी व मोबिलिटी
हिप फ्लेक्सर, हॅमस्ट्रिंग आणि क्वाड्रिसेप्स स्ट्रेचेस रोज ५१० मिनिटे.
५. प्रगतीशील लोड (Progressive Overload)
दर आठवड्याला थोडं थोडं स्ट्राईड लेंथ वाढवण्यावर लक्ष द्या. उदा. ०.०५-०.१ मी अतिरिक्त.

**एक साधा मापन आणि ट्रेनिंग प्लॅन**
या प्लॅननुसार सातत्य ठेवल्यास ४६ आठवड्यांत तुम्हाला स्ट्राईड लेंथमध्ये महत्वाची सुधारणा दिसेल.

**सारांश:**
स्ट्राईड लेंथ हा तुमचा एक महत्त्वाचा गती व कार्यक्षमता निर्देशक आहे.
योग्य मोजणी, नियमित ड्रिल्स आणि स्ट्रेंथ ट्रेनिंगमुळे तुम्ही तुमची स्ट्राईड लेंथ नियंत्रितपणे वाढवू शकता.

**-अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो. ९१७५८२८२०३

# केकेआरला विजय हवा

## राजस्थान गणित बिघडवण्याचा प्रयत्न करणार

◆ **कोलकाता, ३ मे**

-अठराव्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामात रविवारी गत विजेता कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यादरम्यान सामना खेळला जाणार आहे. आपल्या नवीन आत्मविश्वासाने भारलेला केकेआर घरच्या मैदानावर राजस्थानविरुद्ध विजय मिळवून प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे.



चार साखळी सामने शिल्लक असताना केकेआरचे समीकरण सोपे आहे. हे चारही जिंकून १७ गुण मिळवावेत व एकूण गुण इतर निकालांवर अवलंबून न राहता अव्वल चार क्रमांकाध्ये स्थान निश्चित करावे. कागदावर आव्हान सोपे असले तरी प्रत्यक्षात ते कठीण आहे.

आपल्या मोहिमेच्या शेवटच्या टप्प्यात दोन घरच्या मैदानावर सामने आहेत- रविवारी राजस्थान रॉयल्स आणि बुधवारी चेन्नई सुपर किंग्ज विरुद्ध - त्यानंतर १० मे रोजी सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध आणि १७ मे रोजी फॉर्ममध्ये असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध दोन सामने आहे.

राजस्थान रॉयल्स (आरआर) व चेन्नई सुपर किंग्ज (सीएसके) हे दोन्ही संघ या हंगामात सर्वात विसंगत संघांपैकी आहेत. ते स्पर्धेच्या बाहेर होणारे पहिले संघ आहे. सीएसके प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला आणि त्यानंतर राजस्थान रॉयल्स गुरुवारी जयपूरमध्ये मुंबई इंडियन्सकडून १०० धावांनी पराभव पत्करल्यानंतर अधिकृतपणे बाहेर पडला.

या दोन्ही संघांकडे सध्या गमावण्यासारखे काहीही नसल्यामुळे हे दोन्ही संघ केकेआरच्या संघाला खराब करू शकतात. पण केकेआरची मोठी चिंता म्हणजे घरच्या मैदानावर त्यांची वाईट कामगिरी आहे.

**आजचे सामने**

**कोलकाता नाईट रायडर्स वि. राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
वेळ : दुपारी ३.३० वाजतापासून

**लखनौ सुपर जायण्ट्स वि. पंजाब किंग्ज**
**स्थळ** : हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटना स्टेडियम, धर्मशाळा
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

एकेकाळी केकेआरचा बालेकिल्ला असलेल्या ईडन गार्डन्सवर त्यांना या हंगामात पाच सामन्यांपैकी केवळ एक विजय मिळाला आहे. शेवटचा विजय पंजाब किंग्जविरुद्ध पावसामुळे वाहून गेला. केकेआरच्या फिरकीपटूंना पकडीशी जुळवून घेण्यात अडचण आली आहे, त्याचा फायदा प्रतिस्पर्धी संघांनी अधिक प्रभावीपणे घेतला आहे.

फलंदाजी सुद्धा निराशाजनक राहिली आहे. २०२४ मध्ये जेतेपदापर्यंत पोहोचवणाऱ्या प्रभावी फलंदाजी विभागापेक्षा खूपच कमी आहे.

गत हंगामात चर्चेत आलेला फिनिशर रिंकू सिंग आठ डावांमध्ये केवळ १६९ धावा करून प्रभाव पाडण्यास संघर्ष करत आहे.

फिल सॉल्टची अव्वल स्थानावर असलेली अंतर भरून काढण्यासाठी आलेल्या क्विंटन डी कॉकने सात डावांमध्ये १३७.५० च्या स्ट्राईक रेटने १४३ धावा करून सात डावांमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे.



पण हंगामातील सर्वात महागडा खेळाडू व्यंकटेश अय्यर फारच महाग ठरत आहे. व्यंकटेशला २३.७५ कोटी रुपयांत पुन्हा करारबद्ध करण्यात आले व त्याला उपकर्णधार म्हणूनही नियुक्त करण्यात आले, मात्र या व्यंकटेशने १० सामन्यांत केवळ १४२ धावा केल्या आहेत व गत तीन डावांमध्ये त्याने केवळ २८ धावा केल्या आहेत. गत वर्षीच्या तुलनेत ही घसरण आहे.

या हंगामात केकेआरचा सर्वात विश्वासार्ह फलंदाज राहिलेला कर्णधार अजिंक्य रहाणे क्षेत्ररक्षण करताना झालेल्या हाताच्या दुखापतीतून मुक्त झाला आहे.

मी ठीक आहे. मी माझे सर्वोत्तम प्रयत्न करत आहे. मी रविवारी सामना खेळेन, अशी आशा त्याने व्यक्त केली.

केकेआरसाठी सकारात्मक बाब म्हणजे त्यांनी दिल्ली कॅपिटल्सवर १४ धावांनी मिळवलेला विजय आहे. हा विजय केकेआरसाठी त्यांचा मनोबल वाढवणाराआहे व त्यामुळे त्यांची तीन सामन्यांची विजयहीन मालिका संपुष्टात आली. सुनील नरेन या विजयाचा शिल्पकार होता. त्रिनिदादच्या या अष्टपैलू प्रतिभेमुळे केकेआरला आवश्यक असलेली ठिणगी निर्माण झाली आणि त्यांचा अनुभव पुन्हा त्यांच्या मोहिमेला बळकटी देण्यासाठी महत्त्वाचा ठरेल. (वृत्तसंस्था)

# खेळाडूंचा कॅमेऱ्याला विरोध नाही : कुंबळे

◆ **मुंबई, ३ मे**

या कंटेंट-केंद्रित युगात बहुतेक आधुनिक क्रिकेटपटूंना आपल्या ड्रेसिंग रुममध्ये काय चालले आहे, ते सर्वांना कळवण्याच्या कल्पनेला विरोध नाही असे मत भारताचे दिग्गज फिरकीपटू अनिल कुंबळे यांनी वेव्हज २०२५ कार्यक्रमात व्यक्त केले. खेळाडूचा ब्रॅण्ड प्रशासक किंवा प्रसारकाइतकाच शक्तिशाली झाला आहे, असे मत मॅथ्यू हेडनने व्यक्त केले.

शनिवारी येथे वेव्हज परिसंवाद कार्यक्रमादरम्यान 'लाइव्ह, इमर्सिव्ह आणि डिजिटल एक्सपीरियन्स: हाऊ स्पोर्ट्स लीग्स इनोव्हेशन चालवत आहेत' या शीर्षकाच्या पॅनेल चर्चेत ते बोलत होते.




मुंबईत वेव्हज २०२५ कार्यक्रमात मुलाखतीदरम्यान माजी क्रिकेटपटू मॅथ्यू हेडन व अनिल कुंबळे

जे खेळाडू पूर्वी आपल्या ड्रेसिंग रूममध्ये कॅमेरा ठेवण्यास सहमत नव्हते, ते आता माइक धरून संघाच्या रणनीतींवर मुक्तपणे चर्चा करतात, या ऑस्ट्रेलियाच्या माजी क्रिकेटपटूच्या मताशी माजी भारतीय कर्णधाराने सहमती दर्शवली.

'क्रिकेटमध्ये आलेले बहुतेक नवोपक्रम प्रसारण चालत आहेत. जो खेळाडू आहे, तो नेहमीच यापैकी कोणत्याही नाविन्यपूर्ण पद्धती वापरण्यास कचरत राहिला आहे, परंतु काळ बदलत आहे. जर तुम्ही २००८ कडे मागे वळून पाहिले तर ते आता काय आहे, अगदी प्रसारणाच्या दृष्टिकोनातूनही आयपीएल क्रिकेटमध्ये नवनवीन प्रयोग झाले आहेत. प्रत्येकजण ब्रॅण्ड होण्याचा प्रयत्न करत आहे आणि या प्रक्रियेत सामग्री तयार करत आहे, मग ते सामन्यांदरम्यान मैदानावर असो किंवा विविध समाज माध्यम प्लॅटफॉर्मवर असो, असे ते म्हणाले.

एक तरुण खेळाडू असो किंवा स्थापित खेळाडू, तुम्ही प्रत्येकाला तुमच्या स्वतःच्या आयुष्यात येऊ देत आहात. काय चालले आहे, लोक ते दाखवत आहेत. तुमचे व्यक्तिमत्त्व काय आहे, लोक ते दाखवत आहेत म्हणून त्यांना कॅमेरे येण्यास विरोध नाही. आता गोष्टी बदलल्या आहेत, असे ते म्हणाले.

खेळाडूचा ब्रॅण्ड क्रिकेट बोर्ड किंवा ब्रॉडकास्टरइतकाच मजबूत होऊ शकतो कारण खेळाडू स्वतः स्वतःचा ब्रॉडकास्टर असू शकतो. गरज आणि संघर्ष हे बदलाच्या चक्राचे प्रमुख घटक आहेत, असे हेडन म्हणाले. (वृत्तसंस्था)

# अखिल भारतीय कबड्डी स्पर्धेचा थाटात शुभारंभ

## भारतीय खेळाडूंची विश्वात ओळख : आ. खोडके



स्पर्धेचे उद्घाटन करताना आ. खोडके व मान्यवर

◆ **अमरावती, ३ मे**

विदर्भ ॲमॅच्युअर कबड्डी असोशिएशन, अमरावती जिल्हा कबड्डी असोशिएशन व शोध प्रतिष्ठानच्या वतीने चौथ्या ऑल इंडिया फेडरेशन कप पुरुष/महिला कबड्डी स्पर्धेचे शुक्रवारी थाटात उद्घाटन झाले. भारतीय खेळाडूंनी कबड्डीच्या विश्वात आपले अग्रगण्य स्थान निर्माण करून भारतीय क्रीडा संस्कृतीला नव्या उंचीवर नेले. अमरावतीच्या ग्रामीण व शहरी भागात कबड्डी लोकप्रिय असल्याने क्रीडा मंडळांचे पुनरुज्जीवन करून कबड्डीला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आपले विशेष प्राधान्य राहणार असल्याचे प्रतिपादन यावेळी आ. सुलभा संजय खोडके यांनी केले.

यावेळी मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, डायरेक्टर इंटरनॅशनल कबड्डी फेडरेशन तेजस्विनी गहलोद, ॲमॅच्युअर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष विभोर विनीत जैन, भारतीय कबड्डी फेडरेशनचे अध्यक्ष जितेंद्रसिंह ठाकूर, हरयाणा कबड्डी स्टेटचे अध्यक्ष कुलदीप दलाल, बिहार कबड्डी स्टेटचे अध्यक्ष कुमार विजयसिंह, उत्तराखंड कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष चेतन जोशी , महाराष्ट्र राज्य हौशी कबड्डी असोसिएशनचे सचिव बाबुराव चांदेरे , अमरावती विभागीय क्रीडा उपसंचालक शेखर पाटील, पोलिस उपायुक्त सागर पाटील, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त बलवानसिंह तसेच निवड समितीचे अनुप कुमार आदी व्यासपीठावर होते. क्रीडा ध्वज फडकवून व क्रीडा ज्योत प्रज्वलित करून स्पर्धेचा शुभारंभ झाला.

पहिल्या दिवशी पुरुष गटातून विदर्भ विरुद्ध पंजाब, महाराष्ट्र विरुद्ध राजस्थान, सर्व्हिसेस विरुद्ध हरयाणा, युपी विरुद्ध गोवा, इंडियन रेल्वे विरुद्ध राजस्थान, पंजाब विरुद्ध महाराष्ट्र, राजस्थान विरुद्ध विदर्भ, इंडियन रेल्वे विरुद्ध पंजाब असे ८ सामने खेळण्यात आले. महिला गटातून छत्तीसगड विरुद्ध विदर्भ, हिमाचल प्रदेश विरुद्ध तामिळनाडू, इंडियन रेल्वे विरुद्ध कर्नाटक, राजस्थान विरुद्ध छत्तीसगढ, हरयाणा विरुद्ध चंदीगड, विदर्भ विरुद्ध हिमाचल प्रदेश, राजस्थान विरुद्ध तामिळनाडू, हरयाणा विरुद्ध कर्नाटक असे सामने चांगलेच रंगले होते. (तभा वृत्तसेवा)

# पंजाब किंग्ज लखनौवर विजय नोंदवण्यास उत्सुक

## ऋषभ पंत फॉर्म मिळवण्याच्या प्रयत्नात

◆ **धर्मशाला, ३ मे**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी सायंकाळच्या सत्रात निसर्गरम्य वातावरणातील हिमाचल प्रदेश क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमवर श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाब किंग्ज ऋषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनौ सुपर जायण्ट्सवर विजय नोंदवण्यास उत्सुक असेल.

सध्या आयपीएलच्या गुणतालिकेत पंजाब किंग्ज १० सामन्यातील १३ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे, तर लखनौचा संघ १० सामन्यातील १० गुणांसह सहाव्या क्रमांकावर आहे. आयपीएल आता अंतिम टप्प्याकडे वळत असताना पंजाब किंग्ज आपले अव्वल चार क्रमांकातील स्थान मजबूत करण्यास उत्सुक आहे, तर लखनौ अंतिम चारमध्ये स्थान मिळवण्यास प्रयत्नशील आहे.

लखनौच्या पंतचा फलंदाजीतील वाईट फॉर्म व पंजाब किंग्जच्या श्रेयस अय्यरचा जबरदस्त फॉर्म, यामुळे रविवारी होणारा हा सामना रंजक ठरणार आहे व दोन्ही संघांचे नशीब निर्णायकपणे घडवू शकेल.



श्रेयस अय्यरला सामन्याच्या परिस्थितीची उत्तम समज आहे व आपल्या फलंदाजीशी कोणताही तडजोड न करता उत्तमरीत्या संघ नेतृत्व करत आहे. त्याने पंजाब किंग्जला चांगली सेवा दिली असून आपल्या शेवटच्या श्रेयसने हंगामातील आपले चौथे अर्धशतक झळकावले. त्यामुळे त्याच्या संघाला १० सामन्यांत १३ गुणांसह गुणतालिकेत चौथे स्थान मिळवून देण्यात मदत झाली.

दुसरीकडे, लखनौच्या ऋषभ पंतने फलंदाजीसह निराशाजनक कामगिरी केली आहे. त्याने १० सामन्यांत एकूण ११० धावा करून सहा एक-अंकी धावा केल्या आहेत. या हंगामात त्याची एकमेव उल्लेखनीय खेळी म्हणजे त्याने सीएसकेविरुद्ध ६३ धावा केल्या होत्या. लखनौ संघाला पंजाब किंग्जविरुद्ध विजय मिळवणे आवश्यक आहे.



गेल्या हंगामात कोलकाता नाईट रायडर्सच्या जेतेपदाच्या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या श्रेयस अय्यरला मेगा लिलावापूर्वी करार मुक्त करण्यात आले. पंजाब किंग्जने श्रेयसला तब्बल २६.७५ कोटी रुपयांना खरेदी केले. तेव्हापासून, त्याने आपल्या धारदार संघ नेतृत्वाने तत्काळ प्रभाव पाडला आहे.

अष्टपैलू ग्लेन मॅक्सवेलला बोटाच्या दुखापतीमुळे उर्वरित स्पर्धेतून बाहेर पडावे लागले आहे, त्यामुळे अय्यरला योग्य पर्याय शोधावा लागणार आहे. अय्यर परिस्थितीनुसार अझमतुल्लाह उमरझाई, अद्याप खेळू न शकलेला ॲरोन हार्डी किंवा झेव्हियर बार्टलेटला खेळवू शकतो. फलंदाजी विभागात, सलामीवीर प्रभसिमरन सिंगची अलीकडची कामगिरी स्वप्नवत राहिली. २५ वर्षीय प्रभसिमरन पूर्वीपेक्षा अधिक आत्मविश्वासाने खेळत होता. तो आयपीएलच्या इतिहासात ११०० धावा पूर्ण करणारा पहिलाच अनकॅप्ड खेळाडू ठरला.

प्रियांश आर्य, नेहल वढेरा व शशांक सिंग यासारख्या चांगल्या अव्वल व मध्यम फळीतील फलंदाजामुळे पंजाब किंगची फलंदाजी भक्कम दिसते.

फिरकीपटू युझवेंद्र चहलला सूर गवसल्यामुळे पंजाब किंग्जमध्ये उत्साह संचारलेला असेल. चहलने आपल्या शेवटच्या सामन्यात सीएसकेविरुद्ध सहजतेने हॅट्ट्रिक साजरी केली व संघाला विजय मिळवून दिला. दुखापतीतून सावरल्यानंतर वेगवान गोलंदाज मयंक यादवचे पुनरागमन सकारात्मक असले तरी, त्यांना मुंबई इंडियन्सकडून ५४ धावांनी पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

## केकियाओ डायमंड लीगमध्ये अविनाश साबळेला ८ वे स्थान

**केकियाओ, ३ मे -** भारताचा अविनाश साबळे शनिवारी सुरू असलेल्या केकियाओ डायमंड लीगमध्ये पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये आठव्या स्थानावर राहिला. त्याची ८ मिनिटे आणि २३.८५ सेकंदांची वेळ ही त्याच्या वैयक्तिक सर्वोत्तम व ८:०९.९१ या राष्ट्रीय विक्रमापेक्षा खूपच कमी आहे. साबळेने गत आठवड्यात झियामेन येथे झालेल्या वर्षातील आपल्या पहिल्या डायमंड लीग स्पर्धेत भाग घेतला होता आणि ८:२२.५९ वेळेसह पूर्ण केला होता. त्याआधी, ३० वर्षीय खेळाडूने शेवटचा सप्टेंबर २०२४ मध्ये झालेल्या डायमंड लीग फायनलमध्ये भाग घेतला होता, जिथे तो ८:१७.०९ वेळेसह नवव्या स्थानावर राहिला होता. तथापि, साबळेने त्याच्या १२ व्या पात्रता क्रमवारीत सुधारणा केली, त्यामुळे त्याला एक पात्रता गुण मिळाला.




## राष्ट्रीय दांडपट्टा स्पर्धेत सोलापूरला २ सुवर्ण १ रौप्य

**सोलापूर, दि. ३ मे-**

नाशिक येथे पहिल्या राष्ट्रीय दांडपट्टा स्पर्धेत दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन सोलापूरने १८ वर्षांवरील गटात २ सुवर्ण व १ रौप्य अशी ३ पदकांची कमाई केली. भावना गड्डम व ममता मंडल याने सुवर्ण तर कोमल मोरे हिने रौप्यची कमाई केली.

या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक विवेक मिस्कीन व साक्षी कानगुडे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप लाड, उपाध्यक्ष सुभाष मोहिते, सहसचिव अजय शहा, सहखजिनदार मोहम्मद रफीक शेख, दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशन सोलापूरचे अध्यक्ष तुकाराम भुसारे, उपाध्यक्ष योगीनाथ फुलारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले

## खेलो इंडिया तलवारबाजी स्पर्धेसाठी सोलापूरच्या प्रथमेश कस्तुरे व अदित्य निकते यांची निवड



**सोलापूर, दि. २ मे-**

पटना (बिहार) येथे दिनांक ११ ते १५ दरम्यान होणाऱ्या ७ व्या खेलो इंडिया स्पर्धेसाठी सोलापूरच्या प्रथमेश कस्तुरे व आदित्य निकते यांची निवड झाली.

रुद्रपुर, उत्तराखंड येथे झालेल्या १९ व्या कॅडेट राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरीवर त्यांची निवड झाली आहे. हे दोन्ही खेळाडू ईपी हा प्रकार खेळत असून बी.एफ. दमाणी प्रशालेचे विद्यार्थी आहेत. या खेळाडूंचे प्रशिक्षण शिबिर छत्रपती संभाजी नगर येथे प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाले आहेत. हे दोन्ही खेळाडू ऑल स्टार फेन्सिंग क्लबचे असून त्यांना पवन भोसले, वेदांत पवार व सोहम साठे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे महाराष्ट्र राज्य तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष प्रा.प्रकाश काटुळे व जिल्हा सचिव प्रा.दिपक शिंदे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांचे संघटना सदस्य जितेंद्र पवार, अनिल पाटील व राजेंद्र गोटे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## ग्रीन स्टार स्पोर्ट्स क्लबचे बास्केटबॉल शिबीर उद्यापासून

**सोलापूर, दि. ३ मे-**

ग्रीनस्टार स्पोर्ट्स क्लबच्यावतीने ५ मे ते ३१ मे पर्यंत बास्केटबॉल खेळाचे प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. हे शिबिर सकाळी ६:३० ते ८:३० आणि संध्याकाळी ६:१५ ते ८:१५ या वेळेत अश्विनी हॉस्पीटल जवळील राजीव गांधी बास्केटबॉल इनडोअर स्टेडियमवर होईल. या शिबिरात भाग घेणाऱ्या खेळाडूंना क्लबतर्फे टी शर्ट व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या शिबिरात तज्ञ मार्गदर्शक व राष्ट्रीय खेळाडूंचे मार्गदर्शन लाभणार आहे. नोंदणीसाठी ७९७२५००९१४ अथवा ९६५७२४२४९९ ह्या मोबाईलवर संपर्क साधावा.



## चेतक रोलर स्केटिंग शिबिर सुरू, महाराष्ट्र दिन साजरा

**सोलापूर दि. ३ मे-**

चेतक रोलर स्केटिंग क्लबतर्फे ८२वे स्केटिंग शिबिर सुरू झाले. हे शिबिर रोज सकाळी ७.१५ वा. होम मैदानालगत, पासपोर्ट ऑफिससमोर सुरू झाले. क्लबच्या मुलांनी महाराष्ट्र दिन साजरा केला. यावेळी चेतक क्लबचे अध्यक्ष प्रशिक्षक दिव्यकांत गांधी यांनी मुंबई राज्य विभागणीची, महाराष्ट्र - गुजरात, १ मे १९६० ही माहिती मुलांना दिली व वदवून घेतली.

महाराष्ट्र दिन अमर रहे, अपना महाराष्ट्र अमर रहे, मुलांनी असा जयघोष करीत असताना अलेक्या सानम हिने श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपूर्णाकृती पुतळ्यास हातात घेऊन स्केटिंग करीत प्रदक्षिणा केल्या.

प्रथम अक्षरा मेरगु हिने श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. राष्ट्रगीतानंतर भारतमातेला नमस्कार करून आईबाबांना, वडिलधाऱ्यांना गुरुजनांना, शाळेला, वह्या पुस्तकांना, वीर जवानांना, स्वातंत्र्यवीरांना, शेतकऱ्यांना, पोलीस डिपार्टमेंटला नमस्कार करून, शेवटी मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.

शिबिरादरम्यान ११ मे रोजी जागतिक मातृदिन तर १५ जून रोजी जागतिक पितृदिन व स्केटिंग स्पर्धा असे कार्यक्रम चेतक क्लबतर्फे घेण्यात येणार आहेत.

## किरण पवार चषक क्रिकेट स्पर्धा १२ मे पासून जुळे सोलापुरातील भंडारी मैदानावर

**सोलापूर, दि. ३ मे-**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या वतीने १२ मे पासून जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर १९ वर्षाखालील किरण पवार चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित केली आहे

डॅनीश केकने पुरस्कृत केलेली ही स्पर्धा ४० षटकाची आहे. या स्पर्धेत सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशतर्फे लेदर बॉल मोफत पुरवण्यात येईल. इच्छुक संघानी ८ मेपर्यंत प्रवेश फी सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन ऑफिसमध्ये येऊन जमा करणे बंधनकारक आहे. ज्या संघाची प्रवेश फी जमा होईल, त्या संघाचा स्पर्धेसाठी विचार केला जाईल. १० मे रोजी १२ वाजता सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या ऑफिसमध्ये स्पर्धेचे लॉट्स टाकण्यात येईल. एक सप्टेंबर २००७च्या पुढील जन्मलेले खेळाडू या स्पर्धेसाठी पात्र आहेत. संपर्क शिवा अकलूजकर (९८ ८१ ७८ ६५ ७८).

# पोक्सो गुन्ह्यातील तो फरार शिक्षक पोलीसांना अद्यापही सापडेना

## तपास अधिकारी बदलण्याची होतेय मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.३ मे-**

एका १७ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीस तू माझ्या घरी ये मी दहावीच्या पेपरला मदत करतो अशी भूलथाप मारुन घरी बोलावून तिचा विनयभंग केल्या प्रकरणातील आरोपी शिक्षक रमेश नागन्नाथ पाटील (रा.बोराळे) हा अद्यापही घटनेनंतर फरार असून पोलीसांना त्याचा शोध घेण्यात अपयश आले आहे.

आरोपी रमेश पाटील हा बोराळे येथील एका माध्यमिक शाळेत शिक्षक असून अन्य एका गावातील मुलगी या प्रशालेत शिक्षण घेत होती. तू माझ्या घरी ये मी तुला दहावीच्या पेपरला मदत करतो त्यामुळे तुला जास्त मार्क पडतील व तुझा बोर्डात नंबर येईल अशी भूलथाप मारुन घरी बोलावून तिच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केल्या प्रकारणाची फिर्याद पिडीत मुलीने मंगळवेढा पोलीसात दि.२८ एप्रिल रोजी दाखल केल्यानंतर गुन्हा दाखल झाला आहे. याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक करीत असून या घटनेला चार दिवस उलटूनही शिक्षक आरोपी पोलीसांना सापडत नसल्यामुळे सुज्ञ नागरिकामधून खंत व्यक्त केली जात आहे. मुलांना ज्ञान देणारा शिक्षक जर पोलीसांना सापडत नसेल तर सराईत गुन्हेगार कसा सापडणार? असा सवालही नागरिकातून केला जात आहे. शिक्षकाने मोबाईलवरुन लोकेशन पोलीसांना मिळू नये म्हणून त्याला तिलांजली देत मोबाईल घरी ठेवून पलायन केले आहे. सुरुवातीला पोलीस प्रशासनाने गुन्हा दाखल करण्यासही टाळाटाळ केली होती. पिडीत कुटूंबियाने व समाजाने चक्क पोलीस ठाणेसमोर आंदोलन करुन पोलीसांना गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले. आता शिक्षक आरोपी सापडतच नसल्यामुळे तपासावरच शंका, कुशंका व्यक्त करीत क्राईम मध्ये अलर्ट असणारा तपास अधिकारी नेमावा अशी मागणी आता नागरिकामधून पुढे येवू लागली आहे.

# भारत विजयी पताका फडकवेल; मोहोळच्या नागनाथ यात्रेत भाकणूक

## डीजीटल स्क्रीनमुळे वृद्ध आणि महिलांना झाला फायदा; सुमारे ५० हजार भाविक उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.३ मे-**



देशासमोरचा तिढा सोडवण्यासाठी सर्वांशी विचार विनिमय केला जाईल. त्यासाठी आवश्यक प्रमुखांच्या बैठका होतील आणि त्यातून घेतलेल्या निर्णयाप्रमाणे धाडसाने यावर मात करून अखेर विजय पताका फडकेल अशी भाकणूक मोहोळच्या ग्रामदैवत नागनाथ यात्रेतील खर्गाच्या दिवशी झाली. राज्यात येथील भाकणूक प्रसिध्द आहे.

मोहोळच्या यात्रेत खर्ग म्हणजे पहाटेचा कार्यक्रम आणि नंतर तीन दिवसांनी गण म्हणजे दुपारचा कार्यक्रम होत असतो. यादिवशी उत्तर दिशेला असलेल्या दिल्ली दरवाजामध्ये होणाऱ्या भाकणुकीकडे राज्यातील सर्व जनतेचे लक्ष असते. नुकताच झालेला पहलगाम हल्ला आणि देशासमोर उद्भवलेला पेचप्रसंग या पार्श्वभूमीवर खर्गाची भाकणूक नेमकी काय होते याकडे सगळ्यांचे लक्ष होते. याविषयी अधिक माहिती देताना ज्यांना नागनाथभेट देण्यासाठी येतात असे हैग्रस वंशज प.पू. विनायकराव तथा अरुण काका मोहोळकर यांनी या भाकणुकीचा अर्थ सांगितला. सुरुवातीला पहाटे सर्व धार्मिक विधी पार पडल्यानंतर विनायकराव तथा अरुणबुवा यांनी खर्गे महाराजांच्या तोंडात साखर भरवल्यानंतर त्यांच्या शरीरामध्ये भगवान शंकरांचा संचार होतो असे मानले जाते. ते देवळातून बाहेर पडल्यानंतर दिल्ली दरवाज्यात ही भाकणूक होते. त्यानंतर अभंग, साकी म्हणत पालखी आणि खर्गे महाराज मिरवणूकीने खर्गतीर्थाकडे जातात. खर्गतीर्थामध्ये पाण्यातच ही गुरु शिष्यांची गळाभेट होते. तिथेच पावसाची भाकणूक होते. ही भेट होण्यामागचा इतिहास असा आहे की नागनाथांनी अवतार समाप्ती होताना हैग्रसांना वचन दिले होते की मी यावत्चंद्र दिवा करौ तुझ्या वंशजांना भेट देत राहीन. त्यानुसार ही भेट होते. त्यानंतर ओढ्याम ध्ये पेरणीची भाकणूक होते. त्यानंतर काकडे पार येथे मोहोळ शहर परिसराची भाकणूक होते. त्यानंतर मुंगी धोंडा येथे चाऱ्याची भाकणूक होते. त्यानंतर आलेल्या मार्गाने परत पालखीसह खर्गे महाराजांची सवाद्य मिरवणूकदेवळापर्यंत येते. त्याठिकाणी शेटेच्या वाड्यासमोर धान्याची भाकणूक होते.

तेथून देव परत देवळात प्रवेश करतात आणि आरती होऊन प्रसाद वाटून या जवळजवळ दोन तास चाललेल्या कार्यक्रमाची सांगता होते. या कार्यक्रमाला जवळपास ५० ते ६० हजार भाविकांनी हजेरी लावल्याचे दिसून आले. मोहोळ पोलीस ठाण्याच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता तर नागनाथ देवस्थान कमिटीच्या वतीने यावर्षी नऊ ठिकाणी डिजीटल स्क्रीन उभे केल्यामुळे भाकणूक आणि खर्गतीर्थातील भेट थेट बघण्याचा आनंद खास करून वृद्ध आणि महिलांना घेता आला.

# 'मलाही अधिकारी बनायचंय' ऐकून भारावले सीईओ

## मोडनिंब शाळेत विद्यार्थ्यांशी साधला संवाद; जंगम यांनी केले शाळेचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३ मे-**



मोडनिंब (ता. माढा) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्र. १ व जिल्हा परिषद मुलींची शाळा या भेटीदरम्यान चौथीतील विद्यार्थी क्षितिज रणदिवे याने 'मलाही अधिकारी बनायचंय' या विषयावर उत्स्फूर्त भावना व्यक्त करत काही प्रश्न विचारले. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम भारावून गेले. त्यांनी हसतमुखाने आणि प्रेरणादायी पद्धतीने सर्व प्रश्नांची उत्तरे देत मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समर्पित कार्याचेही त्यांनी मनापासून कौतुक केले.

यावेळी गुणवत्ता, शैक्षणिक प्रगती, स्पर्धा परीक्षा तयारी, टॅलेंट हंट, क्रीडा स्पर्धा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या क्षेत्रात सातत्याने अग्रेसर राहिलेल्या आहेत, याच पार्श्वभूमीवर शाळेच्या विविध उपक्रमांचे आणि यशस्वी वाटचालीचे कौतुक करण्यासाठी सोलापूर जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी पीएमश्री योजनेअंतर्गत शाळेच्या मैदानाच्या सपाटीकरणाचे काम, धोकादायक इमारतींचा आढावा, तसेच भौतिक सुविधांची पाहणी करण्यात आली. तसेच, कुठलीही अडचण असेल तर मला वैयक्तिकरित्या फोन किंवा मेसेज करा, असे सांगत त्यांनी आपल्या जवळिकीचा ठसा उपस्थितांच्या मनावर उमटवला.

यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, शिक्षणाधिकारी कादर शेख, गटविकास अधिकारी महेश सुळे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, केंद्रप्रमुख शिवराज ढाले, मुख्याध्यापक राजन सावंत, हरिदास जाधव, अरण केंद्रप्रमुख बंडू कोळी, राहुल पाटील, माजी सरपंच दत्तात्रय सुर्वे, तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या या भेटीने शाळेला आणि विद्यार्थ्यांना नवचैतन्य मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### धोकादायक खोल्यात शिक्षण; पालकांमध्ये नाराजी

मोडनिंब (ता. माढा) येथील जिल्हा परिषद मुलांची शाळा नं. १ आणि मुलींची शाळा या दोन्ही जिल्हा परिषद शाळा एकाच प्रांगणात भरवल्या जातात. मुलींच्या शाळेसाठी पहिली ते सातवीसाठी १४ तुकड्यांमध्ये वर्ग भरविले जातात. या शाळेच्या १९ वर्ग खोल्यापैकी १० खोल्या धोकादायक अवस्थेत आहेत. तर मुलांच्या शाळेसाठीही पहिली ते सातवीसाठी १४ तुकड्यांमध्ये वर्ग भरविले जातात. या शाळेच्या १५ वर्ग खोल्यांपैकी ५ खोल्या धोकादायक अवस्थेत आहेत. या दोन्ही शाळेतील १५ वर्ग खोऱ्या धोकादायक स्थितीत असल्याने दोन सत्रात शाळा भरविण्याची वेळ शिक्षकांवर येत आहे. या प्राथमिक गरजा पूर्ण होण्याऐवजी पीएम श्री योजनेतून क्रीडांगण सपाटीकरणासारखा अनावश्यक खर्च होत असल्याची चर्चा पालकांतून होत आहे.




# गौडगावच्या शिवाजी शिक्षण संस्थेला कृष्णाकाठ भूषण पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ मे-**

शिवांजली फाउंडेशन मलकापूर या संस्थेच्यावतीने दिला जाणारा यशवंतराव चव्हाण कृष्णाकाठ भूषण आदर्श शिक्षण संस्था हा पुरस्कार श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गौडगाव या संस्थेस वेणुताई चव्हाण सांस्कृतिक सभागृह शिवाजीनगर कराड येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

तसेच संस्थेचे सचिव पंडितराव लोहोकरे यांनाही त्यांच्या शैक्षणिक आणि साहित्यिक कार्याबद्दल पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे सचिव पंडितराव लोहोकरे, सहसचिव अरुण भड, संचालक अरविंद चव्हाण व भास्कर काकडे हे उपस्थित होते. संस्थेने आजवर केलेल्या शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर पुरस्काराच्या वितरणप्रसंगी शिवांजली फाउंडेशनचे पदाधिकारी प्रमुख पाहुणे एन.डी. पाटील, किसनराव कुराडे, द्रोणागिरी संस्थेचे अध्यक्ष डॉ. डी. पी. खाडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष आर. एस. चोपडे, स्वागत अध्यक्ष प्रवीणकुमार जगताप, नामदेव पडवळे, निमंत्रक प्रा.डॉ. हनुमंतराव कराळे पाटील हे उपस्थित होते. सदर पुरस्कार प्रदान केल्याबद्दल संस्था अध्यक्ष श्री. विनायकराव बप्पा गरड, उपाध्यक्ष बळवंतराव पाटील, खजिनदार मदनलाल खटोड , संचालक अनिल गरड, जीवन लोहोकरे, वसंत काकडे, डॉ. संतोष भड, नरेंद्र भड, महेश पाटील गावातील ग्रामस्थ संस्थेची संलग्न शाखाप्रमुख, कर्मचारी यांनी आभार व्यक्त केले.



# स्पर्धा परीक्षा जीवनाला कलाटणी देवू शकतात

## जयप्रकाश पाटील; शाळा आपल्या दारी उपक्रमाची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ३ मे-**

शाळा, ग्रामस्थ व पालक या त्रिवेणी संगमातूनच विद्यार्थ्यांचा व शैक्षणिक संकुलाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. वर्तमान युगात विद्यार्थी दशेत स्पर्धा परीक्षेला अनन्य साधारण महत्व असून शैक्षणिक जीवनात स्पर्धा परीक्षा जीवनाला एक नवी कलाटणी देवू शकतो हे ओळखून विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रमाने उज्वल यश मिळवावे, असे प्रतिपादन श्री हनुमान विद्यामंदिर, बंकलगीचे मुख्याध्यापक जयप्रकाश पाटील यांनी केले.

श्री हनुमान विद्यामंदिर, बंकलगीच्या वतीने आयोजित दि. ५ एप्रिल ते ३० एप्रिल शाळा आपल्या दारी उपक्रमाची सांगता व पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी विद्यार्थी पूर्वा कुरें, प्रतीक्षा शिंगे, प्रणव शिंदे या विद्यार्थ्यांच्या घरी जावून विद्यार्थी व पालक यांचा व वर्षभर परिश्रम घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षा प्रमुख सुप्रिया जामगे यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश मदभावी, स्टेट बँकेचे अधिकारी महादेव पोमाजी कोणदे गुरुजी उपस्थित होते. यावेळी बोलताना स्टेट बँकेचे अधिकारी महादेव पोमाजी म्हणाले आजच्या काळात विद्यार्थी हितासाठी शाळा, शिक्षक, विद्यार्थी यांच्यामध्ये एकोपा असणे गरजेचे असून आज बापुजींच्या संस्कार केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी यशस्वी विद्यार्थी व पालकांचा सत्कार करण्याची भूमिका एक वेगळा संदेश समाजाला दिला आहे असे भावनीक गौरवोद्गार यावेळी त्यांनी व्यक्त केले. स्पर्धा परीक्षेत योगदान दिलेल्या जेष्ठ शिक्षक आप्पासाहेब हत्तुरे, अमोल भावसार, पंडीत कुंभार, श्रेयस पाटील, एन.एस.राऊत यांचाही गौरव करण्यात आला.

# फिर्यादी फितूर; खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपातून तिघांची निर्दोष मुक्तता


**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ३ मे -**

खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपातून तिघांची सबळ पुराव्याअभावी येथील सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. प्रशांत पांडुरंग शिंदे (वय ३५), सारिका उर्फ दैवशाला प्रशांत शिंदे (वय ३०), ऋषिकेश पांडुरंग बुरगुटे (वय ३५) सर्व रा. उपळे दुमाला अशी निर्दोष मुक्तता झालेल्यांची नावे आहेत. यातील जखमी अजिंक्य अशोक जाधव रा उपळे दु याने फिर्याद दिली होती. दि ८ एप्रिल २०१८ रोजी सदरची प्राणघातक हल्ल्याची घटना घडली होती.

अधिक माहिती अशी की, घटनेदिवशी फिर्यादी शेतात असताना त्याला झाड तोडतानाचा आवाज आल्याने तो तेथे गेला असता प्रशांत व ऋषिकेश हे बांधावरील झाड तोडताना दिसले. त्याने त्यांना बांधावरील झाड न तोडण्याबाबत विनंती केली असता त्या दोघांनी फिर्यादीस शिवीगाळ केली. त्यावेळी सारिका विळा घेवून तेथे आली. सारिका व ऋषिकेशने फिर्यादीस पकडले व प्रशांतने विळ्याने पोट व हातावर वार केला. सारिका व ऋषिकेशने लाथाबुक्क्याने मारहाण केली. यात फिर्यादी गंभीर जखमी झाला. याबाबत फिर्यादीचे जबाबावरुन वैराग पोलिसांत तिघांवर प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषरोपपत्र ठेवले. अति. सत्र न्यायाधीश एल. एस. चव्हाण यांच्यासमोर खटल्याची सुनावणी झाली. सुनावणीवेळी फिर्यादी फितूर झाला. फिर्यादीने पोलिसांना दिलेल्या जबाबातील मजकूर नाकारला. सरकारपक्षाने एकच साक्षीदार तपासला. गुन्हा शाबीत न झाल्याने न्यायालयाने सबळ पुराव्याअभावी तिघांची निर्दोष मुक्तता केली. आरोपी शिंदेच्यावतीने एच. एच. बोधले, आरोपी बुरगुटेच्यावतीने एस. एस. जाधवर यांनी काम पाहिले.

# चेअरमन महेश इंगळे यांना यशकल्याणी समाजरत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.३ मे -**



अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांचा येथील यशकल्याणी संस्थेतर्फे समाजरत्न पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.

येथील यशकल्याणी सेवाभवन येथे हा समारंभ झाले. यावेळी प्रा.गणेश करे पाटील, देवस्थानचे विश्वस्त तथा करमाळ्याचे माजी सभापती प्रा.भारतराव शिंदे, नि.पोलीस उपअधिक्षक गोडगे, जिल्हा इंग्लिश टीचर्स असो. अध्यक्ष प्रा.बाळकृष्ण लावंड, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख, प्रा. शिवशरण अचलेर, पत्रकार श्रीशैल गवंडी, गजेन्द्र पोळ, प्रयोगशील शेतकरी प्रशांत नाईकनवरे, जीवन शिक्षण फौंडेशनचे प्रमुख प्रा. जयेश पवार, प्रा भिष्मा चांदणे, प्रा.विष्णू शिंदे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रा.सुखदेव गिलबीले, जलसंपदा अभियंता अतुल दाभाडे, सहसचिव मारूती जाधव, तालुका इंग्लिश टीचर्स असो. अध्यक्ष, कल्याणराव साळुंके, प्रा. विठ्ठल रोडगे, निवृत्ती बांडे, भिवा वाघमोडे, सैनिक संघटनेचे सचिव सुभेदार बिभिषण कन्हेरे, पंचायत समितीचे समन्वयक रेवन्नाथ आदलिंग लोक विकास प्रोड्युसर कंपनीचे संचालक व केळी निर्यादार विष्णू पोळ, बाळासाहेब एकबोटे, अंकुश केत, सुनिल पवार, चंद्रकांत सोनटक्के, स्वामीनाथ मसळे तसेच करमाळा परिसरातील मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सोलापूर जिल्हा इंग्लिश टीचर्स असो. अध्यक्ष प्रा. बाळकृष्ण लावंड, राष्ट्रीय सेवा योजनेचे सोलापूर जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख, कृषी पत्रकार गजेंद्र पोळ यांच्या कार्याची दखल घेऊन देवस्थानचे वतीने महेश इंगळे यांचे हस्ते सन्मान करण्यात आला.

आपल्या मनोगतात प्रा.करे- पाटील पुढे म्हणाले की स्वामी समर्थ देवस्थानमार्फत विविध पातळीवर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्तुंग कार्य सुरू आहे. तसेच देवस्थानचे वतीने स्वामी भक्तांना सर्वोत्तम सुविधा मिळवून देण्यासाठीचे सेवाकार्यही व्यापक प्रमाणावर प्रगतीपथावर असून ते अतुलनीय आहे असे मत त्यांनी यावेळी बोलताना मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.बाळकृष्ण लावंड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.विष्णू शिंदे यांनी केले तर आभार प्रा.मारूती जाधव यांनी मानले.

## निधन वृत्त...

### नंदा कांबळे



**बार्शी, दि. ३ मे -**

तालुक्यातील धोत्री येथील नंदा विश्वास कांबळे (वय ६३ रा. धोत्रे, ता बार्शी ) यांचे गुरुवार दि. १ मे रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. शुक्रवारी त्यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमी बार्शी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे आणि एक मुलगी असा परिवार आहे .बहुजन समाज पार्टीचे किशोर कांबळे यांच्या त्या काकी होत.

### रामराव बिराजदार



**सोलापूर, दि. ३ मे -**

सैफूल येथील रहिवाशी रामराव नानाराव बिराजदार (तावशी गड) यांचे निधन झाले आहे. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते. मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे

### शिवराज गुळवे



**करमाळा, दि. ३ मे-**

केम येथील रहिवाशी शिक्षक सेवानिवृत्त शिवराज रामचंद्र गुळवे, वय ७८ यांचे आज गुरुवार दि. १ मे रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे.

### सरस्वती गुंड



**सोलापूर, दि. ३ मे-**

सरस्वती सौदागर गुंड (वय ७२) यांचे शुक्रवारी अकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# निराळे वस्तीतील शिवमंदिरचे लोकार्पण

## मंत्री सरनाईक यांच्या हस्ते कार्यक्रम; नाना मस्के यांचे स्वप्न पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. ३ मे -**



सोलापूर : प्रतिनिधी

तात्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष निधीतून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या प्रयत्नातून निराळे वस्ती येथे उपजिल्हा प्रमुख तुकाराम मस्के यांच्या मागणीनुसार बांधण्यात आलेल्या शिवमंदिराचे लोकार्पण संपर्कमंत्री तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, उपजिल्हाप्रमुख तुकाराम मस्के उपस्थित होते. शिव मंदिराच्या लोकार्पणाप्रसंगी बोलताना तुकाराम मस्के म्हणाले, मागील २५ वर्षापासून निराळे वस्तीतील नागरिक शिव मंदिराची मागणी करत होते परंतु ती पूर्ण होत नव्हती अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात निधी मंजूर झाला जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी कामास सुरुवात केली. आमचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

लोकार्पणानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आम्ही सर्व मंत्री शिवसैनिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, कोणतीही अडचण आल्यास तात्काळ संपर्क साधावा. जुने ज्येष्ठ शिवसैनिक नाना मस्के यांचे स्वप्न पूर्ण झाले यात आनंद आहे.

यावेळी निराळे वस्तीतील जय महाराष्ट्र तरुण मंडळाचे ज्ञानेश्वर शिंदे, अजय माने, अजय मस्के, नागा मंडलिक, लखन पवार, मनोज भांगे, गणेश कोरे, अविनाश हात्तरगी, सिद्धू कोरे, सिदराम ढोबळे, जय मस्के, सचिन सुरवसे आदिसह कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा नियोजनच्या निधीचे वाटप समान व्हावे : कैलास शिंदे

**उमरगा,दि.३ मे-**

जिल्हा नियोजन समितीमार्फत दिल्या जाणाऱ्या विकासनिधीचे समान वाटप करावे. जुन्या, निष्ठावंत कार्यकर्त्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी मागणी भाजपचे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष कैलास शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली आहे.

उमरगा विधानसभा मतदारसंघात शिवसेना (उबाठा) पक्षाचे प्रवीण स्वामी विजयी झाले. निधीचे वाटप करताना भाजपच्या कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ नये. तालुक्यातील निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आहे. २००९ पासून उमरगा-लोहारा मतदारसंघातून सलग शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत. युती असल्यामुळे भाजपला या मतदारसंघातून संधी मिळाली नाही. राज्यात भाजपची सत्ता असूनही उमरगा-लोहारा तालुक्यातील कार्यकर्त्यांवर अन्यायच झाला आहे. कोणत्याही प्रकारचा लाभ होत नसतानाही प्रामाणिकपणे, झोकून देऊन पक्षाचे काम करणाऱ्या जुन्या, निष्ठावंत कार्यकर्त्यांना न्याय द्यावा. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक होणार आहे. त्यादृष्टीने कार्यकर्त्यांना बळ देण्याची गरज आहे. अशीही मागणी शिंदे यांनी निवेदनात केली आहे.

# अंतर्गत डेव्हलपमेंट मन शांती देऊ शकते : भन्ते यश थेरो

✔ बौद्ध साहित्य संमेलनाचे उद्घाटन; श्रीलंका येथील भंतेजींनी दिली धम्मदेशना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

बाहेरची डेव्हलपमेंट बाहेरील सुख देऊ शकते परंतु अंतर्गत डेव्हलपमेंट ही मनशांती देऊ शकते, असे विचार श्रीलंका येथील भंते यश थेरो यांनी व्यक्त केले. बौद्ध साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सत्रात ते धम्मदेशना देत असताना बोलत होते.

एक दिवसीय बौद्ध साहित्य संमेलनाचे उद्घाटन सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिरात शनिवारी सकाळी ११ वाजता करण्यात करण्यात आले. यावेळी श्रीलंका येथील भन्ते यश थेरो यांची धम्मदेसना झाली. यावेळी पाणीपुरवठा विभागाचे अभियंता संजय धनशेट्टी, कुर्डूवाडी नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी शाहू सतपाल, मुंबईचे विचारवंत डॉ. आनंद देवडेकर, प्रा.डॉ. विजय मोहिते, संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे, स्वागत अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रारंभी संमेलनाचे स्वागत अध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांनी संमेलनाची रूपरेषा सांगून आढावा घेतला.

भंते यश थेरो पुढे म्हणाले की, ज्याचे विचार चांगले असतात त्यांना समाज आठवण ठेवतो. बाबासाहेबांचे विचार चांगले होते त्यामुळेच आपण त्यांची आठवण काढतो. चोरी, विचार, खोटे बोलणे याचे स्वरूप आता बदलले आहे. ईर्षा आणि कंजूशी मुळे लोक शांततेने जगू शकत नाहीत ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ध्यान आणि धर्म त्यावर उत्तर असले तरी धान धर्माच्या अनेक ठिकाणी केवळ शो होतो.पती-पत्नी, आई- वडील, भाऊ- बहीण अशा वेगवेगळ्या नात्यांमध्ये कंजूशी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. प्रत्येकाला सोने हिरे सारखे मौल्यवान व्हायचे आहे मात्र त्यासाठी लागणारे कष्ट घेण्याची तयारी मात्र कोणाचीही नसते. चांगले वाईट यात भेद करण्याचे काम प्रज्ञा करत असते, असेही भंते यश थेरो म्हणाले. सूत्रसंचालन युवराज भोसले आणि निर्मला मौळे यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रकाश शिंदे यांनी मानले.

**बौद्ध साहित्य जीवनाचे दर्शन घडवणारे साहित्य : योगीराज वाघमारे**

काही लोकांना बौद्ध साहित्य म्हणजे भगवान बुद्धांचे चरित्र एवढेच सीमित विषय वाटते परंतु बुद्ध धम्म आणि त्यांची तत्वे सिद्धांत, आचरण, शिकवण असे कितीतरी विशाल सखोल ज्ञान आहे. जे अमर्याद आहे. त्रिपिटकासारख्या महाग्रंथात सामावलेले आहे. हजारो पृष्ठ आणि तीन करोड शब्दांकित आहे. बौद्ध साहित्य अत्यंत उदात्त, गहन, जटिल आणि विद्वत्ता पूर्ण जीवनाचे दर्शन घडवणारे असे साहित्य आहे. २५५० वर्षापासून आतापर्यंत केवळ आशिया खंडातच नव्हे तर जगाच्या अन्य भागातही ते पसरलेले आहे. जगातील विविध देशातील लोकांनी बौद्ध संस्कृती विकसित करण्यात फार मोठे योगदान दिलेले आहे. मनोविज्ञान, मन कसे काम करते? भावना कशा काम करतात? ब्रह्मांड विज्ञान तर्क, अंतररदृष्टी एवढेच नव्हे तर विपश्यना, ध्यानधारणा इत्यादी संदर्भात आपल्या मनाला प्रशिक्षित करून जीवन सुखमय करण्याचा प्रयत्न बौद्ध साहित्य करते, असे विचार संमेलनाचे अध्यक्ष योगीराज वाघमारे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले.

**भंतेजींना सैनिकांची सलामी**

बौद्ध साहित्य संमेलनासाठी श्रीलंकेहून आलेल्या भंते यश थेरो यांना परिसरात आल्यानंतर शाक्य संस्था, सिदनाक ब्रिगेड व समता सैनिक दल या तिन्ही दलाची एकसंघ सलामी देण्यात आली. यावेळी जय भीमचा एकच घोष झाला. पुष्पवृष्टी करण्यात आली.

**संमेलनातील इतर वैशिष्ट्य**

- महापालिकेचे निवृत्त अधिकारी अशोक वाघमारे यांचा स्फूर्तीगिताचा कार्यक्रम...
- सोलापुरातील रेकॉर्ड ब्रेक उन्हात देखील हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये पांढरे वस्त्र परिधान करून बौद्ध उपासक - उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित...
- परिसरात नालंदा ग्रंथ दालन उभारण्यात आले असून या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्ध यांच्या जीवनचरित्राची पुस्तके उपलब्ध होती. त्याशिवाय विविध स्टिकर्स, बॅचेस या ठिकाणी विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. त्यालाही उपस्थितांनी प्रतिसाद दिला.

## महत्वाचे...



### मुख्याध्यापिका लांबतुरे-गवळी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर, दि. ३ मे-**

गोवा येथील नॅशनल रुरल डेव्हलमेंट फाऊंडेशनच्यावतीने दिला जाणारा राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापिका पुरस्कार येथील यमाईदेवी प्राथमिक आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका रुक्मिणी परशुराम लांबतुरे-गवळी यांना प्रदान करण्यात आला. दिल्ली, कनार्टक, महाराष्ट्र, गुजरात व गोवा या पाच राज्यातील निवडक व्यक्तीचा या संस्थे तर्फे राष्ट्रीय पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. कर्नाटक येथील थोर साहित्यीक व समाजसेविका अर्चना गुरव यांच्या हस्ते सांखळी येथील रविंद्र भवन येथे पुरस्काराचे वितरण करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून अरविंद रेड्डी, कोल्हापूरचे माजी महापौर शिंगोडे, सोलापूरच्या राष्ट्रीय अनुसूचि जाती आयोगाच्या माजी सदस्या सुरेखा लांबतुरे, संस्थापक अशोक लांबतुरे, सचिव मधुकर गवळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सन्मानचिन्ह, अभिनंदन पत्र, शाल व श्रीफळ, म्हैसूर फेटा व चंदनाचा कायमस्वरुपी हार असे पुरस्काराचे स्वरुप होते. विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. पुरस्कार प्राप्त व्यक्तीची ढोली बाजाच्या निदानात, हलग्यांच्या कडकडात व तुतारीच्या गगनभेदी आवाजात वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येवून कार्यक्रम स्थळी घेवून जात होते. या निवडीबद्दल यमाईदेवी आश्रमशाळा मार्डी येथील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी स्टाफ, समाजातील प्रतिष्ठीत मान्यवरांनी व इतर अनेक जणांनी लांबतुरे यांचे अभिनंदन केले.

### चंदू बंदपट्टे यांच्या स्मरणार्थ शालेय साहित्य वाटपाचा संकल्प

**सोलापूर, दि. ३ मे-**



हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिवस तथा कै. श्री चंदू भीमशा बंदपट्टे यांच्या जन्मदिनास्मरणार्थ दोन हजार मुलांना शालेय साहित्य वाटपाचा संकल्प चंद्रनील सोशल फाउंडेशनया वतीने करण्यात आले आहे. शाळा हे केवळ शिकण्याचे घर नाही तर ते प्रत्येक मुलाचे दुसरे घर आहे शाळेचे ते दिवस कोणाला आठवणार नाहीत. मुलांनी शाळेला गेल पाहिजे आणि कुठल्याही अडचणीशिवाय म्हणूनच चंद्रनील सोशल फाऊंडेशनच्या वतीने दरवर्षी असंख्य गरजू मुलांना शालेय साहित्याच वाटप करण्यात येत. गरजवंतानी चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या कार्यालयास दि. ३ ते २० मेपर्यंत आवश्यक कागदपत्रांसहित भेट द्या आणि नाव नोंदणी करून घ्या, असे आवाहन संस्थापक सी. ए. सुशील बंदपट्टे यांनी केले आहे.

### सद्गुरु शंकर महाराज पुण्यतिथीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर, दि. ३ मे-**



श्री प. पूज्य. सद्गुरु शंकर महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त ५ मे रोजी सद्गुरु शंकर महाराज भक्त मंडळ व श्री सद्गुरु श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदिर येथे सकाळ पासून सायंकाळ पर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. सद्गुरु शंकर महाराज पुणयतिथीनिमित्त उत्सव कार्यक्रम सकाळी ठीक ७.३० वाजता रुद्र यागाने सुरुवात होईल. तदनंतर सकाळी ९ वाजता श्री सद्गुरु शंकर महाराज प्रतिमा पूजन, सायंकाळी ५ ते ६ श्री यशश्री भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर सायंकाळी सद्गुरु महाआरती मान्यवरांच्या हस्ते होईल व प्रसाद वाटप होणार असल्याचे असे श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यास ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोद डोंगरे यांनी कळविले आहे.

### निराळे वस्तीत पूर्ववैमनस्यातून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ३ मे-**

निराळे वस्तीतील लक्ष्मी मंदिराजवळ शुक्रवारी रात्री १० वाजता पूर्ववैमनस्यातून तरुणाला पाच जणाच्या जमावाकडून मारहाण करण्यात आली. आकाश विजय जाधव (वय ३४, रा. निराळे वस्ती) असे मारहण झालेल्या तरुणाचे नाव आहे. आकाश आणि सौफी तसेच आदित्य हांडे यांच्यात यापूर्वी तक्रार झाली होती. तेव्हापासूनच आदित्य आणि सौफी हे आकाशवर चिडून होते. शुक्रवारी रात्री दहाच्या सुमारास आदित्य आणि सौफी हे आकाश थांबलेल्या ठिकाणी आले. त्यांनी त्यांच्यासोबत आणखी तीन जणांना आणले होते. या सर्वांनी आकाश यास पूर्वीच्या भांडणाच्या रागातून कोयत्याने हल्ला केला. या हल्ल्यात उजव्या हाताच्या पंजा व मानेला जखम झाली. जखमी अवस्थेत रात्री १०.४५ वाजता भाऊ विजय याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### भावाने ढकलून दिल्याने बहिण जखमी

**सोलापूर, दि. ३ मे-**

घरगुती कारणातून सासरवाडीत भावाने ढकलून दिल्याने बहीण जखमी झाली. हा प्रकार करमाळा तालुक्यातील कंदर येथे शुक्रवारी रात्री १० वाजता घडला. अंजली ओम पिंपळे (वय २०, रा. लिमगाव ता माळशिरस) असे जखमी महिलेचे नाव आहे. करमाळा तालुक्यातील कंदर येथे शुक्रवारी रात्री दहा वाजता घरगुती कारणातून वाद झाला. त्यावेळी किशोर पिंपळे याने बहिण अंजली हिस ढकलून दिले. यात खाली पडल्याने अंजलीच्या डोक्याला मुकामार लागल्याने माढा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून शनिवारी सकाळी ८.३० वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# लाच प्रकरणातून शिपायाची मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे -**

जात पडताळणी खात्यातील शिपयाची लाच प्रकरणातून मुक्तता करण्याचे आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी मुक्तता करण्याचे आदेश दिले. यातील तक्रारदारांना त्यांच्या मुलीच्या पुढील शिक्षणासाठी जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यानी संगणकीय प्रणालीद्वारे अर्ज दाखल केलेला होता.



सदरचा अर्ज प्रत्यक्षरीत्या देण्यासाठी तक्रारदार हा सोलापूर येथील जात पडताळणी कार्यालयात गेला असता, तेथील कार्यरत शिपाई मच्छिंद्र भांडेकर यांनी तक्रारदाराची कागदपत्रे पाहून ती दाखल करून घेण्यासाठी व लवकरात लवकर काम करून देण्यासाठी म्हणून तक्रारदाराकडे ५ हजार रुपये लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदाराने आरोपी भांडेकर यांच्याविरुद्ध सोलापूर येथील लाचलुचपत प्रतिबंध कार्यालयाकडे तक्रार दाखल केलेली होती. तक्रारदाराच्या तक्रारीनुसार शासकीय पंचांसमक्ष आरोपीकडून करण्यात आलेल्या लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली. आरोपी भांडेकर यांनी तक्रारदाराच्या मुलीचे जात पडताळणी प्रमाणपत्र लवकरात लवकर करून देण्यासाठी १५ हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती लाच ७ हजार रुपये स्वीकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झालेले होते. त्यानुसार आरोपी भांडेकर यांच्याविरुद्ध पुढील सापळा रचण्यात आला, सदर सापळा कारवाईत आरोपी भांडेकर यांना ७ हजारांची लाच तक्रारदाराकडून स्वीकारताना लाचलुचपत विभागाच्या पोलिसांनी अटक करून सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्यानंतर आरोपीविरुद्ध सोलापूर येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले होते.

सरकार पक्षातर्फे एकूण तीन साक्षीदार तपासण्यात आले होते. साक्षीदार व कागदपत्रांच्या आधारे आरोपी मच्छिंद्र भांडेकर यांनी लाचेची मागणी केल्यासंदर्भातील कोणताही ठोस व सबळ पुरावा आलेला सून साक्षीदारांच्या जवाब अनेक महत्त्वपूर्ण विसंगती व त्रुटी असल्याचे, तसेच आरोपीस तक्रारदाराचे कोणतेही काम करून देण्याचे अधिकार नसल्याचे माहित असताना देखील केवळ कायदेशीर प्रक्रियेस बगल देऊन तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी तक्रारदाराने आरोपी भांडेकर यांना खोटेपणाने गुंतविण्यात आल्याचे आरोपीच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश राणे यांनी निर्दोष मुक्तता केलेली आहे. सदर प्रकरणात आरोपीच्यावतीने ॲड. निलेश जोशी, ॲड. शिल्पा कुलकर्णी, ॲड. ओंकार परदेशी, ॲड. राणी गाजूल व ॲड. मधुश्री देशपांडे यांनी काम पाहिले.

### गुड नाईट लिक्विडचे इंजेक्शन टोचून घेतल्याने तरुणीच्या हाताला सूज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे -**

गुड नाईटचे लिक्विड डोक्यात आणि हातात टोचून घेतल्याने तरुणी अस्वस्थ झाली असून तिच्या हाताला सूज आली आहे. हा प्रकार सम्राट चौकातील बुधवार पेठ येथे शुक्रवारी दुपारी दोनच्या सुमारास घडला. विशाखा संजय चव्हाण (वय २४) असे तरुणीचे नाव आहे.

विशाखा ही दुपारी तिच्या बुधवार पेठेतील घरात होती. त्यावेळी तिने अज्ञात कारणातून गुड नाईट लिक्विडचे इंजेक्शन स्वत : हातात आणि डोक्यात टोचून घेतले. यामुळे तिच्या डाव्या हाताला सूज आल्याने दुपारी ३.३० वाजता आई भाग्यश्री यांनी तिला शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले असून विशाखा शुध्दीवर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# कारकल येथील मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे -**



कारकल येथील ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा सालाबादप्रमाणे यंदाही शनिवार दिनांक ३ मे पासून सुरु झाली आहे. रविवार ४ मे रोजी विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत. ३ मे रोजी पहाटे सहा वाजेपासून ते सकाळी आठ वाजेपर्यंत कपीलसिद्ध श्री मल्लिकार्जुन, श्री भ्रमरांबिका देवी व श्री धानम्मा देवींच्या दिव्य मुर्तीची महारूद्राभिषेक संपन्न होणार आहे. माळकवठेचे मठाधिपती पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी यांची अड्डु पालखी व २०१ सुहासिनी जलकुंभासह भव्य मिरवणूक सोहळा पार पडला.

रविवार दिनांक ४ मे रोजी सकाळी नऊ वाजता नंदीध्वजासह श्री मल्लिकार्जुन श्री विरभद्रेश्वर पालखीसह पुरवंताचे मिरवणूक दुपारी बारा वाजता अग्निशमन कार्यक्रम हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. दुपारी चार वाजता कुस्ती व श्री मल्लिकार्जुन मंदिरासमोर नव्याने बांधण्यात आलेल्या भव्य सभामंडपाचे उद्घाटन होणार आहे. रात्री दहा वाजता श्री मल्लिकार्जुन नाट्य संघ कारकल यांचे सुंदर कौटुंबिक, सामाजिक 'तवरु मने कुंकुमा' अर्थात दैव संकल्प गैदवरु यारु सुंदर कन्नड नाटक होणार आहे. कार्यक्रमास भाविक भक्तांनी उपस्थित राहून श्री मल्लिकार्जुन यात्रा कमिटी समस्त ग्रामस्थ कारकल यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# दागिने चोरणाऱ्या आंतरजिल्हा गुन्हेगारांना अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मे-**



सोलापूर शहरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसका मारून चोरणाऱ्या दोघां आंतरजिल्हा गुन्हेगारांना शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. या गुन्हेगारांकडून १ लाख ८० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

हणमंत रामचंद्र बोडके (वय २२, रा. पाथरूड, जयवंत नगर, धाराशिव सध्या रा. आण्णाभाऊ साठे नगर, धाराशिव) आणि नागेश उर्फ नागनाथ दऱ्याप्पा पाटोळे (वय २३, रा. निरंकार कॉलनी, प्लॉट नं. ४७, संजय नगर, सांगली सध्या रा. सचिन लगदिव यांच्या घरी भाड्याने, गणेश नगर. धाराशिव) हे अटकेत आहेत. १५ एप्रिल रोजी रात्री आठच्या दरम्यान रेखा सिध्देश्वर बिजली (वय ३३, रा. मंत्री चंडक नगर) या त्यांच्या शेजारच्या महिलांसोबत रूपाभवानी मंदीर येथे देवदर्शन करून परत घराकडे जात असताना दिप हॉस्पीटलजवळ अनोळखी व्यक्तीने रेखा यांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण जबरदस्तीने हिसका मारून चोरून नेऊन नंबर प्लेट नसलेल्या दुचाकीवरून पळ काढला होता. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून तपास करण्यात येत होता. दीप हॉस्पीटलजवळील सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या चित्रीकरणाची तपासणी करून शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी २ मे रोजी चोरीचे दागिने विकण्यासाठी रूपाभवानी मार्गे सराफ बाजारात येणाऱ्या दोघां संशयितांना पाणी गिरणी गेटसमोरील रस्त्यावर पकडले. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर हणमंत बोडके व नागेश पाटोळे यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यांच्याकडून गुन्ह्यातील दुचाकी, सोन्याचे गंठण, मोबाईल असा १ लाख ८० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ.दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक शैलेश खेडकर, अमंलदार संदीप जावळे, विनोद रजपूत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, सतीश काटे, बाळासाहेब काळे, सायबर पोलिस ठाण्याकडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड यांनी केली.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत मडकीवस्तीतील एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

सोलापूर पुणे महामार्गावरील मडकी वस्तीत राहणा-या एकाचा अज्ञात वाहनाने धडक दिल्याने गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. हा अपघात शुक्रवारी रात्री ७.३० च्या सुमारास घडला.

मधुकर धोंडप्पा नागराशी (रा. गणेश नगर, मडकी वस्ती, सोलापूर) असे मृत पावलेल्याचे नाव आहे. शुक्रवारी रात्री७.४५ वाजता मधुकर बाळे येथून मडकी वस्ती येथील घराकडे जात होता. मडकी वस्तीजवळील वाहनाच्य शोरूमसमोरील रस्त्यावर पाठीमागून अज्ञात दुचाकीस्वाराने धडक दिली. यात डोक्याला आणि डोळ्याला मुकामार लागल्याने रात्री ९ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले असता, उपचारापूर्वी मधुकर मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# सोलापूर रेल्वे स्थानकावर ११५ कोटींचे प्रतीक्षालय

✔ सुविधा असणार उपलब्ध
✔ ४०० प्रवासी क्षमता



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे**

प्रवाशांच्या सेवेसाठी नेहमी तत्पर असणाऱ्या सोलापूर रेल्वे विभागाच्या वतीने मध्य रेल्वेच्या सोलापूर रेल्वे स्थानकात नवीन प्रतीक्षालय बांधण्यात येणार आहे. त्यासाठी जागा निश्चित केली आहे. पुढील दोन महिन्यात नवीन सुसज्ज प्रतीक्षालय सर्व प्रवाशांच्या सेवेत असेल असा विश्वास रेल्वे प्रशासनाच्यावतीने व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, अमृत भारत योजनेतून सोलापूर रेल्वे विभागास ११५ कोटी रुपये मिळाले. त्यातून रेल्वे स्टेशनचा कायापालट करण्यात आला.

रेल्वे स्टेशनवर वातानुकूलित प्रतीक्षालय सर्व सोयीसह करण्यात आले. रेल्वे स्टेशनवरील लांबी पाहता मैदानकडील बाजूस नवीन प्रतीक्षालय करण्यात येणार आहे. यासाठी रेल्वे प्रशासनाकडून तयारी करण्यात आली आहे. रेल्वे स्टेशनवर यापूर्वी वातानुकूलित आणि विना वातानुकूलित असे दोन कक्ष आहेत. नवीन प्रतीक्षालय दुसऱ्या बाजूस गरज असल्याने करण्यात येणार आहे.

**रेल्वेयात्री सुविधा केंद्राची तपासणी**

शहरात सहा यात्री सुविधा केंद्र आहेत. तेथून प्रवाशांना रेल्वे आरक्षण तिकीट काढून देण्यात येतात. शहरात सहा केंद्र असून, किती केंद्रावरुन किती तिकीट विक्री झाली. ते सुरू असतात का? यांची चौकशी करण्यासाठी केंद्राची तपासणी करण्यात येणार आहे.

**नवे प्रतीक्षालय सर्व सोयींनी युक्त**

नवीन प्रतीक्षालय करण्यात येत आहे. तेथे सुमारे ४०० प्रवासी बसतील. सरकता जीनासह प्रवाशांची गरज पाहून इतर सोयी करण्यात येणार आहे. दोन महिन्यात याचे काम पूर्ण होईल.

**- योगेश पाटील, विभागीय मुख्य वाणिज्य व्यवस्थापक सोलापूर रेल्वे विभाग**

**सुविधा काय असतील?**

सुमारे ४०० प्रवासी बसतील. तेथे कॅन्टीन, बसण्यासाठी खुर्ची, टिव्ही, मोबाईल चार्जर, गाड्याचे वेळापत्रक व प्लॅटफार्म संदेश देणारे फलक, प्रवाशांना सुचना ऐकता यावे यासाठी स्पिकर. पाण्याची व्यवस्था. गरज असेल तर सुरक्षा रक्षक तैनात असणार आहेत.

**रेल्वेगाडी आल्यानंतरची प्रवाशांची धावपळ थांबेल**

प्रवाशांना गाडी आल्यावर लांब चालू लागू नये. सरकता जीना जवळ असल्याने, प्लॅटफार्म बदलता येणे सोपे तसेच रेल्वेच्या नवीन गेटपासून जवळ असलेली जागा निवडण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांची धावपळ थांबेल.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : दैनिक तरुण भारतचे मुख्य समूह संपादक दिलीप पेठे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना ॲड. बसवराज सलगर, ॲड. शांतिवीर महिंद्रकर, ॲड. लोंढे-पाटील, ॲड. विजय देशपांडे, ॲड. सुजय सापटणेकर, प्रकाश जाधव, दैनिक तरुण भारतचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीनिवास बिनगुंडी.



## ▶▶ महत्वाचे...

### तरूणीशी बोलण्यावरून चौघांकडून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ३ मे-**

तरुणीशी बोलण्यावरुन अनोळखी चौघांनी जबरदस्तीने तरुणाला दुचाकीवर बसवून पाच्छा पेठेत नेऊन मारहाण केली. तसेच डिक्कीतील ५० हजारांची रोकड लुटून नेली. गुरुवारी (ता. १) सायंकाळी ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. यात्प्रकरणी त्या चौघांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी संकेत संतोष परदेशी (वय २६, रा. दक्षिण कसबा, चौपाड, सोलापूर) हा त्याच्या मैत्रिणीस भेटायला सात रस्ता परिसरातील पिझ्झा हटमध्ये गेला होता. तेथून दोघेही बाहेर पडताना अनोळखी चौघांनी तिच्याशी का बोलतो, अशी विचारणा करीत लाथाबुक्क्यांनी त्याला मारहाण केली. तेव्हा संकेत हा त्याचा मित्र मनोजकुमार याला फोन करुन याबाबत सांगत असताना त्यांनी त्याचा मोबाईल हिसकावून घेतला. तसेच गाडीची चावीही घेऊन त्याला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून पाच्छा पेठेतील इक्बाल फॅशनच्या पुढील गल्लीतील मदरशाजवळ नेले. तेथे त्याला मारहाण केली. त्यानंतर त्याने डिक्की उघडून पाहिले असता त्यातील ५० हजारांची रोकड गायब होती. यात्प्रकरणी सहाय्यक पोलिस निरीक्षक सारिका जगताप तपास करीत आहेत.

### पद्मशाली चौकातून दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. ३ मे-**

पद्मशाली चौकातून १५ हजारांची दुचाकी चोरट्याने चोरुन नेली. ३० एप्रिल रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास ही घटना घडली. यात्प्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी आबिद अब्दुलगनी शेख (वय ३५, रा. मित्रनगर, शेळगी, सोलापूर) यांनी पद्मशाली चौकातील पार्किंगमध्ये दुचाकी (क्र. एम एच १३ बी के ०७५९) लावली होती. ती चोरट्याने चोरुन नेली. हवालदार गंगावणे पुढील तपास करीत आहेत.

### रेल्वेस्थानकावरुन ३५ हजारांच्या दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. ३ मे-**

रेल्वेस्थानकावरील एटीएमसमोर लावलेली ३५ हजारांची दुचाकी चोरट्याने चोरुन नेली. २४ एप्रिल रोजी सकाळी साडेसहा वाजता ही घटना उघडकीस आली. यात्प्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी अल्लाउद्दीन खबुला हुसेन शेख (वय ३८, रा. साहेबलाल वस्ती, कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर) यांनी पहाटे साडेपाचच्या सुमारास रेल्वेस्थानकावरील एटीएमसमोर दुचाकी (क्र. एम एच १३ सी एक्स ०९४४) लावली होती. ते तासाभरानंतर आले असता दुचाकी तेथे नव्हती. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

### विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३ मे-**

विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह चौघांविरुद्ध विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पती सुरेश सलगर, नणंद सोनाली, पतीचा मामा दत्तात्रय वाघमोडे (रा. कोळेगाव, ता. मोहोळ), दीर दादाराव (रा. धायटी, ता. सांगोला) यांचा गुन्हा दाखल झालेल्यांत समावेश आहे. यातील फिर्यादी लक्ष्मी सुरेश सलगर (सध्या रा. निर्मिती विहार, आदित्य नगर, सोलापूर) हिचा सुरेश सलगर याच्याशी विवाह झाला. त्यानंतर २१ जानेवारी २०२२ रोजी ती नांदण्यास सासरी गेली. संशयितांनी संगनमताने तिचा शारिरीक व मानसिक छळ केला.

### अंघोळ करताना विद्युत धक्का लागून महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. ३ मे-**

घरातील बाथरूममध्ये अंघोळ करताना विजेचा धक्का लागून महिलेचा मृत्यू झाला. हा प्रकार शुक्रवारी दुपारी २.३० च्या सुमारास घडला. रेणुका जगन्नाथ कणकी (वय ४२, रा. मराठा वस्ती, भवानी पेठ) असे महिलेचे नाव आहे. रेणुया हल्ली एनजीमिल चाळ येथे राहण्यास आहेत. शुक्रवारी दुपारी २.३० च्या सुमारास त्या तेथील घरात बाथरुममध्ये अंघोळ करत होत्या. त्यावेळी त्यांना अचानक विजेचा धकका लागला. यात त्या बेशुध्द झाल्याने त्यांना दुपारी चारच्या सुमारास स्नेहल कोकरे यांनी उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वी त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# आता जिल्ह्यात ‘एआय’द्वारे उत्तरपत्रिका तपासणी

## जिल्हा परिषदेच्या १२ शाळांमध्ये प्रयोग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**



ग्लोबल टीचर पुरस्कार विजेते शिक्षक रणजितसिंह डिसले यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुलांच्या प्रश्नपत्रिका तपासण्यासाठी ‘हॅक द क्लासरूम ’ नावाचे एआय मॉडल गुगल जेमिनीच्या मदतीने तयार केले आहे. हे मॉडल मराठी भाषेतून प्रश्नपत्रिका तयार करणे आणि त्यांची तपासणी करण्याच्या हेतूने निर्माण करण्यात आले आहे. हार्वर्ड विद्यापीठातील इनोव्हेशन लॅबचे याकरिता विशेष सहकार्य मिळाले असून दिनांक २५ ते ३० एप्रिल या कालावधीत या एआय मॉडल ची प्राथमिक चाचणी करण्यात आली. सोलापूर जिल्ह्यातील १२ जिल्हा परिषद शाळांमधील २२५ विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षेच्या उत्तरपत्रिका एआयच्या मदतीने तपासून अंतिम निकाल लावण्याचा संशोधन प्रकल्प नुकताच पूर्ण केला. या प्रयोगात २२५ विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका संबंधित वर्गाचे शिक्षक व एआय अशा दोन्ही पद्धतीने तपासण्यात आल्या. एआयच्या माध्यमातून तपासण्यात आलेल्या उत्तरपत्रिका मधून १२ टक्के मुलांच्या गुणात बदल झाल्याचे दिसून आले. हे बदल संबंधित शिक्षकांच्या तपासणीत अचूक असल्याचे दिसून आले. मुलांच्या उत्तरपत्रिका तपासत असतानाच २ टक्के प्रश्न चुकीचे असल्याचे एआयमुळे लक्षात आले असल्याचे निरीक्षण यादरम्यान नोंदवण्यात आले. उत्तरपत्रिका तपासल्यानंतर प्राप्त गुणाच्या आधारे संबंधित विद्यार्थ्यांना कौशल्य वृद्धी करिता ६ आठवड्यांचा लर्निंग प्लॅन देखील या एआय मॉडेल ने दिला असून याची अंमलबजावणी १ मे ते १० जून या कालावधीत करण्यात येणार आहे.

> या वर्षी उत्तरपत्रिका तपासणे आणि अंतिम निकाल तयार करणे याकरिता शिक्षकांकडे पुरेसा वेळ नव्हता. त्यामुळे एआय चा वापर करून उत्तरपत्रिका तपासण्याचा प्रयोग करण्यात आला. छोट्या गटावर करण्यात आलेल्या या प्रयोगाचे निकाल उत्साहवर्धक आहेत. यामुळे हे एआय मॉडल अधिक सक्षम बनवण्यासाठी मदत होईल असा विश्वास रणजितसिंह डिसले यांनी व्यक्त केला.

> २० गुणाची एक उत्तरपत्रिका तपासण्यासाठी शिक्षकांना सरासरी १ मिनिट ४२ सेकंद तर ५० गुणांची उत्तरपत्रिका तपासण्यासाठी ५ मिनिटे २७ सेकंद इतका वेळ शिक्षकांना लागला, मात्र एआय ने हेच काम ३२ सेकंदात पूर्ण केले. एआयने तपासलेल्या उत्तरपत्रिकांची अचूकता ९५% इतकी नोंदवण्यात आली. ५% विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर ओळखण्यात या एआय मॉडलला अपयश आले.

# शहरातील बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाईचा बडगा

## प्रवासी घेण्यासाठी चढाओढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे-**

सोलापूर बसस्थानक परिसरात बेशिस्तपणे रिक्षा चालवणाऱ्या रिक्षा चालकांवर वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे. एसटी स्टँड परिसरात रिक्षा चालक नेहमी घोळक्याने रस्त्याच्या मधोमध रिक्षा उभी करतात. त्यामुळे बस स्थानकातून बाहेर पडणाऱ्या एसटी बसेस तसेच इतर वाहनांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. वास्तविक पाहता रिक्षाचालकांनी वाहतुकीचे नियम पाळून व्यवसाय करणे गरजेचे असताना तसे होताना दिसत नाही. काही रिक्षाचालक नियम पाळून व्यवसाय करतात, तर काही रिक्षाचालक वाहतुकीचे नियम पायदळी तुडवत मनमानी कारभार करताना दिसतात.

दरम्यान, सोलापूर बसस्थानक परिसरात असे चित्र नेहमीच दिसून येते. बसस्थानकातून बाहेर पडणाऱ्या प्रवाशांना घेण्यासाठी रिक्षा रस्त्यांच्या मध्येच उभी करतात. त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या वाहनांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. असे प्रकार वारंवार घडत असल्याने, शनिवारी सकाळी कर्तव्यावर असणाऱ्या वास्तुशाखेच्या पोलिसांनी तात्काळ संबंधित मुजोर रिक्षाचालकांवर कारवाई करण्याचे सूत्र सुरू केले. त्यामुळे हा परिसर मोकळा श्वास घेत असल्याचे दिसून आले. परंतु ही कारवाई दररोज सुरू ठेवल्यानंतरच मुजोर व बेशिस्त रिक्षाचालकांवर चाप बसणार आहे.

दरम्यान, वाहतूक शाखेच्या पोलिसांनी केलेल्या या दंडात्मक कारवाईमुळे उर्वरित रिक्षाचालकांनी तत्काळ हा परिसर रिकामा केला. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते एसटी स्टँड परिसर संपूर्णपणे मोकळा झाला होता. वास्तविक पाहता स्टॅन्ड परिसरातील रस्त्यांवर प्रवाशांची मोठी वर्दळ असते. परगावाहून आलेल्या प्रवाशांना आपल्या इच्छित स्थळी नेऊन सोडण्यासाठी रिक्षाचालकांची दररोज मनमानी दिसून येते.



**स्टॅन्ड परिसरात घोळका करून उभारणाऱ्या रिक्षा चालकांवर वाहतूक शाखेचे पोलिस कारवाई करताना टिपलेले छायाचित्र.**

> **अनधिकृत रिक्षा चालकांवर कारवाई करावी**
>
> सोलापूर शहरात अधिकृत तसेच अनधिकृत रिक्षांचे पेव फुटले आहे. प्रत्येक रस्त्यांवर विशिष्ट रिक्षा वाहतूक दिसून येते. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन रिक्षा चालवणे, गणवेश व बॅच बिल्ला नसणे, रस्त्याच्या मधोमध रिक्षा उभारणे, अशा विविध घटना दररोज शहरातील विविध रस्त्यांवर घडतात. मात्र याकडे पोलीस प्रशासनाचे आणि आरटीओचे दुर्लक्ष होताना दिसते. वास्तविक पाहता अनधिकृत रिक्षाचालकांवर कारवाई करणे बंधनकारक आहे. शहरात १५ हजाराहून अधिक अनाधिकृत रिक्षा रस्त्यावर धावतात. अशा अनधिकृत रिक्षाचालकांवर कोणतीही कारवाई केली जात नाही. त्यामुळे शहरात बेशिस्त व मुजोर रिक्षाचालकांची संख्या वाढत आहे. अशा रिक्षाचालकांवर आळा घालून अपघाताचा धोका टाळणे आवश्यक बनले आहे.
>
> **- योगेश जम्मा, वाहनधारक**

> **एसटी स्टँड परिसरात पोलिसांची कारवाई सातत्याने व्हावी**
>
> सोलापूर एसटी स्टँड परिसरात नेहमीच वाहतूक कोंडी होते. रस्त्यांवर विविध वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. रिक्षा मोठ्या प्रमाणात रस्त्यांवर धावतात. परंतु वाहतुकीचे नियम पाळत नाहीत. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सर्रासपणे विरुद्ध दिशेने रिक्षा चालवतात. प्रवासी घेण्यासाठी नेहमीच धडपड केली जाते. अशावेळी अपघाताचा धोका बळावतो. त्यामुळे येथे पोलिसांच्या कारवाईमध्ये सातत्य असणे गरजेचे आहे.
>
> **- सचिन साळुंखे, व्यापारी**

## श्री भगवंत महोत्सवानिमित्त आज सूर सरगम कार्यक्रम

**बार्शी, दि. ३ मे-**

येथील श्री भगवंत महोत्सवानिमित्त रविवार, दि. ४ मे रोजी संध्याकाळी ७ वाजता सूर सरगम हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमामध्ये सिनेअभिनेत्री वर्षा उसगांवकर, पार्श्वगायिका सपना अवस्थी, पार्श्वगायिका बेला सुलाखे, महाराष्ट्राचे महागायक पुरस्कार विजेते मोहम्मद अयाज यांचा सूर सरगम हिंदी मराठी गीतांचा संगीत कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी मोफत आहे.

## फवारणीचे औषध प्राशन केलेल्या तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ३ मे-**

मोहोळ तालुक्यातील कोळेगाव येथे फवारणीचे औषध प्राशन केल्याने तरुणाचा मृत्यू झाला. २८ एप्रिल रोजी तरुणाने शेतात फवारणीचे औषध प्राशन केले होते. बालाजी भोई (वय ३०, रा. कोळेगाव ता मोहोळ) असे तरुणाचे नाव आहे. बालाजी हा त्यांच्या शेतातील पिकाला पाणी देण्याचे काम करत होता. त्यावेळी तेथे अज्ञात कारणातून त्याने पिकावर फवारणीचे औषध प्राशन केले. खासगी रुग्णालयात उपचार करून १ मे रोजी भाऊजी अशोक भोई याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी तो बेशुध्द होता. दरम्यान शनिवारी मध्यरात्री २.२० च्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## राजस्थानातील १६ वर्षाच्या मुलाची सोलापुरात आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे -**

राजस्थानातील जोधपूर जिल्ह्यातील अगुलाई गावातील रहिवाशी असलेल्या १६ वर्षाच्या मुलाने शुक्रवारी दुपारी २.३९ वाजता सोलापुरातील एकता नगर परिसरातील घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

शंकरलाल धनाराम देवासी (वय १६ ) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. शंकरलाल हा अलीकडील काही काळापासून सोलापुरात राहण्यास होता. शुक्रवार दुपारी २.३९ च्या सुमारास त्याने एकता नगर येथील घरात दोरीने छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेतला. बेशुध्द अवस्थेत हवालदार शेख यांनी त्यास दुपारी ३.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले, परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# तासिका तत्त्वावरील शिक्षकांच्या मानधनात दुप्पट वाढ

## शिक्षकांना दिलासा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

अनेक वर्षे तुंटपुज्या मानधनावर काम करणाऱ्या हजारो भावी शिक्षकांना तासिका प्रमाणे मानधनात वाढ करून त्यांची आर्थिक कोंडी सोडवण्याचे काम शासनाने केले आहे. राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील तासिका तत्त्वावरील शिक्षकांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने बुधवारी ३० एप्रिल रोजी घेतला.

त्यानुसार आता प्रतितास २५० ते ३०० रुपये मानधन मिळणार आहे. यामुळे त्या शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातून एखाद्या विषयासाठी अर्धवेळ शिक्षकांसाठी आवश्यक असलेला कार्यभार उपलब्ध होत नसल्यास त्याठिकाणी तासिका तत्त्वावर शिक्षक नेमला जातो. त्यांना घड्याळी तासिकेनुसार मानधन दिले जाते. सध्या ते मानधन उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना प्रतितास १५० रुपये तर माध्यमिक शाळांवरील ‘सीएचबी’ तासिक तत्त्वावरील शिक्षकास १२० रुपये मानधन दिले जात होते. अनेक वर्षांपासून तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या ‘सीएचबी’ शिक्षकांचे मानधन आता वाढविण्यात आले आहे. पटसंख्या कमी झाल्याने तासिका तत्त्वावरील शिक्षकांची संख्या मोठी आहे. त्यांनी मानधन वाढीची मागणी करूनही मानधन वाढले नव्हते. या पार्श्वभूमीवर ३० एप्रिल रोजी शालेय शिक्षण विभागाने त्या शिक्षकांसाठी महत्वाचा निर्णय घेतला आहे. पटसंख्या कमी झाल्याने तासिका तत्त्वावरील शिक्षकांची संख्या मोठी आहे.

> सर्व माध्यमाच्या शाळांमध्ये अनेक वर्षांपासून तासिका तत्त्वावर अध्यापन करणार्या शिक्षकांना दिलासा मिळाला आहे. परंतु शासनाने कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती करून त्यांची आर्थिक कोंडी सोडवावी.राज्यात हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त असताना पदे भरली गेली पाहिजे. त्यामुळे त्यांना रोजगार उपलब्ध होऊ शकते. तासिका तत्त्वावरील शिक्षकांना आजच्या महागाईचा विचार करून त्यांच्या मानधनात वाढ करण्यात यावे.
>
> **- प्रशांत शिरगुर, राज्य उपाध्यक्ष,**
> **डी. एड बी.एड स्टुडन्ट असो./ पवित्र पोर्टल शिक्षक संघटना**

**शासनच्या नवीन धोरणानुसार**

- जुने माध्यमिक शाळेत घड्याळी तासिका मानधन-१२०
- नविन धोरणानुसार सुधारित मानधन-२५०
- जुने उच्च माध्यमिक घड्याळी तासिका मानधन-१५०

# सोलापुरातील उद्योजकांचा मंगळवारपासून दुबई दौरा

## आ. सुभाष देशमुखांच्या प्रयत्नामुळे व्यापाऱ्यांना संधी; जागतिक बाजारपेठेत स्थान मिळवण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

सोलापुरात तयार होणारे दर्जेदार युनिफॉर्म, टॉवेल, नावीन्यपूर्ण बॅग, विविध पदार्थांची लज्जत वाढवणारे स्वादिष्ट मसाले व अन्य पदार्थांना जागतिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी सोलापूर सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून आ. सुभाष देशमुख प्रयत्नशील आहेत. त्याअंतर्गतच संबंधित वस्तू उत्पादकांच्या १८ उद्योजकांसह स्वतः आ. देशमुख हे मंगळवार, दि. ६ ते रविवार, दि. ११ मे या दरम्यान दुबई दौरा करत आहेत.

याविषयी आ. देशमुख म्हणाले, दुबईच्या दौऱ्यात तेथील प्रगती पाहून मी थक्क झालो. वाळवंटी भागात स्वतःचे असे काही विशेष उत्पादन, खासियत नाही. तरीही तेथील मार्केट जागतिक दर्जाचे बनले आहे. अशा जागतिक मार्केटमध्ये अस्सल सोलापुरी, नावीन्यपूर्ण, दर्जेदार उत्पादने विक्रीस उपलब्ध केली तर स्थानिक उद्योजकांना मोठ्याप्रमाणावर अर्थप्राप्ती होईल. कामगारांनाही फायदा होईल, असा विचार मनामध्ये आला तो विचार मी सोलापूर सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून स्थानिक उद्योजकांसमोर व्यक्त केला. त्यामध्ये युनिफॉर्म तयार करणारे सहा उद्योजक, बॅग उत्पादक एक, टॉवेल उत्पादक तीन, अन्नधान्य व मसाले उत्पादक तीन यासह विविध उत्पादनांच्या निर्मात्यांनी सोलापूर सोशल फाउंडेशनच्या या कल्पनेस सकारात्मक प्रतिसाद दिला. या सर्वांचे मिळून सोलापूरच्या उत्पादकांचे दुबईसाठी म्हणून व्यापार मंडळ आम्ही निर्माण केले. त्यातूनच मंगळवार ता. ६ एप्रिलपासून या सर्व उद्योजकांसह मी स्वतः दुबई दौरा करत आहे. सोलापुरात तयार झालेल्या उत्पादनांना जागतिक बाजार पेठेत स्थान मिळवून देण्यासाठी, तेथून परदेशी चलन मिळवण्यासाठी, त्यातून सोलापुरातील उद्योजक, कामगारांच्या जीवनात अर्थक्रांती घडवून आणण्यासाठी आम्ही सारे प्रयत्नशील आहोत.

**दुबई दौऱ्याचा तपशील**

- दुबईमधील मोठे शोरूम्स आणि वितरकांसोबत बैठका घेणे
- तेथील विविध उत्पादनांच्या कारखान्यांचा अभ्यासदौरा करणे
- दुबईतील भारतीय वाणिज्य दूतावासातील उच्च अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी
- दुबईचे मसाला किंग धनंजय दातार यांच्यासोबत विशेष बैठक

**दुबई दौऱ्याची उद्दीष्टे**

अस्सल सोलापुरी मालास दुबईच्या जगविख्यात मार्केटमध्ये निर्यातीच्या संधी शोधणे, दुबईमधील व्यावसायिकांची सोलापूरच्या उद्योगांमध्ये भागीदारी मिळवणे, जागतिक बाजारात खरेदी-विक्रीस कोणत्या प्रकारचा माल लागतो हे समजून घेणे, सोलापूर-दुबई बिझनेस फोरम तयार करणे, दुबई भेटीनंतर स्थापन होणारे सोलापूर-दुबई बिझनेस फोरम संस्थात्मक रूपात पुढे नेणे, आणि स्टार्टअप्स, ग्रामीण उद्योजक यांना दीर्घकालीन लाभ पोहोचवणे, राजकीय इच्छाशक्ती, सोलापुरातील उद्योजकांची ऊर्जा, संस्था-समन्वयाचा संगम यातून सोलापूरला जागतिक निर्यातदार महानगर करण्याचा सोलापूर सोशल फाउंडेशनाचा उद्देश.

**सोलापूर विद्यापीठाची मदत**

सोलापूर सोशल फाउंडेशनमार्फत सुरू असलेल्या या उपक्रमास व सोलापूर विद्यापीठाशी संलग्न असलेले ‘पीएएचएसयूआय’ फाउंडेशन मुख्य मार्गदर्शकाच्या भूमिकेत आहे. याअंतर्गत सोलापूरची दुबईतील व्यापार-उद्योजकीय भूमिका स्पष्ट करणे, दुबई आणि सोलापुरातील उद्योजक-व्यापाऱ्यांत समन्वय राखणे यासह विविध कामात सोलापुरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे सोलापूर सोशल फाउंडेशनच्या या उपक्रमात मोलाची भूमिका बजावत असल्याचे आ. देशमुख यांनी सांगितले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११०५

**पुज्यता डोळां न देखावी । स्वकीर्ती कानीं नायकावी ।**
**हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोकां ।।**

ज्ञानी व्यक्तिला अंत:करणात जेव्हा ज्ञान प्राप्त होते, तेव्हा त्या ज्ञानाची लक्षणे देहावर उतरल्याचे दिसून येते. ज्ञानी व्यक्तिच्या सद्वर्तनावरुन व्यक्ती ज्ञानी असल्याचे समजते. ज्ञानी व्यक्तिची लक्षणे भगवंत सांगत आहेत. कोणत्याही आणि कसल्याही लौकिक विषयात त्याला रंगून जाणे आवडत नाही. लोकांमध्ये संभवितपणाचा डौल दाखविणे त्याला संकोचासारखे अर्थात ओझे झाल्यासारखे वाटत असते. ज्ञानी व्यक्तींच्या ठिकाणी असलेल्या सदगुणांची कोणी स्तुतिसुमने उधळली किंवा त्याच्या मोठेपणाचा, बहुमानाचा गाजावाजा झाला किंवा मोठया, चांगल्या योग्यतेची उपाधी त्याच्या अंगाला लावली तर मनात संकोचाने ज्ञानी भक्त ओशाळला जातो. तो अशा मोठेपणाने व्याकुळ होतो. त्याला अशा गाजावाजाचे, मोठेपणाचे प्रचंड दु:ख होते. पारध्याने हरिणाला जाळयात पकडल्यानंतर हरिणाची किंवा आपल्या बाहूसामर्थ्याने नदी तरुन जाताना बोहऱ्यात सापडलेल्या माणसाची जशी स्थिती होते. तशी या ज्ञानी व्यक्तिला लोकमान्यता म्हणजे एक संकटच वाटते. लौकिकतेला तो आपल्या अंगाला स्पर्श करु देत नाही. लौकिकतेबद्दल, बहूमानाबद्दल त्याची भावना काय असते हे सांगताना भगवंत म्हणाले, पुज्यता डोळां न देखावी श्र स्वकीर्ती कानीं नायकावी श्र अमुका ऐसी नोहावी श्र सेचि लोकां श्रश्र अर्थात, ज्ञानी व्यक्तिला आपला बहूमान आपल्या डोळयांनी पाहवत नाही. आपला लौकिक आपल्या कानांनी ऐकू नये, आपण एक विशिष्ट व्यक्ती आहोत अशी लोकांना जाण होऊ नये, असे त्याला वाटत असते. ज्ञानी व्यक्ति विद्वान असला तरी तो आपली विद्वता दाखवित फिरत नाही. समाजात आपली पूजा व्हावी असे त्याला वाटत नाही. कोणी त्याला वंदन केले तर त्याला मरणासारखे दु:ख होते. स्वत:च्या अंगी नम्रता ठेवणे, कमीपणा हेच भुषण मानणे, अशी त्याची वृत्ती असते. त्याचे चालणे, वागणे कोणालाही हनीकारक नसते. ज्ञानी व्यक्तिला वृक्ष मित्रत्व आवडत असते तसेच त्याला एकांत जास्त आवडतो, असेही भगवंत म्हणाले. ज्ञानी व्यक्तिची अनेक महत्वपूर्ण लक्षणे आपण माऊलीकडून स्पष्टीकरणासह ऐकली आहेत. या लक्षणापैकी आपल्यात काही लक्षणे आहेत का ? याची चाचपणी आपणच करुन घ्यायला हवी. आमच्यात ही लक्षणे येणे अंत्यत आवश्यक आहे. आज स्वत:चा मोठेपणा, गाजावाजा व्हावा म्हणून धडपडणाऱ्यांची संख्या जास्त आहे. मोठेपणा हा मागावा लागत नाही, तो आपल्या वर्तनातून आपोआप निर्माण होत असतो. पण वर्तनापेक्षा दिखावूपणातूनच मोठेपण मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची संख्या जास्त झाली आहे. या जास्त संख्येत आपला क्रमांक येणार नाही याची दक्षता आपण घ्यायलाच हवी. आपण मोठेपणाच्या मागे न लागता मोठेपणाच आपल्या मागे लागेल असे आपले वर्तन ठेवण्याचा आपण प्रयत्न करु या.



ज्ञानेश्वर महाराज

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस, बुंदेलखंडचे महाराजा छत्रसाल बुंदेला यांचा जन्मदिन |
| दि. ४ मे २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४७ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - विश्वावसू | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - वैशाख | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| शु. सप्तमी (०७.१८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - पुष्य (१२.५२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - गंड (२४.४०) | |
| करण - विष्टि (१९.२०) | |

### राशीभविष्य

**मेष :** व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही.

**वृषभ :** नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. आत्म विश्वासाने संकटाला सामोरे गेल्याने जीवनातील संकट टळेल.

**मिथुन :** जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क :** आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह :** संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**कन्या :** लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. जिवनात यश मिळेल. आज आनंदी दिवस जाईल.

**तुळ :** राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक :** उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील.आर्थिक आवक वाढेल.

**धनु :** प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. मुलांना आनंद मिळेल. खर्चाचे योग आहेत.

**कुंभ :** सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन :** कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. जीवनात नवीन संधी मिळाल्याने यश प्राप्त होईल.

# वाढत्या उन्हामुळे जारची मागणी वाढली

✔ आठ दिवसांतून एकदा होणाऱ्या पाणीपुरवठ्याचा दिसतोय परिणाम





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे-**

सोलापूर शहरात दिवसेंदिवस तापमानाचा तडाखा वाढत आहे. गुरुवारी नोंदवलेले शहराचे तापमान सर्वाधिक ४४.१ अंश सेल्सिअस इतके राहिले. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठा नियोजनावर देखील मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला दिसत आहे. आठ आठ दिवसानंतर देखील पाणी वेळेवर आणि योग्य दाबाने येत नसल्याने, नागरिक अक्षरशः मेटाकुटीला आला आहे. नागरिकांनी नाईलाजाने थंडगार पाण्याचा जार खरेदीकडे आपला मोर्चा वळवलेला दिसत आहे.



दरम्यान, शहरातील विविध आर. ओ. फिल्टर वॉटर प्लांट येथे नागरिक स्वतः आपले झार घेऊन वीस रुपये प्रति झार याप्रमाणे थंडगार पाणी खरेदी करत आहेत. शहराच्या विविध भागात हे चित्र आता दिसत आहे. सोलापूरकर स्वत:चे झार खरेदी करून वॉटर प्लांट येथे पाणी विकत घेत आहेत. अशी गंभीर स्वरूपाची परिस्थिती शहरवासीयांवर ओढवली आहे.

महापालिकेच्या वतीने करण्यात येणारा पाणीपुरवठा विस्कळीत तसेच दूषित असल्याने नागरिक हतबल झाले आहेत. अशातच शहराच्या काही भागात दूषित पाणी येत असल्याने सर्वत्र रोगराईचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वत:हून झार खरेदी करत, पाण्यासाठी आर.ओ. फिल्टर वॉटर प्लांट गाठलेले चित्र दिसत आहे.

> **...म्हणून जारचा वापर वाढला**
> महापालिकेच्या वतीने करण्यात येणारा पाणीपुरवठा हा वारंवार विस्कळीत होत आहे. पाण्याचा टप्पा वाढत असल्याने पाणी साठवणे अवघड जात आहे. वापरण्यासाठी बाहेरून पाणी मागवले जाते. तर पिण्यासाठी जारच्या माध्यमातून पाणी आणावे लागत आहे. वाढते ऊन लक्षात घेता पाण्याचा वापर वाढलेला आहे. पिण्यासाठी चांगले आणि थंड पाणी घेण्यासाठी वॉटर फिल्टर प्लांट येथे पाणी खरेदी करत आहे.
> **- संतोष काळे, नागरिक**



# शहरातील हातपंप व इलेक्ट्रिकल पपं दुरुस्त करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे-**

शहरामध्ये तीव्र प्रमाणात पाणी टंचाई असून पाणी पुरवठा पाच दिवसांआड व कमी दाबाने होत आहे. याच पार्श्वभूमीवर शहरातील हातपंप व इलेक्ट्रिक पपं हे बंद अवस्थेत आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना आपण संपर्क केला असता ते दुरुस्त करण्यासाठी अनास्था दिसून येत आहे. या संदर्भात आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांना माजी नगरसेवक विनोद धर्मा भोसले यांनी निवेदन दिले आहे.

आयुक्तांनी तात्काळ लक्ष द्यावे अन्यथा आंदोलनाचा इशारा नगरसेवक विनोद भोसले यांनी दिला आहे. यावेळी राज सलगर, सागर उबाळे, सुभाष वाघमारे, श्रीकांत गायकवाड, नितीन जमदाडे आदी उपस्थित होते.

# प्रवाशांची वाढती गर्दी; रेल्वेच्या विशेष गाड्यांना मुदतवाढ

✔ २४ जूनपर्यंत धावणार साप्ताहिक विशेष गाड्या; रेल्वे प्रशासनाचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ मे-**

प्रवाशांचा प्रवास सुखकर व जलद होण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. दरम्यान, गर्दी कमी करण्यासाठी रेल्वेने आता विशेष गाड्यांचा वेळ, कालावधी वाढविण्याचा निर्णय घेतला असून, सोलापूर रेल्वे विभागातून धावत असलेल्या आठ गाड्यांचा कालावधी वाढविण्यात आल्याचे सांगण्यात आले.



दरम्यान, सोलापूर ते लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाडी पूर्वी २९ एप्रिल २०२५ पर्यंत धावणार होती, मात्र ती गाडी आता २४ जून २०२५ -पर्यंत धावणार आहे. यागाड्यांच्या ८ फेऱ्या होणार आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनस ते सोलापूर साप्ताहिक विशेष गाडी पूर्वी ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याचा निर्णय घेतला होता, ती आता २५ जून २०२५ पर्यंत धावणार आहे. सोलापूर ते दौंड जंक्शन अनारक्षित दैनिक विशेष गाडी पूर्वी ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्यात येणार होती, आता ती ३० जून २०२५ पर्यंत धावणार असून या गाडीच्या ६१ फेऱ्या होणार आहेत. दौंड जंक्शन ते सोलापूर अनारक्षित दैनिक विशेष, पूर्वी ३० एप्रिल २०२५ पर्यंत चालविण्याची सूचना देण्यात आली होती आणि ती ३० जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे. पुणे ते छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (कोल्हापूर), पूर्वी ३० एप्रिल २०२५ पर्यंत धावणार होती. आता ती गाडी ३० जूनपर्यंत धावणार आहे. बडनेरा जंक्शन ते नाशिक रोड अनारक्षित दैनिक विशेष, नाशिक रोड ते बडनेरा जंक्शन अनारक्षित दैनिक पुणे ते हरंगुल, हरंगुल ते पुणे जंक्शन ते सनवाड अनारक्षित गाडी, सनवाड ते खंडवा अनारक्षित गाडी आता जूनअखेरपर्यंत धावणार आहेत.

> **● 'या' रेल्वे गाड्या धावणार ३० जून पर्यंत**
> सोलापूर ते कलबुर्गी जंक्शन दैनिक विशेष, पूर्वी ३० एप्रिल २० पर्यंत चालवण्यात येणार होती. आता ती गाडी ३० जून २०२५ पर्यंत असून, या गाडीच्या ६१ फेऱ्या आहेत. कलबुर्गी जंक्शन ते सोलापूर अनारक्षित दैनिक विशेष यापूर्वी ३० एप्रिल २०२५ पर्यंत धावण्याची सूचना आली होती, आता याही गाडीला जूनअखेरपर्यंत मुदत वाढविली आहे. छत्रपती शाहू महाराज टर्मिनस (कोल्हापूर) पुणे पूर्वी ३० एप्रिल पर्यंत धावणार होती, आता ती ३० जूनपर्यंत धावणार आहे. यागाडीच्या ६१ फेऱ्या होणार आहेत.
>
> **●रेल्वेच्या वेळेत आणि थांब्यात नाही बदल**
> रेल्वे प्रशासनाने गाड्यांच्या कालावधी वाढविला आहे, मात्र रेल्वेच्या वेळेत आणि थांब्यात कोणताही बदल करण्यात आला नसल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले. विस्तारित फेऱ्यांसाठी विशेष शुल्क सर्व संगणकीकृत केंद्रांवर उपलब्ध असण असल्याचे सांगण्यात आले.

# घरगुती कारणातून दोन कुटुंबात हाणामारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे -**

घरगुती कारणाच्या वादातून न्यू बुधवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ दोन कुटुंबात झालेल्या हाणामारीत चार जण जखमी झाले. हा प्रकार शुक्रवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडला.

दिलीप सोमनाथ सोनवणे (वय ३८, रा. न्यू बुधवार पेठ) व नालंदा दिलीप सोनवणे (वय ४०, रा. डोणगाव रोड, सोलापूर) अशी एका कुटुंबातील लोकांची नावे आहेत. तर प्रतिक लक्ष्मण कांबळे (वय २७) व सौरभ अमोगसिध्द कांबळे (वय २६, रा. रमाबाई आंबेडकर नगर) दुस-या कुटुंबातील सदस्यांची नावे आहेत. शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास न्यू बुधवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात सोनवणे व कांबळे कुटुंबात घरगुती कारणावरून तक्रार झाली. या वादाच्या रुपातंर भांडणात झाले असून दिलीप व नालंदा सोनवणे यांना सौरभ कांबळेसह इतर सात जणांनी फरशी तसेच लाथबुकयांनी मारहाण केली. दिलीपच्या डोक्याला तसेच सर्वांगास व नालंदा याना सर्वांगास मुकामार लागलयने ते रात्री ८.२० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

दरम्यान, सौरभ व प्रतिक कांबळे या दोघांना दिलीप सोनवणेसह इतर सहा जणांनी तलवार व लाकडाने मारहाण करून जखमी केले. यात प्रतिकच्या डोक्याला जखम झाली तर सौरभच्या कपाळावर जखम झाल्याने ते स्वत: रात्री ८ च्या सुमारास स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# प्रा. ढोबळे यांचा आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

महाराष्ट्र सरकार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन संस्था. पुणे (बार्टी), मुंबई विद्यापीठ सोसायटी ऑफ ग्रेज इन, युके. एस.ओ. ए. एस.आंबेडकर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लंडन येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत मला सहभागी होण्याची संधी मिळाली, अशी माहिती माजी मंत्री प्रा. डॉ. लक्ष्मणराव ढोबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जागतिक दृष्टिकोन, न्याय समता आणि लोकशाहीची पुनर्कल्पना या विषयावर २४ व २५ एप्रिल रोजी ही आंतरराष्ट्रीय परिषद झाली. या परिषदेस महाराष्ट्र राज्याचा माजी मंत्री म्हणून मला प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आलेले होते. या परिषदेत मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी न्याय आणि समानतेच्या क्षेत्रात दिलेले योगदान अमूल्य असल्याचे मत मी व्यक्त केले. परिषदेच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जागतिक स्तरावरील विचारांचा प्रभाव आणि त्यांनी केलेल्या कार्याच्या माध्यमातून जागतिक मानवी कल्याणाच्या विकासासाठी प्रेरणास्त्रोत म्हणून या परिषदेकडे पाहिले जाईल. त्यांचे न्याय, समानता आणि लोकशाही या क्षेत्रातील योगदान अमूल्य राहिलेले आहे. या परिषदेला देश-विदेशातील विविध मान्यवरानी हजेरी लावली. परिषद यशस्वी करण्यासाठी आजीवन अध्यन आणि विस्तार विभाग मुंबई संचालक.प्रा. डॉ. बळीराम गायकवाड यांनी समन्वयक म्हणून महत्वाची भूमिका पार पाडली, असे लक्ष्मणराव ढोबळे यांनी सांगितले. यावेळी प्रा. सुहास उघडे, प्रा. अशोक पाटील, दत्तात्रय पाटील, प्रा. किशोर जोगदंड उपस्थित होते.

# राज्यस्तरीय सेल्फी फोटो स्पर्धेत सौमिका मेरुगूमिल्ली प्रथम

✔ श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन व पद्मशाली सखी संघमचे आयोजन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे-**

येथील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन व पद्मशाली सखी संघमच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय 'ठेवू या मुक्या पक्षांना दाणा पाणी, पाठवू या आनंदाच्या सेल्फी फोटो' ही स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेत राज्यभरातून व जिल्ह्यातून तब्बल ३५० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला.

सुरवातीला जाहीर केल्याप्रमाणे लकी ड्रॉ काढण्यात आले होते. मुंबईच्या सौमिका मेरुगूमिल्ली हिने प्रथम क्रमांक मिळवत नेकलेस व कर्णफुलच्या मानकरी ठरल्या. सामाजिक कार्यकर्ते शेखर इगे यांच्या वतीने हे बक्षीस देण्यात आले. सोलापूर महापालिकेचे सेवानिवृत्त अधिकारी लक्ष्मण दोंतूल यांच्यातर्फे देण्यात आलेल्या द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक विजेते ठरले अकलूजचे सुहास कुलकर्णी. याबरोबर तृतीय क्रमांकाचे बक्षीस मोहोळ, अनगर येथील उज्वला गाढवे तर सोलापूरच्या मीनाक्षी कोळी या चौथ्या क्रमांकाच्या विजेत्या ठरल्या. परगावच्या विजेत्यांना त्यांचे बक्षीस कुरियरद्वारा पाठवण्यात येणार आहे, अशी माहिती फाउंडेशनचे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांनी दिले. व्यवसायिक राजकुमार गुजरतर्फे दिले जाणाऱ्या उत्तेजनार्थ प्रथम बक्षीस 'नांदेड' येथील राजेश्वर कनकमवार हे किचन भांडीचे विजेते ठरले. उत्तेजनार्थ द्वितीय बक्षीस सोलापूरातील 'केगाव' येथील किरण जाधव हे 'डिनर सेट' चे मानकरी ठरले. तर, उत्तेजनार्थ टिफीन बॉक्सचे विजेत्या ठरल्या सोलापूरच्या लक्ष्मी शेरला. गुरुवारी सकाळी लहान मुलांच्या हस्ते लकी ड्रॉ काढण्यात आले होते. संध्याकाळी बक्षीस वितरित करण्यात आले आहे. हेमा मैलारी यांनी सूत्रसंचालन केले. मेघा इट्टम यांनी प्रास्ताविक केले. गीता भूदत्त यांनी आभार मानले. यावेळी सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम, हेमा मैलारी, पल्लवी संगा, पद्मा मेडपल्ली, गीता भूदत्त, दयानंद कोंडाबत्तीनी, किशोर व्यंकटगिरी, वैकुंठम् जडल, लक्ष्मण दोंतूल व राजकुमार गुजर यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस देण्यात आले.



# पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयात कामगार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ मे-**

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन संपन्न झाला. संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, कार्यवाह अरविंद चिन्नी यांच्या उपस्थितीत संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे जहालवादी नेते यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पांडुरंग दिड्डी यांच्या हस्ते झेंडा फडकवून झेंड्याला राष्ट्रगीताने सलामी देण्यात आली. यावेळी उपस्थितामध्ये रमा इप्पलपल्ली, वनिता कायत, काशीराज कोळी, कल्पना सल्ला,विघ्नेश गोसकी उपस्थित होते

# बाजार समितीत कांदा दराची घसरण सुरुच

✔ उत्पादन खर्च निघत नसल्याने शेतकरी हवालदिल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ मे-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची आवक चांगली असली तरीही भाव समाधानकारक नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी पूर्णतः हवालदिल झाला आहे. निर्यातीवरील शुल्क हटवल्यानंतर दरामध्ये सुधारणा होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, दर जैसे थेच राहिल्याने शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरताना दिसत आहे. उत्पादन खर्च निघत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आले आहेत.

दरम्यान, केंद्र सरकारने एक एप्रिल पासून कांदा निर्यातीवरील २० टक्के शुल्क मागे घेतले. त्यामुळे निर्यातीला चालना मिळेल आणि पर्यायाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल, अशी आशा होती. परंतु ही आशा फोल ठरली आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याच्या दरात सुधारणा होताना दिसत नसल्याने शेतकरी हैराण झाला आहे. वाढत्या उन्हामुळे कांदा देखील खराब होत आहे. सोलापूर मधील स्थानिक कांद्याचे खराब होण्याचे प्रमाण वाढले आहे. कांद्याला हवा आणि आद्रता जास्त लागते. हवा नाही लागल्यास तो कांदा लवकर खराब होतो. वाढत्या उन्हामुळे वाहतुकीत स्थानिक कांदा लवकर खराब होत आहे. त्यामुळे खराब झालेल्या कांद्याला मागणी घटत असल्याचे सांगण्यात आले.



> **दरात घसरण; उत्पादन खर्च निघेना**
> सध्याच्या घडीला सोलापूर बाजार समितीत कांद्याची सुमारे दोन ते अडीच हजार गाड्यांची आवक होत आहे. अन्य जिल्ह्यातून येणाऱ्या दुपदरी कांद्याला प्रत्येक क्विंटल एक हजार ते दीड हजार रुपये पर्यंत दर आहे. तोही दर समाधानकारक नाही. अशा स्थितीत स्थानिक कांद्याला प्रतिक्विंटल ५०० ते ८०० रु. भाव मिळत आहे. उत्पादन खर्चही निघणे शक्य नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी अक्षरशः वैतागला आहे.
> **- भैरू पाटील, कांदा उत्पादक शेतकरी.**
>
> **जून, जुलै नंतर दरात सुधारणा होण्याची शक्यता**
> सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत आलेला कांदा कवडीमोल दराने विकला जात आहे. दुपदरी कांद्याला जास्त दर आहे. मात्र तो दर समाधानकारक नाही. स्थानिक कांदा लवकर खराब होत असल्याने त्या कांद्याला ग्राहकांमधून फारशी मागणी नाही. जुलै नंतर कांद्याच्या दारात सुधारणा होण्याची शक्यता आहे.
> **- सादिक बागवान, अडत व्यापारी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



## घोळसगाव येथे बसव जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. ३ मे-**

घोळसगाव येथे समतानायक महापुरुष श्री महात्मा बसवेश्वर महाराजांचे प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरा करण्यात आले श्री शंभू महादेव चौक श्री सिद्धरामेश्वर चौक ग्रामपंचायत कार्यालय घोळसगाव तसेच अंगणवाडी क्रमांक २२१ असे विविध ठिकाणी बसवेश्वर महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच राजशेखर कीवडे, ग्रामसेवक विक्रमजी घाटे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी कांबळे, लक्ष्मण आलुरे, अंगणवाडी सेविका रेखा व्हॅनाळे, निर्मला मेणसे, भौरम्मा पाटील, भौरम्मा स्वामी, आशा किवडे, धानम्मा स्वामी, सिद्धार्थ किवडे, गणेश कुंभार, गणेश पाटील, वीरू उमाटे, रेवणप्पा किवडे, राहुल किवडे, प्रमोद हत्ते, बप्पा त्रिगुळे, विकास किवडे, सतीश पालापुरे, श्रीशैल होळे, सागर होळे, विकास वाघमारे, अल्ताफ फकीर, अब्बास दिवटे उपस्थित होते.



## पिलीव येथे महात्मा बसवेश्वर महाराजांना अभिवादन

**पिलीव, दि. ३ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त समाज बांधवांच्यावतीने खंडोबाचे मंदीर व ग्रामपंचायत कार्यालय याठिकाणी अभिवादन करणयात आले. यावेळी वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष अविनाश जेऊरकर, माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, उमेश देशमुख, राहुल खलीपे, गणेश देशमुख, मुन्ना आर्वे, सोमनाथ देशमुख, यश उरवणे, विजय सगरे, तुंगळे, आर्वे, देशमुख उपस्थित होते.



## महात्मा बसवेश्वरांची शिकवण आचरणात आणावी : कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. ३ मे-**

महात्मा बसवेश्वर यांनी सर्वधर्मसमभाव, स्त्री पुरुष समानता, रूढी परंपरा आणि अंधश्रद्धा निर्मूलनची शिकवण दिली. त्यांची ही शिकवण आचरणात आणली पाहिजे, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील मराठी वांग्मय मंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रम ात महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.आर. लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन डॉ. शितल झिंगाडे यांनी केले आभार वांग्मय मंडळ विभागाचे भीम सोनकांबळे यांनी मानले कार्यक्रमास प्रा. विद्याश्री वाले, मनीषा शिंदे, गुरुशांत हपाळे, प्रा. जनाबाई चौधरी, प्रा. शितल फुटाणे, प्रा. शिल्पा धूमशेट्टी उपस्थित होते.

## बार्शी तालुक्यात महाराष्ट्र व कामगार दिन साजरा

**बार्शी, दि. ३ मे-**

बार्शी शहर व तालुक्यात शाळा, महाविद्यालयात तसेच विविध शासकीय, निमशासकीय कार्यालय तसेच विविध संस्थांच्यावतीने दि १ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. येथील तहसील कार्यालयात आमदार दिलीप सोपल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर तहसील कार्यालयात एका छोटेखानी कार्यक्रमात आमदार सोपल यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांचा श्रीफळ, गुलाब पुष्प देऊन सन्मान केला. यावेळी तहसीलदार एफ. आर. शेख, पोलीस उपअधीक्षक जालिंदर नालकुल, बार्शी न. पा. चे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे उपस्थित होते.

## संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त पंढरपुरात आज बैठक

**पंढरपूर, दि.३ मे -**

भागवत धर्म व वारकरी संप्रदायाचे आद्य प्रचारक संत शिरोमणी नाम देव महाराज व परिवाराच्या ६७५ वा संजीवन समाधी सोहळ्याचे नियोजन करण्यासाठी समस्त शिंपी समाजाची महत्वपूर्ण बैठक रविवारी ( दि. ४ मे) रोजी आयोजित करण्यात आली असल्याची माहिती पंढरपूर संत नाम देव शिंपी समाजाचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी दिली. येथील प्रदक्षिणा मार्गावरील संत नामदेव महाराज मंदिरात (जन्मस्थान) रविवारी सकाळी ९ ते दुपारी ५ वाजेपर्यंत संत नामदेव महाराजांचे १६ वे वंशभ ह.भ.प. माधव महाराज नामदास यांच्या अध्यक्षतेखाली सदर बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. संत शिरोमणी नामदेव व त्यांच्या परिवारातील १५ सदस्यांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा यावर्षी जुलै महिन्यात असून दि. २३ व २४ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये समस्त नामदास महाराज परिवार, पंढरपूर शिंपी समाज, अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, श्री केशवराज संस्थान, संत नामदेव महाराज वारकरी-फडकरी संघटना, संत नामदेव युवक संघटना, महिला भजनी मंडळ तसेच महाराष्ट्रातील समस्त शिंपी समाज, व सहयोगी संस्थांच्या अनमोल सहकार्याने या संजीवन समाधी सोहळा साजरा करण्यात येणार आहे. दरम्यान कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी रविवार दि. ४ मे रोजी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. यावेळी शिंपी समाजातील विविध संस्था, संघटनांचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी महाराष्ट्रातील समस्त शिंपी समाजातील सर्व पोट जातीतील संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकार्यांनी सदर बैठकीस उपस्थित रहावे. या बैठकीमध्ये ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त विविध समित्यांची घोषणा करण्यात येणार आहे.

# जैविक शेती ही काळाची नव्हे तर भविष्याची गरज : कृषीतज्ञ सानप

## करकंब रोटरी क्लबच्यावतीने जैविक शेती मार्गदर्शन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.३ मे-**

कीटकनाशके व रासायनिक खते यांच्या वापरामुळे शेतीतील पीके व मातीवर दुष्परिणाम होत असून याचे गंभीर परिणाम मानवी जीवनावर होत असल्याने जैविक शेती ही काळाची नव्हे तर भविष्याची गरज असल्याचे मत कृषीतज्ज्ञ चंद्रकांत सानप यांनी व्यक्त केले.

यावेळी ग्रोव्हिजन कंपनीचे सीईओ गंगाधर साळवे, कोअर कमिटीचे सदस्य हेमंत भोसले यांनीही शेतक-यांना मार्गदर्शन केले. करकंब रोटरी क्लबच्यावतीने १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून जैविक शेतीविषयक मार्गदर्शन, विषमुक्त उत्पादन, कमी खर्च व जास्त उत्पादन या विषयांवर शेतक-यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी करकंब रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.अक्षय मोरे, प्रोजेक्ट प्रमुख रघुनाथ जाधव, संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांतकुमार मोरे, रोटरीयन लक्ष्मण जाधव, राहुल बनकर, पोपट हेगडकर, दत्तात्रय झिरपे, हनुमंत करळे आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सानप यांनी जमीनीत जास्त प्रमाणात केमिकलचा वापर केल्यास जीवाणू मरतात. त्यामुळे खतांचे विघटन होत नाही. तणनाशक हे धोकादायक असून त्याचा योग्यवेळी थोडाफार वापर करण्यास हरकत नाही, पण त्यामुळे मातीतील जीवाणू मोठ्या प्रमाणावर नाहिसे होतात.

खतांपेक्षा जीवाणू हे महत्त्वाचे आहेत. पीकांसाठी लागणा-या अन्नद्रव्यांची माहिती देऊन प्रात्यक्षिके करुन दाखविली. खत, पाणी यांचे व्यवस्थापन, शेतीला व्यवसायात रुपांतरीत करणे, विक्री व्यवस्थापन इत्यादीबाबत सखोल माहिती देऊन शेतक-यांच्या प्रश्नांचे शंकानिरसन केले. शेतकरी दत्तात्रय झिरपे, पांढरे, दत्तात्रय खंदारे, राहुल बनकर, पोपट हेगडकर, गणेश गुळमे, मारुती ठोंबरे, बंडू राऊत, खंडू परदेशी यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ञांनी उत्तरे दिली. सूत्रसंचालन लक्ष्मण जाधव यांनी तर आभार रघुनाथ जाधव यांनी मानले.



> केमिकलचा वापर केल्याने अन्नसाठा जरी वाढला तरी मानवी आरोग्याबरोबर पर्यावरण, पाणी, हवा यांवर दुष्परिणाम झाल्याचे दिसून येते. परदेशी कंपन्या औषधे बनवितात पण आपला माल विकत घेताना तपासणी करून घेतात व त्यात रासायनिक खते, कीटकनाशकांचे अंश आहेत का? हे पहातात यासाठी जैविक शेतीची आवश्यकता आहे. - गंगाधर साळवे. सीईओ. ग्रोव्हिजन कंपनी.

## अक्कलकोट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ मे-**

अक्कलकोट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्था व युजी मित्रपरिवार यांच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली.

अक्कलकोट शहरातील सोलापूर रस्त्यावरील एमएससीबी जवळील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौकातून विश्वरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मूर्तीची मिरवणूक करण्यात आली. मि रवणुकीचा शुभारंभ आ. सचिन कल्याणशेट्टी माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष अशपाक बळोरगी राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे, प्रथमेश इंगळे, शिवसेना महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रवीना राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, एपीआय पवार, एटीआय बागाव, माजी नगर सेवक उत्तम गायकवाड, तुषार गायकवाड आदींच्या हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या म ूर्तीचे पूजन करण्यात आले. प्रारंभी सर्व उपस्थित मान्यवरांचा सत्कार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर क्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी नगरसेवक उत्तम गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. या मिरवणुकीत महापुरुषांच्या प्रतिमा सजवलेल्या बगीतून ठेवण्यात आल्या होत्या. तसेच महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा चवदार तळ्याचा पाण्याचा सत्याग्रह देखावा हा उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता. या मिरवणुकीत जयंती उत्सव समि तीचे मार्गदर्शक तुषार गायकवाड, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष लखन वेस्कर, पदाधिकारी पांडू घाटगे, बाळू मडीखांबे, सचिन बनसोडे, गौतम बाळशंकर, रजत गायकवाड, अतिश मडीखांबे, दत्ता घाटगे, विकी कोरे, समाधान घाटगे, बाळू शिंगे,चंदू निगदळी, मुकेश बनसोडे, संदीप गायकवाड, स्वप्निल गायकवाड ,चेतन गायकवाड, सतीश सुतार, स्वामी गायकवाड, शेखर गायकवाड, प्रकाश गायकवाड, सागर सुतार, रुषभ गायकवाड उपस्थित होते. मिरवणुकीची सांगता भीम नगर येथे करण्यात आली.






## पिलीव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची मिरवणुकीने सांगता

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ३ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे डॉकटर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा समारोप मिरवणुकीने करणयात आला.

यावेळी प्रतिमेचे पुजन नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, उमेशभाऊ सरवदे, रणजित सातपुते, नानासाहेब देशमुख, कुमार भैस,कुमार लोखंडे, कल्याण जावळे, नितीन कपने, माजी सरपंच अमोल मदने, जिवन गुरव, युवराज सातपुते, पै प्रणीत सरवदे,लोंढे गुरुजी, दामोदर लोखंडे, लक्ष्मण काळे, दत्तु भैस, राहुल खलीपे, संतोष पडळकर, सुजित सातपुते, विजय पिसे, संतोष बगाडे, दादासाहेब वगरे, अक्षय वगरे, निशांत बगाडे, केशव वाघमारे यांच्या उपस्थितीत मिरवणुकीचा शुभारंभ करणयात आला.बसस्थानकावरुन ही मिरवणुक मुख्य बाजारपेठेतून काढण्यात आली. मिरवणुकीत माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे, आरपीआयचे नेते विकास धाईंजे, अण्णा भोसले यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मिरवणुकीची सांगता मारुती मंदीराजवळ करण्यात आली.

## जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे पंढरीत स्वागत

### छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन; पेढे वाटून केली फटाक्यांची आतिषबाजी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ मे -**

केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्यानंतर पंढरपुरात माजी आमदार प्रशांत परिचारक, आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली युवक नेते प्रणव परिचारक यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या निर्णयाचे स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला युवक नेते प्रणव परिचारक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पेढे वाटून फटाक्याची आतिषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी युवक नेते प्रणव परिचारक म्हणाले की केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा धाडसी आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे सर्व भारतीय नागरिकांना योग्य न्याय मिळणार असल्याचे सांगितले. भाजपा तालुकाध्यक्ष प्रा. सुभाष मस्के यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणना करण्याचा जो निर्णय घेतला आहे. या जातनिहाय जनगणनेच्या सर्वेक्षणामुळे गावकुसाबाहेर राहणाऱ्या म ागासलेल्या समाजाची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक प्रगती होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष सुभाष म स्के, शहराध्यक्ष रोहित पानकर, करकंब मंडलचे अध्यक्ष हर्षल कदम उपस्थित होते.




## विद्यार्थ्यांनो, पुस्तकाशी मैत्री करा

### योग साधक सिद्धेश्वर झाडबुके; अक्षरमित्र पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ मे-**

आपल्या जीवनात अनेक कठीण प्रसंग येतात तेव्हा पुस्तक आपल्याला मार्ग दाखवतात. आपल्या मनात यशाचा आशावादी दृष्टिकोन पुस्तक निर्माण करत असतात, पुस्तकांच्या पानापानावर जगण्याची गाणी असतात म्हणून विद्यार्थ्यांनो पुस्तकाशी मैत्री करा, असे प्रतिपादन योग साधक सिद्धेश्वर झाडबुके यांनी केले.

सांगोला तालुक्यातील नाझरा विद्यामंदिर मध्ये महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या अक्षरमित्र पुरस्कार वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य बिभीषण म ाने, मुख्याध्यापिका मंगल पाटील, पर्यवेक्षक मधुकर धायगुडे, अनिल बाबर, शिरीष पाटील उपस्थित होते.यावेळी कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बिभीषण माने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सूत्रसंचालन सुनील जवंजाळ व दिलीप सरगर यांनी केले.



> विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, विद्यार्थी ग्रंथालयाकडे वळावा यासाठी संस्था अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके यांच्या मार्गदर्शनाखाली सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी किशोरी शहाजी बाबर हिने ८० तसेच अनुष्का शिरीष पाटील हिने ६० पुस्तके वाचून त्याचा रसास्वाद लिहिल्याबद्दल त्यांना पालकांसमवेत अक्षरमित्र पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

# अकलूज येथे २४ बटूंवर उपनयन संस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मे-**

येथील ब्राह्मण सेवा संघ व गणपती मंदिर ट्रस्टने आयोजित केलेल्या सामुदायिक व्रतबंध कार्यात २४ बटूंवर उपनयन संस्कार शानदार व वैभवीसोनार, सुतार व गुरव समाजातील बटूं वरही उपनयन संस्कार करण्यात आले. सम ारंभात करण्यात आले.

ब्राह्मण सेवा संघ व गणपती मंदिर ट्रस्टने शंकरनगर-अकलूज येथील कांतिलाल सांस्कृतिक भवनात सामुदायिक व्रतबंध समारंभ आयोजित केला होता. धाराशिव, माळशिरस, करमाळा, बारामती, इंदापूर, पुणे, कराड, या सोलापूर, धाराशिव, पुणे व सातारा जिल्हयातील बटूंनी सहभाग नोंदविला होता.

ब्राह्मण सेवा संघाने सर्व बटूंची अकलूज यशवंतनगर मधून सवाद्य शोभायात्रा काढली. यावेळी समारंभास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धर्यशील म ोहिते-पाटील, आमदार उत्तमराव जानकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री फत्तेसिंह माने-पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील, किशोर सिंह माने-पाटील, पांडुरंग भाऊ देशमुख, धनंजय देशमुख उपस्थित होते. माळशिरस तालूका पुरोहित संघाचे विनायकशास्त्री फडणवीस, हरिकाका कुलकर्णी, गणेश कुलकर्णी, अवधूत शेकदार, प्रवीण इनामदार, श्रीपाद सुमंत, निलेश कुलकर्णी, सुनीलशास्त्री मुदगल, गणेश बनाळीकर, प्रसाद कुलकर्णी, संतोष मुदगल, मनोज देशपांडे या ब्राह्मणद्वयींनी पौराहित्य केले. हरी कुलकर्णी, श्रीधर कुलकर्णी, निरंजन डांगे, प्रेमनाथ राम दासी, सुप्रिया मुदगल, जयेश कुलकर्णी, अवधूत शेकदार, महेंद्र जोशी, प्रसाद कुलकर्णी, वैभव आंबेकर, मनोज देशपांडे, गणेश बनाळीकर, वैशाली कांडलकर, वैशाली कुलकर्णी, मेघा कुलकर्णी, श्रेया कुलकर्णी आदींनी व्रतबंध सम ारंभ यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.



> मन आणि मेंदूवरती योग्य वेळी संस्कार असेल तर व्यक्ती सर्व गुण संपन्न होतो. याकरता १६ संस्कारापैकी एक असलेला उपनयन संस्कार महत्वाचा आहे. सामाजिक बांधीलकेतून गेली ३५ वर्षे समाजातील बटूंचा उपनयन संस्कार करण्यात येत असल्याचे संघाचे अध्यक्ष शिरीष देशपांडे यांनी सांगितले.



## शवगृहात कोल्ड कॅथनिट बसवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.३ मे-**

येथीलउपजिल्हारुग्णालयातील शवगृहात दोन कोल्ड कॅथनिट बसवण्याची मागणी रूग्ण कल्याण समितीचे सदस्य फारुक जमादार यांनी आमदार नारायण पाटील यांच्याकडे केली आहे.

यावेळी माजी नगरसेवक किरण बोकन, नरेंद्र ठाकुर, सामाजिक कार्यकर्ते मुस्तकीन पठाण, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष सोहेल पठाण, राजेंद्र वीर आदी उपस्थित होते. येथील उपजिल्हा रुग्णालयात कोल्ड कॅथनिट बंद आहे. मृतदेहाला नातेवाईकांची ओळख पटेपर्यंत सद्यस्थितीत पोष्ट मार्टम रुममध्ये किमान तीन दिवस ठेवावे लागते परंतु तीन दिवस मृत देह राहील्यास दुर्गंधीचा त्रास होतो. त्यामुळे शासनाकडून निधी उपलब्ध करून शवगृहात दोन कोल्ड कॅथनिट बसवण्यात यावेत असे निवेदनात म्हटले आहे

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बसवेश्वर जयंतीनिमित्त ७८ जणांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३ मे-**

तुळजापूर तालुक्यातील अणदुर येथे क्रांतीसूर्य जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त जन्मोत्सव समिती अणदुर व महात्मा बसवेश्वर ब्लड सेंटर सोलापूर यांच्या सहकार्याने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबीर आयोजीत करण्यात आले. यावेळी ७८ जणांनी रक्तदान करुन अभिवादन केले.



यावेळी व्हाईस ऑफ मिडिया जिल्हा कार्याध्यक्ष शिवशंकर तिरगुळे, आण्णासाहेब आलुरे, दिपक मुळे, संदीप धुमाळ, सचिन तोग्गी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. रक्तदात्यांना पाण्याचा जार भेट देण्यात आले. यावेळी श्रीशैल आलुरे, महेश आलुरे, लक्ष्मण मुळे, गिरीष कबाडे, सुभाष कोळी, बसवेश्वर पाटील, ओंकार कर्पे, आकाश आळंगे, महादेव शिवराम, बसवराज भंडारकवठे, अनुरुप कबाडे आदी उपस्थित होते.



### महत्वाचे...



### केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर, दि. ३ मे-**

ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्व. वितरण व नवीन-अक्षय ऊर्जा केंद्रीय मंत्री (भारत सरकार) प्रल्हाद जोशी यांनी शुक्रवारी संध्याकाळी श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, यांच्या हस्ते केंद्रीय मंत्री मंत्री श्री जोशी यांचा शाल व श्री विठ्ठल- रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.यावेळी माजी खासदार जय सिद्धेश्वर महास्वामी,माजी आमदार प्रशांत परिचारक, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे उपस्थित होते.



### माहिती अधिकार सोलापूर जिल्हा पदाधिकाऱ्यांनी घेतले स्वामी समर्थांचे दर्शन

**अक्कलकोट, दि. ३ मे-**

माहिती अधिकार सोलापूर जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे व माहिती अधिकार सोलापूर शहर प्रमुख श्रीकांत कोळी, मारुती जाधव, श्रीशैल बेळमकर, सागर मोरे, ईश्वर विटकर यांनी अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ दर्शनासाठी भेट दिली. त्यांनी श्री स्वामी समर्थांचें दर्शन घेऊन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास भेट दिली. यावेळी अक्कलकोट तालुका कार्याध्यक्ष स्वामीनाथ हेगडे व पदाधिकारी उपस्थित होते.



### सांगोल्यात प्राचार्य उकळे यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

**सांगोला,दि.३ मे-**

येथील प.पू.उदयसिंह देशमुख उर्फ भय्यू महाराज विद्यालय आणि कनिष्ठ विद्यालयाचे प्राचार्य मनोज उकळे यांचा सेवापूर्तीनिमित्त माजी आमदार दिपकआबा साळुंके पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विस्तार अधिकारी लहू कांबळे, बाळासाहेब एरंडे, माजी नगराध्यक्ष मारुती बनकर, गिरीश नष्टे, सचिव सुभाष लऊळकर, नंदकुमार दिघे, राम बाबर, अरविंद केदार, सचिन लोखंडे, अमर लोखंडे, आनंद घोंगडे, बापू भाकरे, रमेश जाधव, बापू ठोकळे, बाबासाहेब बनसोडे, किशोर बनसोडे, पिंटू पाटील, बाळासाहेब झपके, डॉ.धनंजय पवार, सरपंच डोईफोडे उपस्थित होते. प्राचार्य उकळे यांची सेवा पूर्ण होत असली तरी ते सामाजिक बांधिलकी जपणारे शिक्षक असल्याने ते कधीच निवृत्त होऊ शकत नाहीत असे प्रतिपादन विद्या विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष व माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांनी केले. आगामी काळात ज्या संस्थेत त्यांनी शिक्षक, प्राचार्य म्हणून काम केले. त्याच संस्थेत निमंत्रित संचालक म्हणून काम पाहण्याची जबाबदारी त्यांना देणार असल्याचेही शेवटी त्यांनी स्पष्ट केले.




### माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रेंच्या मध्यस्थीने उपोषण स्थगित

**अक्कलकोट दि.३ मे-**

अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य गेटसमोर विविध मागण्यांसाठी आमरण उपोषणाला बसलेले निवृत्त सहाय्यक सचिव नुरअहमद अ.गफुर शेरीकर व कनिष्ठ लिपिकपदाचा राजीनामा दिलेले गौरीशंकर शांतप्पा मजगे यांनी माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या मध्यस्थीने आमरण उपोषण सोडले. सभापती सिद्रामप्पा पाटील हे वैद्यकीय उपचारासाठी परराज्यात गेले आहेत. त्यामुळे माजीमंत्री म्हेत्रे यांनी मध्यस्थी केली. १० मेपर्यंत हिशोब काढून फरक रकमेचा चेक देण्याची हमी बाजार समितीचे सदस्य बसवराज माशाळे, श्रीशैल घिवारे, यल्लाप्पा ग्वल, सचिव एम.जी बदले यांनी दिली. यावेळी माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, अशपाक बळोरगी यांच्या हस्ते लेखी हमीपत्र देण्यात आले. यावेळी आनंद बुक्कानुरे, शाकीर पटेल, तडमुड फुफा, सद्दाम शेरीकर आदी उपस्थित होते.

# उद्योजक होण्यासाठी यशाची पंचसूत्री महत्त्वाची

## आमदार रणजितसिंह मोहिते पाटील; अकलूज येथे नवउद्योजक मार्गदर्शन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ मे-**

प्रचंड इच्छाशक्ती, सकारात्मकता, वेळेचे महत्व, व्यवहार ज्ञान, व अचूक प्रश्नाची जाण या पंचसूत्रीवर यशस्वी उद्योजक होता येते असे मत आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

स्मृतीभवन शंकरनगर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त कौशल्य विकास केंद्र पीएम उषा योजनेअंतर्गत आयोजित केलेल्या एक दिवसीय नवउद्योजक कार्यशाळेला मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी, विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग, रोटरी क्लब सराटी डिलाईट, राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय यांच्या वतीने सदरच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते.



यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर, शितलदेवी मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील, एमएसएमइचे मुंबई कार्यालय प्रमुख मिलिंद बारापत्रे, सहाय्यक सुनील खुजणारे, विद्यापीठाचे प्र कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, प्रभाकर कोळेकर, एनएसआयसीचे उपसंचालक रितेश रंगारी, ऑर्गेनिक फार्मचे ओनर सत्यजित हांगे, सोलापूर उद्योजकता केंद्राच्या संगीता खंदारे यांच्यासह नवउद्योजक पुरुष, महिला बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रस्ताविकात खा. धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले, सोलापूर व माढा मतदारसंघातील युवाकांना राज्य व केंद्र शासनाच्या योजनांची माहिती व्हावी, यातून उद्योजक घडावेत यासाठीच या कार्यशाळेचे आयोजन केले आहे. सन २०२२ साली पहिले मार्गदर्शन शिबिर झाले. सुमारे चौदाशे प्रशिक्षणार्थीतून गुणवत्तेनुसार १०० तरुणांची गुजरात येथील उद्योजकता कार्यक्रमासाठी निवड झाली. आज ते उद्योजक म्हणून कार्यरत आहेत. माळशिरस व मेंढापूर येथे मिनी एमआयडीसीत रूपांतर करून यामध्ये द्राक्ष, केळी आदी फळापासून उपपदार्थ निर्मिती करता येईल यासाठी ही प्रयत्न करत आहोत.

तुम्ही उद्योजक बना लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असा विश्वास ही त्यांनी यावेळी दिला. आ. उत्तमराव जानकर म्हणाले, आपणास उद्योजक व्हायचे आहे हे मनात ठरलं पाहिजे. अपयश हे शिकवण्यासाठी येतं. कोणत्याही व्यवसायाची लाज वाटता कामा नये. ध्येय ठरवा व त्यानुसार वाटचाल करा. सहकार महर्षींनी अडचणीवर मात करीत परिसराचे नंदनवन केले. एम एस एम इ चे मुंबई कार्यालय प्रमुख मिलिंद बारापत्रे व सहाय्यक सुनील खोजनाळे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली. यावेळी प्र.कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, प्रभाकर कोळेकर यांनी मनोगत व्यक्त केले. तर नव उद्योजक जितेंद्र बाजारे, रेश्मा जाधव यांनी अनुभव कथन केले.

#### ‘या’ उद्योजकांचा झाला सन्मान

सुरेश पवार सांगोला, शेखर घोंगडे, नवनाथ येवले, गणेश गायकवाड, धनंजय सोलापुरे, केतन शिंदे, महेश वाकडे, शंकर टोणपे, धनाजी जमदाडे, नानासाहेब पवार, विलास गाडे, वैभव पोळ, निशा गायकवाड, रतिलाल नवले, दीपक देशमुख, राजेंद्र इंगळे, संदीप घाडगे, रूपाली पवार, महेश पाटील, अभिजीत पाटील, समीर मुलाणी, किरण लोकरे, राहुल जगदाळे, नवनाथ कसपटे, करण शेलार या उद्योजकांना खासदार नवउद्योजक पुरस्काराने खा. धैर्यशील मोहिते-पाटील व शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## पंढरपूर नामसंकीर्तन सभागृहासाठी १५ कोटीची मागणी

### माजी आमदार प्रशांत परिचारकांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ मे -**

पंढरपूरातील नामसंकीर्तन सभागृहाचे काम अंतिम टप्प्यात आले असून यासाठी १५ कोटी रुपये निधीची मागणी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून केली आहे.

राज्यातील सर्वात मोठे तीर्थक्षेत्र असणाऱ्या पंढरपूर येथे विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम वर्षभर संपन्न होत असतात. यासाठी येथे भव्य नामसंकीर्तन सभागृह उभा करावे अशी मागणी श्री. परिचारक यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली होती. याची दखल घेऊन या कामास मंजुरी देण्यात आली. पंढरपूर शहरात नामसंकीर्तन सभागृह बांधकामाच्या कामास ऑक्टोबर २०१६ मध्ये शासनाकडून मंजूरी मिळाली . सदर कामाची एकुण अंदाज पत्रकीय किंमत ३९ कोटी ४७ लाख होती. आतापर्यंत २५ कोटी इतका निधी पंढरपूर नगरपरिषदेस प्राप्त झाला आहे.

प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या कामाची बिले देणेत आलेली आहेत. सध्याच्या कामाच्या अंदाज पत्रकामध्ये वाढ झाली आहे. प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्यातील वॉल कंपाऊंड, प्लंम्बिंग, अग्नीशमन व विद्युत इ. काम ७० टक्के पुर्ण झालेले आहे. तिसऱ्या टप्यातील नामसंकीर्तन सभागृहाचे अंतर्गत रस्ते, भुखंड विकास, फर्निचर व्यवस्था, विद्युत व्यवस्था, सिसिटीव्ही कॅमेरे इ. कामे करणचे असून यासाठी १५ कोटी रुपये निधी मिळावा अशी मागणी श्री. परिचारक यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन केली असून याबाबतचे निवेदन त्यांना दिले आहे. दरम्यान या मागणीबाबत मुख्यमंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच हा निधी मंजूर होईल अशी माहिती परिचारक यांनी दिली.

## जातीनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे सांगोल्यात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ मे-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणनेची घोषणा करून सर्व समावेशक धोरणाचा नवा अध्याय सुरू केला आहे. या निर्णयाचा सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील १४ मंडलात पेढे वाटून जल्लोष साजरा केला असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली. ही जनगणना शैक्षणिक व सामाजिक आरक्षण धोरणांना अधिक न्याय बनवेल हा विश्वास आहे. हा निर्णय सामाजिक न्यायाच्या दिशेने भारताने सकारात्मकतेने टाकलेले पाऊल आहे.



या निर्णयाचा भारतीय जनता पार्टी सोलापूर ग्रामीण जिल्ह्याच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. येत्या काळात केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे येत्या काळात विविध जातसमुहाच्या आधारावर आरक्षणाचा निर्णय घेणे केंद्र सरकारला सोपे होणार आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या या धाडसी निर्णयामुळे येत्या काळात देशातील विविध जातीची नेमकी संख्या व त्यांची स्थिती समजण्यास मदत होणार असल्याचे चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगितले.

## बंधाऱ्यातील पाणीसाठा संपला; आले डबक्याचे स्वरूप

### बार्शी तालुक्यात तडवळे, इर्ले, काळेगाव, घाणेगाव बंधाऱ्यांची स्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३ मे -**

बार्शी तालुक्यातील भोगावती नदीवरील तडवळे, इर्ले, काळेगाव, घाणेगाव येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यातील पाणीसाठा संपल्याने बंधाऱ्याला डबक्याचे स्वरुप प्राप्त झालेले आहे

वाढत्या तापमानामूळे दिवसेंदिवस पाणी कमी होत असून बंधारे कोरडे पडू लागले आहेत. ऊस, भुईमूग, भाजीपाला फळपीकांना पाण्याची गरज आहे. बंधाऱ्यातील पाणी संपत आल्याने नदीकाठचे शेतकरी चिंताग्रस्त आहेत. वाढत्या तापमानामुळे पिकांना पाणी देणे मुश्कील झाले आहे. अशातच विजेचा होणारा लंपडाव आणि एक दिवसाआड शेतीला मिळणारा वीज पुरवठा यामुळे शेतकरी वैतागले आहेत. बंधाऱ्यातील पाणीसाठा संपलेला असून बंधाऱ्याला डबक्याचे स्वरूप आलेले पहावयास मिळत आहे. अजून दीड महिना कडक उन्हाळा आणि एक दिवसाआड मिळणारा वीज पुरवठा असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांसमोर आ वासून उभे ठाकलेले आहेत. भोगावती नदीवरील हिंगणी मध्यम प्रकल्प तसेच ढाळे पिंपळगाव या प्रकल्पामध्ये मुबलक पाणीसाठा आहे. तरी या प्रकल्पातून नदी व कॅनॉल मधून पाणी सोडून घाणेगाव, काळेगाव, इर्ले आणि तडवळे या बंधाऱ्यात पाणी सोडावे अशी मागणी नदीकाठच्या शेतकऱ्यांमधून होऊ लागली आहे. बंधारे कोरडे पडले आहेत.



## डोंबाळवाडी येथील शेतकऱ्याने शोधला पाखरे राखण्यावर पर्याय

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर,दि.३ मे-**

डोंबाळवाडी (खुडुस) येथील शेतकरी पोपट डोंबाळे यांनी पाखरे राखण्यावर पर्याय शोधला असून त्यांनी आपल्या बाजरीच्या पिकात भोंगा बसविला असून त्यांना आता स्वतः जाऊन पाखरे राखावी लागत नाहीत.



डोंबाळवाडी येथील शेतकऱ्याने फेब्रुवारी महिन्यात राणी जातीची ०.४० आर (१ एकर) क्षेत्रात बाजरीची पेरणी केली असून या पिकास रासायनिक खताची मात्रा,व गरजेनुसार पाणी दिले असून आता या बाजरीच्या कणसास चांगला दाना भरला आहे.सुरवातीची ज्वारी,बाजरीची पिके निघाली असल्याने पाखरांना खाण्यास काही नसल्याने या बाजरी पिकाची पाखरामुळे हानी होऊ नये .यासाठी या पिकाची काळजी घ्यावी लागत आहे.

सध्या सकाळ पासूनच उन्हाचा तडाखा जाणवत आहे.अश्या उन्हात पाखरे राखणे कठीण होत असल्याने त्यांनी या बाजरीच्या पिकात चार्गिंगचा भोंगा बसविला आहे.हा भोंगा सुरू केल्यानंतर ३ तास वाजतो .ते सकाळी ७ वाजता व दुपारी ४ वाजता असे दिवसातून दोन वेळा भोगा सुरू करतात.या भोंग्याच्या आवाजाने पाखरे शेताकडे फिरकत नाहीत .या भोंग्यामुळे ऐन उन्हात पाखरे राखण्याचा व ओरडण्याचा प्रश्न मिटला आहे.सध्या पिक जोमात असून उन्हाळ्यात सुद्धा एकरी १८ ते २० पोती बाजरी होणे त्यांना अपेक्षित आहे.

# पेशवा युवा मंचच्या वतीने सामुदायिक व्रतबंध सोहळा उत्साहात संपन्न

### पंढरपूरात २५ जणांचे झाले उपनयन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३ मे -**

येथील पेशवा युवा मंचच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी सामुदायिक व्रतबंध सोहळा अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर गुरुवारी ( दि.१ मे) संपन्न झाला. यावेळी २५ बटूंनी या सोहळ्यात सहभाग घेतला होता.

येथील आरती मंडप प्रांगण येथे आयोजिलेला हा व्रतबंध सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या प्रत्येक बटूस मंचतर्फे सोवळे, उपरणे, पळी, पेला, ताम्हण व संध्येची पोथी भेट देण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प. मदन महाराज हरिदास होते. याप्रसंगी मुंबई येथील मंत्रालयातील राजपत्रित अधिकारी डॉ.मंजुषाताई कुलकर्णी, जयवंत शुगर धावरवाडीचे अध्यक्ष सी.एन.देशपांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. देशपांडे म्हणाले की, अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे. पेशवा युवा मंचाच्या विविध समाजपयोगी कार्यक्रमांपैकी हा एक स्तुत्य उपक्रम आहे असे गौरवोद्गार काढले. संस्कृती रक्षण करणे हे आजच्या काळात एक आव्हान होऊन बसले आहे. अशा काळात संस्कृती रक्षणाचे कार्यक्रम हे कौतुकास्पदच आहे असे गौरवोद्गार मंजुषा कुलकर्णी यांनी काढले. मुंजीचे पौरोहित्य आकाश पारनेरकर गुरुजी व श्री विठ्ठल रुक्मिणी वेदपाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी केले. याप्रसंगी बटूंना शुभआशीर्वाद देण्यासाठी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक, मनसे नेते दिलीप बापू धोत्रे, रतनचंद शहा बँकेच्या शाखाधिकारी माधुरीताई बडवे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. ऋजुता उत्पात, श्री केटरर्सच्या मंजिरी परिचारक, रेणुका प्रतिष्ठानच्या संस्थापिका प्रियांका देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान सायंकाळी स्वा.सावरकर पथावरून बटूंची सवाद्य भव्य शोभायात्रा काढण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष ज्ञानराज बेणारे , उपाध्यक्ष मंगेश कवडे यांसह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

